
# माणूस

शनिवार
२४ जून १९७२
पन्नास पैसे

चे : क्यूबन क्रांतीचा रोमँटिक हीरो



माणूस
शनिवार
२४ जून १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : चार

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.
दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

१३ जून १९७२

▫ मुद्दाम पत्र लिहिण्याचे कारण की, राजीनामा ही शंकर पाटील यांची कथा नाट्यपूर्ण वाटली. शिवाय यावेळच्या कविता—भावपूर्ण वाटल्या. निशिकांत मिरजकर यांनी केलेले 'पैस'चे परीक्षण आवडले. चालू लेखमाला आकर्षक आहे.

पृथ्वीराज कपूर यांना वाहिलेली श्रद्धांजली नव्हे शब्दांजली भावपूर्ण शब्दांत होती. असो. असाच मजकूर नेहमी यावा ही आशा.

मुकुल बोरसे
मालेगाव, (नाशिक)

९ जून १९७२

▫ मी माणूसचा नियमित वाचक आहे. रवींद्र पिंगे यांची १० जूनच्या अंकातील गैरहजेरी पाहून चुकल्याचुकल्यासारखे वाटले. श्री. निशिकांत मिरजकरांचे 'पैस'चे परीक्षण आणि अरुणा अंतरकर यांचे पृथ्वीराज कपूर यांचे व्यक्तिदर्शन झकास. अरुण साधूंच्या पुढील लेखांकाची उत्सुकतेने वाट पाहात आहे.

शिवाजी अदाणे,
पुणे

# मुंबई वार्ता

## एका मिटलेल्या संपाची कहाणी

प्रतिनिधी

१५ जून रोजी होणारा एक संप झाला नाही, हे एका अर्थी बरे झाले. साऱ्याच मुंबईकरांनी याबाबत समाधान व्यक्त केले असेल. आजाऱ्यांच्या पोटात भीतीने जो गोळा उभा राहिला असेल, तोही आता गेला असेल. मुंबईतील सरकारी रुग्णालयातील ऑनररी डॉक्टर्सचा हा संप होणार होता. त्यांच्यामागोमाग इतरही डॉक्टर्स संपावर जाणार होते. वैद्यकीय पेशातील लोकांनी संपावर जाणे हे तसे कसे-तरीच वाटत असले, तरी त्यामागे काही कारणे होती. ह्या संपाच्या प्रपंचाला कारणीभूत झाले होते डॉ. पोफळे. संप होण्यापूर्वीच राजीनामा देण्याचे शहाणपण डॉ. पोफळे यांना सुचले, हे बरे झाले. राजीनाम्याची डॉ. पोफळे यांनी जी कारणे दाखवली आहेत; व विशेषत: रोग्यांचे हाल होऊ नयेत; हे जे कारण त्यांनी दिले आहे, ते तितकेसे खरे असावे, असे वाटत नाही. रोग्यांचा डॉ. पोफळे यांना एवढा केव्हापासून पुळका आला? राजीनाम्यामागची खरी कारणे काही वेगळीच असावीत. 'ब्लिट्झ' या इंग्रजी साप्ताहिकात काही मजकूर छापून आला होता; तेही एक कारण त्यांच्या राजीनाम्यामागे असावे, असे अनेक लोक बोलताना आढळतात.

डॉ. पोफळे हे मुंबईला तसे अपरिचित नाहीत. अनेक बाबतीत त्यांनी मुंबईमध्ये (व कदाचित महाराष्ट्रामध्येही) भली मोठी प्रसिद्धी मिळवलेली आहे. महाराष्ट्र मंत्रिमंडळातील काही आजी व माजी मंत्र्यांचा त्यांच्यावर लोभही आहे. असो. हा संप का होणार होता, त्यात डॉ. पोफळे कसे येत होते, वगैरे वगैरेकडे जरा गाडी वळवू या!

चांगल्या डॉक्टर्सच्या ज्ञानाचा व उपचारांचा गरीबांना लाभ होण्यासाठी सरकारी रुग्णालयात ऑनररी डॉक्टर्स नेमण्याची प्रथा ११० वर्षांपूर्वी येथे सुरू झाली. तत्पूर्वी ती लंडनमधील रुग्णालयात प्रचलित होती. ऑनररी डॉक्टर्सना

पगार वगैरे मिळत नाही. त्यांची खाजगी प्रॅक्टिस चालू असते. फक्त ५० रुपये भत्ता त्यांना मिळतो. ही पद्धती येथे सुरू झाली तेव्हा ऑनररीची नेमणूक ही फक्त दोन वर्षांकरिता असे. त्यानंतर एका नव्या पद्धतीनुसार यात बदल करण्यात आला. 'अपॉइंटमेंट अनटिल फर्दर नोटीस' हा तो बदल होता आणि त्यानुसार ऑनररीची नेमणूक होई. या नव्या नियमाचा फायदा घेऊन डॉ. पोफळे यांनी जी. टी. इस्पितळाचे सुपरिटेंडेंट या नात्याने काही फालतू कारणे दाखवून दोन डॉक्टर्सना काढून टाकले. हाच प्रकार त्यांनी पुढे सेंट जॉर्जेस हॉस्पिटल येथे केला. डॉ. कमल अलिमचंदानी या ऑनररी डॉक्टरला त्यांनी दोन तासांची नोटीस देऊन काढले. डॉ. अलिमचंदानी कोर्टात गेल्या. कोर्टाने स्टे ऑर्डर दिली. त्याच रुग्णालयातील डॉ. जितेन कार या ऑनररीलाही त्यांनी एक महिन्याची नोटीस देऊन काढून टाकले. याच वेळी ऑनररी डॉक्टर्सनी त्यांच्या युनियनची स्थापना केली आणि या झब्बूशाहीविरुद्ध सरकारशी दोन हात करायला सुरुवात केली. त्यामुळे सरकारने एक ठराव पास केला. (हा सरकारी ठराव–G. R.–१९६९ मध्ये पास झाला.) या ठरावानुसार ऑनररीच्या जागा भरताना वृत्तपत्रांतून जाहिरात देण्यात यावी; व निवडसमितीने यांची निवड करावी असे ठरले. चारही सरकारी रुग्णालयांचे सुपरिटेंडन्टस, महाराष्ट्र राज्याचे सर्जन जनरल आणि प्रत्येक सरकारी रुग्णालयातील प्रत्येकी एक ऑनररी डॉक्टर यांची ही निवड समिती. निवड झालेल्या ऑनररी डॉक्टरची पाच वर्षे प्रोबेशनरी म्हणून नेमणूक आणि त्यानंतर तो सेवानिवृत्त होईपर्यंत तेथे राहू शकत असल्याच्या नियमाचाही यात समावेश होता.

या साऱ्या नियमांना हरताळ फासून डॉ. पोफळे यांची एप्रिलमध्ये ऑनररी म्हणून नेमणूक झाली. यामुळे साहजिकच ऑनररी डॉक्टर्समध्ये असंतोष निर्माण झाला.

दुसऱ्याही एका नियमाला येथे हरताळ फासण्यात आला.

१९६७ सालच्या सरकारी ठरावानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या, सरकारी इस्पितळाच्या सुपरिटेंडन्टची ऑनररी म्हणून नेमणूक होऊ नये, असा नियम करण्यात आला होता. असा हा नियम असूनही डॉ. पोफळे यांची नेमणूक कशासाठी करण्यात आली, हे डॉ. पोफळे व ती करण्यात पुढाकार घेणारे संबंधित मंत्री यांनाच माहीत.

डॉ. पोफळे सेंट जॉर्जेस इस्तिळाचे सुपरिटेंडन्ट होते आणि मेडिसिनचे ऑनररी म्हणूनही काम पाहात होते. गेल्या डिसेंबरात युद्ध सुरू असतानाच त्यांनी स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याची तयारी दर्शविली आणि काय आश्चर्य पाहा, युद्ध काळात जिथे कोणाची रजाही मंजूर होत नसे तिथे डॉक्टर मजकुरांच्या सेवानिवृत्तीला तात्काळ मंजूरी देण्यात आली. ते जेव्हा सेवानिवृत्तीपूर्व रजेवर गेले, त्या वेळी नियमानुसार त्यांच्या जागेवर तात्पुरती नेमणूक व्हायला पाहिजे होती पण ती तशी झाली नाही. एवढेच नव्हे तर ती जागा सहा महिने रिकामी ठेवण्यात आली. यावरून डॉ. पोफळे

यांना तेथे परत आणले जाणार अशी कुणकुण ऑनररी डॉक्टर्सच्या असोसिएशनला लागली. त्यांच्या जनरल बॉडीची मीटिंग होऊन याबद्दल एकमताने ठराव सम्मत करण्यात आला: 'असे जर करणार असाल तर कृपया अशी नियमाविरुद्ध नेमणूक करू नका' असे मुख्यमंत्र्यांना सांगण्यात आले. पण हे सारे व्यर्थ ठरले. डॉ. पोफळे यांची नेमणूक ऑनररीजच्या नाकावर टिच्चून व नियम गुंडाळून करण्यात आली. यामुळेच नाईलाजाने डॉक्टर्सना संपाचा निर्णय घ्यावा लागला.

डॉ. पोफळे हे तसे फारच चलाख गृहस्थ आहेत. त्यांनी या प्रश्नावर वर्तमानपत्रे निरनिराळ्या पक्षांचे पुढारी, शिवसेनाप्रमुख वगैरेंच्या भेटी घेऊन याला मराठी-बिगर मराठी वादाचा डूब दिला.

## इतर काही बाजू

डॉ. पोफळे यांच्या इतर काही बाजूवरही बरेच काही लिहिता येईल. प्रथम ते जी. टी. मध्ये तीन वर्षे सुपरिटेंडण्ट होते. तेथून त्यांनी सेंट जॉर्जेस येथे आपली बदली करवून घेतली. नियमानुसार एखाद्या हॉस्पिटलचा सुपरिटेंडण्ट म्हणून सुमारे तीन वर्षेच त्या हॉस्पिटलमध्ये राहाता येते. डॉ. पोफळे तब्बल दहा वर्षे सेंट जॉर्जसचे सुपरिटेंडण्ट होते. हे कसे घडू शकले हा प्रश्न मात्र विचारायचा नाही. त्याचे उत्तर देणे त्यांना व शासनालाही थोडे जडच जाईल. त्यांच्या कारकिर्दीत सेंट जॉर्जेस इस्पितळात अनेक भयानक गोष्टी घडल्या. डॉ. पोफळे ऑनररीजकडून वाटेल ती कामे करून घेत. मंत्र्यांकरिता ऑनररीजना केव्हाही बोलवणे व त्यांच्या बंगल्यावर केव्हाही पाठविणे हा सर्रास चालणारा प्रकार झाला होता. एका मंत्र्याच्या मुलाची मुंता करण्यात आली तेव्हा त्याचे ड्रेसिंग करण्याकरिता, एफ्. आर. सी. एस. असलेल्या मुंबईतील एका नामांकित सर्जनला, त्यांनी काही वेळा तिथे पाठविले. त्याच्याच कारकिर्दीत सेंट जॉर्जेस रुग्णालयात, 'लिनन फ्रॉड' म्हणून प्रसिद्ध असलेला, ४० हजार रुपयांचा फ्रॉड उघडकीस आला होता.

फेडको प्रकरणी शिक्षा भोगीत असलेले फेडकोचे डायरेक्टर्स तुरुंगात एकदम आजारी पडण्याचा प्रकार घडला आणि ते आजारी असल्यामुळे त्यांच्यावर दया करण्यात यावी असे दया-याचना करणारे अर्ज राज्यपालांकडे पाठविण्याबाबतच्या केसमध्ये डॉ. पोफळे यांचे नाव घेतले जात असे. यावर सुप्रीम कोर्टाने ताशेरेही मारले आहेत.

आर्थर रोडच्या तुरुंगात असलेले सारे स्मगलर्स, नेहमी आजारी पडून सेंट जॉर्जेसमध्येच यायचे. त्यांच्यावर इलाज करून त्यांना डिसचार्ज दिला तरी ते पुन्हा येत असत. ते हॉस्पिटल म्हणजे त्यांचा स्वर्गच होता.

कुली मस्तान या स्मगलरची तर तेथे चंगळच होती...त्याने सेंट जॉर्जेसमध्ये असताना एकदाही हॉस्पिटलचा गणवेश घातला नाही. नेहमीच त्याचे स्वतःचे खाजगी कपडे वापरले. मस्तानला म्हणे हॉस्पिटलमध्ये बाई, बाटली, गुंगी देणारी

कोकेनची इंजेक्शन्स वगैरे सारे काही पुरविले जात असे. जाता जाता मस्तानने वरपासून खालपर्यंत साऱ्यांचे हात पिवळे केले असेही म्हटले जाते.

सेंट जॉर्जेसमधील बहुसंख्य परिचारिका आणि आया त्यांच्या पूर्वीच्या साहेबा-बद्दल काय बोलतात माहिती आहे ?

जाऊ देत. ते सारं लिहायला जागा अपुरी आहे. असो संपावर लिहायला गेलो आणि थोडा इतरही आढावा घेतला. तेव्हा संप न होण्याचे क्रेडिट डॉ. पोफळे यांना देऊन येथेच थांबतो. ◘

## पहिलाच दिवस गाजला

सोमवारी विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. विधीमंडळाचे अधिवेशन सुरू झाले की मोर्चे निदर्शने यांना सुरुवात होते. यात तसे काहीच नवीन नाही. पण पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच दिवस विधानसभेत आणि बाहेर रस्त्यावर बराच गाजला.

महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणी हरिजनांवर झालेल्या अत्याचारांचा निषेध करण्यासाठी विविध पक्षांनी चार मोर्चे काढले. तर मच्छीमार संघाने दुसऱ्या काही कारणाकरिता एक मोर्चा काढला होता. गायकवाडगटाचा रिपब्लिकन पक्ष आणि बी. पी. सी. सी. यांच्यात बाचाबाची सुरू झाली आणि पोलिसांनी लाठीमार केला. यात कोणतीही हुल्लडबाजी न करता, शांतपणे कोळी गीते गाणाऱ्या व नृत्य करणाऱ्या कोळ्यांना आणि कोळणींना पोलिसांनी बेदम चोप दिला. पोलिसांना कसली धुंदी चढली होती कोण जाणे. एस्. आर्. पी. बद्दल तर बोलूच नये. त्यांना हृदय वगैरे प्रकार नसावा; असेच ते वागले. कोळ्यांच्या विशिष्ट पेहरावामुळे त्यांना मुंबईतील शेंबडी पोरंही ओळखू शकतात, मग पोलिसांच्या डोळ्यापुढे कसली अंधेरी आली होती. पोलिसांना कोळ्यांची ओळख फक्त हप्ता घेतानाच पटते की काय ?

झालेल्या प्रकाराची बरीच जबाबदारी बी. पी. सी. सी.वर आहे. बी. पी. सी. सी. चे अध्यक्ष रजनी पटेल तर एका घमेंडीतच वावरत होते. आमच्या मागे जनता आहे. सरकार आमचे आहे ही त्यांच्या तोंडी भाषा होती. त्यांना हरिजनांवरील अत्याचाराचा एवढा जर पुळका होता तर मुंबईच्या काँग्रेस आमदारांना ह्या प्रश्नावर विधानसभेत चांगली लॉबी करण्याचा आदेश त्यांना देता आला नसता का ? बोलून चालून ते पडले सत्ताधारी पक्षाचे सदस्य, म्हणूनच सरकारने झाल्या प्रकाराची सारी जबाबदारी रिपब्लिकन पक्षावर टाकली.

विधान सभेत संतप्त बौद्ध तरुणांनी जो प्रकार केला तो आततायी असला तरी

त्यामागे अन्याय व अत्याचार झालेल्या समाजाच्या प्रक्षुब्ध भावना होत्या. चीड होती. त्या प्रकाराबाबत शासन व समाज यांनी दाखविलेल्या उपेक्षावृती विरुद्धच्या वेदना त्यात होत्या. मंत्रीमहोदय शंकरराव पाटील यांच्या भावाचा संबंध बावडा प्रकरणाशी असल्याने, सरकारने त्यावर पांघरुण घालण्याचाच प्रयत्न केला. या विरुद्धचा तो विस्फोट होता. त्या तरुणांना सदनाने जी शिक्षा सुनावली ती कमी करण्यात यावी यासाठी कोणत्याही आमदाराने वजन खर्च केले नाही, ही त्यातली जरा खेदाची गोष्ट वाटते. समाजातील दबल्या गेलेल्याच्या भावनांची योग्य ती दखल घेण्याचा बोध या घटनेपासून समाजाने घ्यावा. ◻

## शाळा... कॉलेज... वह्या... पुस्तके...

१२ जून पासून शाळा सुरू झाल्या. शाळेत नवी नवी पुस्तके, वह्या घेऊन जाताना शाळकरी मुलांना कोण आनंद वाटत असतो. पण यावर्षी शाळा सुरू झाल्या तरी अनेक इयत्तांची पुस्तके उपलब्ध नाहीतच. ती केव्हा उपलब्ध होतील याचा पत्ता नाही. काही पुस्तके तर दिवाळी पर्यंतही मिळतील की नाही याची शंकाच वाटते. एस्. एस्. सी. ची काही पुस्तके उपलब्ध नाहीत.

यावेळी आठव्या इयत्तेत गेलेले विद्यार्थी दहा वर्षात एस्. एस्. सी. पूर्ण करणाऱ्यातील पहिल्या बॅचेसचे विद्यार्थी आहेत. त्यांना तर याची फारच तीव्र झळ पोहचली आहे.

नव्या अभ्यासक्रमाची पुस्तके लिहायला काही लेखकांना चारएक महिन्यांचाच अवधी मिळू शकला. याचे कारण अभ्यासक्रम फार उशीरा त्यांच्या हाती पडला. याबद्दल खेद व्यक्त करताना एक लेखक म्हणाला, " एवढ्या थोड्या अवधीत योग्य स्टॅंडर्डचे पुस्तक दिवसाचे सोळा सोळा तास काम करूनही मी लिहू शकलो नाही याचेच मला फार वाईट वाटते. "

महाराष्ट्रात पुस्तकांनी एक इतिहास निर्माण केला आहे. ती गाजलेली भूगोलाची पुस्तकेही आता इतिहास जमा झाली आहेत. आजची पुस्तकांची अवस्था ह्या इतिहासात नवी भर घालणार आहेत असे दिसते.

◻ ◻ ◻

# मुक्काम पुणे

·शरद कृष्णन्

येणाऱ्या टेलीव्हिजनचे बुकींग मुंबईला जोरदार असले तरी पुण्याला या बुकींगला पुरेसा प्रतिसाद मिळालेला नाही. दीड दोन हजाराचं हे महागडं खटलं आधी-पासून राखून ठेवणे, पुणेकरांच्या व्यावहारिक गणितामध्ये बसत नाही. प्रत्यक्षात येईल तेव्हा पाहू हाच त्यांचा या बाबतीतील दृष्टिकोन. आता हा खास पुणेरी दृष्टिकोन कसा लाभदायक ठरला याचा किस्सा परवा कलेक्टर कचेरीमध्ये सहज चक्कर मारली असता ऐकावयास मिळाला.

येऊ घातलेलं टी. व्ही.हा अगदी शंभर टक्के सरकारी मामला. आता शंभर टक्के सरकारी मामला म्हटल्यावर जे घोटाळे आवश्यक ते सर्व या टी. व्ही च्या बाबतीतही आलेच. केंद्रीय सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्याने मुंबई-पुणे टी. व्ही कक्षेमध्ये आणण्याचा निर्णय घेतला. त्या दृष्टीने त्वरेने हालचाल सुरू झाली. पुण्याच्या उपकेंद्रासाठी आवश्यक असलेला एक टॉवर सिंहगडावर उभारण्याचे ठरले. आता ठरल्या कार्यक्रमाप्रमाणे केंद्र सुरू करायचे, तर सिंहगडावरील टॉवरचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक असल्याने कामाचा वेग वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या. टॉवरसाठी सुरुंग लावून आवश्यक त्या खोलीचे खड्डे खणण्यात आले. नैमीत्तिक पुराणवस्तू संशोधन खात्याचा एक अधिकारी सिंहगडावर आला होता. सुरुंग-बिरुंग प्रकरण पाहून तो बिथरला. दिल्लीला आपल्या खात्याला त्याने रिपोर्ट दिला. प्रकरण गंभीर आहे. पुराणवस्तू संशोधन खात्याच्या ताब्या-तील जागेवर काम चालू आहे आणि खात्याला त्याचा पत्ता नाही. रिपोर्टची तातडीने दखल घेण्यात आली. भराभर कागदपत्रे हालली. आणि पुण्याच्या कलेक्टर कचेरीत हुकूम आला सिंहगडावरील टॉवरचे काम थांबवा. चालू कामाचा पंचनामा करा. कलेक्टर कचेरीने ताबडतोब कागदपत्र हलवले. संबधित मामलेदार सरकारी लवाजमा घेऊन गडावर हजर झाला. सुरुंगवाल्याला दामटून विचारले ये क्या चल रहा है? सुरुंगवाला तितक्याच बेफीकीरीने उद्गारला सरकारी मामला है, दिखायी नही देता? मामलेदार साहेबांनी सोबतचे कागदपत्र दाखवले.

आणि तातडीने पूर्ण होणे आवश्यक असलेले सरकारी काम सरकारी कागदाचा तुकडा दाखवूनच बंद करवले. रीतसर पंचनामा करून मंडळी परतली. आता ज्या माहिती आणि नभोवाणी खात्यामार्फत काम चालू करण्यात आले होते; त्या खात्यात गडबड उडाली. काम सुरू करण्यापूर्वी पुराणवस्तु संशोधन खात्याशी संपर्क साधून औपचारिक परवानगी मिळवणे आवश्यक होते. ते न केल्याने तंटा निर्माण झाला; असे लक्षात आल्यावर मंत्र्यांच्या पातळीवर बोलणी करून त्वरित निर्णय करावा असे ठरले. काम सध्या बंदच आहे. आता मंत्र्यांच्या पातळीवर बोलणी झाली का नाही हे ज्ञात नाही. समजा झाली असली; आणि निर्णय झाला असला तर ठीक. समजा झाली नसली तर आनंदच आहे. कारण माहिती आणि नभोवाणी खात्याच्या मंत्री श्रीमंती नंदिनी सत्पथी राजीनामा देऊन ओरिसाच्या मुख्यमंत्रीपदावर चालून गेल्या आहेत. आता नवीन मंत्री महोदय येतील आणि यथाकाल या प्रकरणात डोके घालतील. तोपर्यंत केरळ पर्यंत येऊन पोचलेला मान्सून महाराष्ट्राच्या डोक्यावर निदान सिंहगडाच्या परिसरात कोसळू लागला असेल. स्वाभाविकपणे निर्णय झाला तरी अमंलबजावणीला दिवाळी उजाडेल. लोकसभेमध्ये कोणी प्रश्न विचारला तर मंत्री महोदय उत्तर देतील 'मूळ योजने-प्रमाणे काम दिवाळी पर्यंत संपून ठरल्याप्रमाणे ७३ साली मुंबई व पुणे टी.व्ही. कक्षेत दाखल होणे आवश्यक होते. तथापी काही अपरिहार्य अडचणींमुळे सिंहगडावरील टॉवरचे काम रेंगाळल्याने मूळ योजनेत बदल करण्यात आला आहे.' इत्यादी. आता या सर्व प्रकरणातील सर्वात गंमतीचा भाग म्हणजे, आपल्या कक्षेमध्ये काम चालू आहे हा पुराणवस्तू संशोधन खात्याचा दावाच गलत आहे. कारण संपूर्ण गड पुराणवस्तु संशोधन खात्याकडे नसून, ऐतिहासिकदृष्टचा महत्त्वाचे दुवे असलेल्या भागावरच या खात्याची हुकमत चालते. आता जिथे टॉवर उभारणीचे काम चालू आहे. तो भाग महाराष्ट्र शासनाकडे येतो. महाराष्ट्र शासनाची प्रतिक्रिया अद्यापी ते समजू शकलेले नाही. परंतु अच्छा खासा सरकारी मामला कसा असू शकतो याची प्रचीती या प्रकरणाने जरूर आली. ◻

## शिक्षक संघ विरुद्ध शिक्षण मंडळ

पुणे महानगरपालिका प्राथमिक शाळा शिक्षक संघ व पालिकेचे शिक्षण मंडळ यांच्यामध्ये संघर्ष पेटणार, अशी लक्षणे जरूर दिसत आहेत. शिक्षक संघाने गेल्या आठवड्यात मंडळाच्या धोरणावर कडाडून हल्ला चढवला. शिक्षण मंडळाकडून शिक्षकांवर अन्याय होतो. वैयक्तिक आकसाने बदल्या केल्या जातात, असे आरोप संघाने केले असून शिक्षणाधिकारी के. बी. महाडिक व शिक्षक मंडळाचे अध्यक्ष यं. ग. शिंदे यांच्याविरुद्ध गंभीर आरोप केले आहेत. एक-दोन नव्हे तर एकशे

सत्तर शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या असून नैमत्तिक बदल्यांच्या सर्व मर्यादा ओलांडण्यात आल्या आहेत. या अन्यायकारक बदल्या तीस जूनपर्यंत थांबवल्या नाहीत तर त्यानंतर सत्याग्रह, घेराओ, आदि मार्गांनी प्रश्न धसास लावण्याची भाषा शिक्षक संघाने केली आहे.

शिक्षण मंडळाची अपेक्षा अशी की, प्राथमिक शिक्षकाने नियमित पगार घ्यावा आणि नेमून दिलेले काम करावे. संघटना असलीच तर त्यामार्फत सत्कारसमारंभ, चर्चा-सत्रे, सहली आदि कार्यक्रम करावेत. स्वाभाविकपणे उघड बंडाचे जे धोरण शिक्षक मंडळींनी स्वीकारले, त्यामुळे शिक्षण मंडळ खडबडून जागे झाले असून संघाविरुद्ध जोरदार कारवायी करण्याच्या विचारात आहे. मंडळाच्या बैठकीमध्ये मंडळी ज्या पद्धतीने बोलली त्यावरून त्यांची हुकुमशाहीवृत्ती जरूर दिसून येते. शिक्षक संघाचे धोरण आणि कार्यक्रम सर्वस्वी बरोबर असेल असे नव्हे, परंतु आपण मालक असल्याचा आव त्यांनी आणू नये. ज्या शिक्षण अधिकाऱ्यांविरुद्ध शिक्षक संघाची ओरड आहे, ते शिक्षणाधिकारी श्री. महाडिक, फौजदारी कारवायी करण्याच्या गोष्टी बोलून गेले. शिक्षक संघाला कीड लागली असून नासके आंबे या आढीतून बाहेर काढलेच पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. शिक्षण मंडळ सदस्य श्री. म. वि. अकोलकर यांनी संबंधितांना नोकरीतून ताबडतोब मुक्त करण्यात यावे, अशी मागणी केली; तर अध्यक्ष म. ग. शिंदे शिक्षक संघाची मान्यता चालू ठेवावी की नाही, याचा फेरविचार करणे आवश्यक असल्याचे बोलून गेले. शिक्षक संघाने केलेले आरोप सिद्ध करावेत, असे आव्हानही महाडिक देऊन गेले.

आता गुंतागुंत इतकी वाढल्यावर आणि धमकीची भाषा सुरू झाल्यावर शिक्षक संघ कच खातो, का केलेल्या आरोपांना घट्ट चिकटून राहून, अखेरपर्यंत मैदान लढवतो ते आता पाहायचे. ◻

## बॉबी तल्यारखान–तुफान बाँबफेक

बॉबी तल्यारखान हे नाव माहीत नाही असा क्रिकेटशौकीन मिळणे दुर्लभ. तल्यारखान एके काळी उत्कृष्ट कॉमेंट्रेटर म्हणून गाजले. सध्या ते लेखणी चालवतात टाइम्स ऑफ इंडियाच्या आपल्या हुकमी कॉलममधून अधिकारवाणीने विविध क्रीडा-विषयांवर भाष्य करतात.असे हे बॉबी तल्यारखान महाराष्ट्र क्रिकेटमंडळाच्या वार्षिक दिन समारंभासाठी मुद्दाम पुण्याला आले होते. अशा समारंभातून केवळ उपचार म्हणून चार गोष्टी सांगितल्या जातात. बॉबी तल्यारखान मात्र मनमोकळेपणे बोलले. क्रिकेट खेळाडू, क्रिकेट पंच, क्रिकेटविषयक लिहिणारे पत्रकार, अशा सर्व सूत्रांना त्यांनी एकत्र बांधले. देवधर जमान्यातील काही जुने किस्से सांगून वहाव्वा घेतली.

तथापी त्यांचा सर्वात जास्त आक्रमक हल्ला विजयी क्रिकेट वीरांचे स्वागत ज्या पद्धतीने झाले त्या पद्धतीवर होता. शिवाय संघापेक्षा वाडेकर, गावसकर यांच्याभोवती कौतुकाचे जे दिवे ओवाळले गेले, त्याबद्दलही त्यांनी नापसंती दाखवली. वेस्ट इंडीज व इंग्लंड येथील सामने आपण केवळ योगायोगाने जिंकलो असताना एवढ्या अभूतपूर्व स्वागताची गरज होती काय? असा सवालही त्यांनी केला. त्यातूनही समजा कौतुकापोटी क्रिकेटप्रेमी मंडळींनी असा सत्कार केला तर त्यात डावे उजवे कशाला? सत्कार संघाचा करावा. त्यातील केवळ दोघांना असाधरण प्राधान्य देऊन वृत्तपत्रांनी, सत्कारकारांनी काय मिळवले.

मिळवलेल्या विजयांमध्ये सोलकरचा मोठा वाटा होता तरी तो का विसरला गेला? चंद्रशेखरची दौऱ्यातील कामगिरीही गौरवास्पद होती. त्याचा उदो उदो का नको? वाडेकरपेक्षा पतौडी कर्णधर म्हणून जास्त श्रेष्ठ आहे असे माझे अजूनही मत आहे.

तल्ल्यारखान यांची भारतीय क्रिकेटच्या अलीकडील घडामोडींसंबंधीची ही मते काही नवीन नाहीत. परंतु क्रिकेट पंचांच्या वार्षीक समारंभ प्रसंगी ही मते इतक्या धाडसाने ते मांडतील असे वाटले नव्हते. इंग्लंडच्या आगामी दौऱ्यावर भाष्य करताना ते म्हणाले, वाडेकर-गावसकर दोघांनाही आपला फॉर्म कमवावा लागेल.

क्रिकेट पंचांना मार्गदर्शक ठरावेत असे काही मुद्देही त्यांच्या भाषणात आले. खेळाडूंकडून होणारा त्रागा, आणि वृत्तपत्रातील टीका यांचे दडपणाखाली आज पंचमंडळी काम करतात! मैदानावर पंचानी दिलेल्या निर्णयावर क्रिकेट समीक्षकांनी लिहिण्याचे टाळावे. पंचांच्या निर्णयाची वृत्तपत्रीय चर्चा या खेळाला अखेर धोकादायक ठरेल. खिलाडू वृत्तीचा एक भाग म्हणून आपण बाद झाल्याची खात्री झालेला फलंदाज त्वरित तंबूकडे परततो. ही प्रथा योग्य नसून यामध्ये पंचांचा उपमर्द आहे. उपस्थित पंचाने हात वर करून निर्णय दिल्यावरच खेळाडूने मैदान सोडले पाहिजे. क्रिकेट पंचांचा निर्णय नापसंत असला, तरी खेळाडूने मैदानावर त्याचे प्रदर्शन करण्याचे टाळावे. इतर कोणत्याही खेळापेक्षा क्रिकेट पंचाचे काम मोठे क्लिष्ट असते. अख्खा दिवस मैदानावर त्याला खडी तालीम बजवावी लागते. गोलंदाजाने टाकलेल्या प्रत्येक चेंडूची डोळ्यात तेल घालून पाठराखण करावी लागते. या कामाच्या तुलनेमध्ये मिळणारा मोबदला नगण्य असतो. कसोटी सामन्यासाठी किमान पंधराशे रुपये मोबदला दिला गेला पाहिजे.

तोंडदेखले बोलणारांपैकी तल्ल्यारखान नव्हेत. त्यांच्या क्रिकेटविषयक मतांबद्दल विशेषत: खेळाडूंचे मूल्यमापन करण्याच्या पद्धतीबद्दल कदाचित मतभेद असू शकतील. परंतु क्रिकेट पंचांना मार्गदर्शक ठरतील असे मौलिक विचार निर्भीडपणे मांडल्याचे श्रेय त्यांना जरूर द्यावे लागेल.

◻ ◻ ◻

## मद्रासी नाटक

# हरे रामा हरे कृष्णा !– शुद्ध करमणूक !

**नलम्मा संदीरकांदन**

देव आहे की नाही हा वाद खूप जुना आहे. असल्यास नेमका कोण श्रेष्ठ, शिव की विष्णू ? हा पुढचा वाद तयारच असतो. नित्य नव्याने नवनवी माणसे उत्साहाने तो वाद करीत असतात. एक मात्र खरं की संकटाच्या वेळी नकळतच प्रत्येकाला देवाची आठवण होते. संकट टळले की पुन्हा प्रत्येकजण आपापल्या व्यवहारात दंग. 'हरे रामा हरे कृष्णा' ह्या तमीळ नाटकात तसं पाह्यलंच तर राम नाही, ना कृष्ण नाही, ना 'दम मारो दम' म्हणणारे हिप्पीही नाहीत. देवाचे भजन नाही, ना कसले भरीव कथानक नाही. तरीही प्रेक्षकांना तीन तास सतत हसवीत ठेवण्याची जादू त्यात आहे. म्हणूनच चंद्रमौळी ह्यांनी लिहिलेल्या ह्या सामाजिक नाटकाचे अवघ्या चारच महिन्यात शंभर प्रयोग आले आहेत.

वास्तविक मद्रासची 'यूएए' नाटयसंस्था गेली वीस वर्षं नाटके करीत आहे. पण त्यांचे आत्तापर्यंतचे रेकॉर्ड 'हरे रामा' जणू मोडणार आहे. आत्तापर्यंत 'फ्लाईट १७२' हे रहस्यप्रधान नाटक आपला उच्चांक संभाळून होते.

'हरे रामा' कथा आहे एका नवविवाहित जोडप्याची. अगोरम् (महेंद्र) कालच तिरुपतीस विवाह आटोपून, पत्नीस घेऊन घरी परत आलेला आहे. चाळीतील आजूबाजूचे सारे शेजारी म्हणजे एकेक नमुना. ते त्या दोघांना एकांत मिळू देतील तर शपथ ! मंगू (सेतूरामन्) संगीतवेडा, पण त्याला कुठेही 'चान्स' मिळत नाही; म्हणजे गाण्याचा हं ! कुठेही माईकसमोर 'जनगण मन' तरी गायला मिळावे ही किमान अपेक्षा. हा झाला शेजारी क्रमांक एक. माडीवरचा रूकमांगदन् (प्रभू) सदैव ग्रह तारे पाहात, संशोधन आणि मदिरापान करणारा. समोरच्या बिऱ्हाडातील शेशूमणी (दिग्दर्शक ए. आर. श्रीनिवासन्) सदैव थापा देत, पैसे उकळीत फिरणारा गावमामा. तो स्वतःला 'समाज-कार्यकर्ता' म्हणवतो. त्याचे चरितार्थाचे साधन, थापा देणे. उदाहरणार्थ एकदा तो म्हणतो, 'एके दिवशी

मी, मौटबॅटन अन् गांधीजी चौपाटीवर फिरायला गेलों होतो. तेव्हा मी लहान होतो. गांधीजी म्हणाले, 'शेशू, तू राजकारणात शिरशील, ह्यावर कुणी खोटेपणाचा आक्षेप करताच, तो त्याचे वय विचारतो व त्यात एक वर्ष वाढवून म्हणतो, 'ही इतक्या इतक्या वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.'

शेशूची बहिण जयम् (सिवकामी) हिची पोटदुखी निराळीच. नव्या जोडप्याची अद्याप भांडणे कशी सुरू झाली नाहीत? त्यासाठी तीच मग एक खोटे प्रेमपत्र लिहून टाकते. अगोरम्चे वडील पांडुरंगण् (दिग्दर्शक स्वतः वाय. जी. पार्थसारथी) त्या दोघांना एकांत मिळूच देत नाहीत. हो कारण बारा तारखेस त्याची परीक्षा असते, शेवटच्या वर्षाची. जयम्चा प्रौढ भाऊ नारायणन् (लेखक मौली) कुणीतरी आपल्यावर प्रेम करावं म्हणून झुरत असतो. बिचारी नवी जोडी तळमळत चाळकऱ्यांच्या नावाने जणू बोटे मोडीत असते. एवढ्यात माडीवरचा संशोधक जाहीर करतो; १३ तारखेस जगाचा शेवट होणार आहे! शेशू झटपट वर्गणी गोळा करून देवळात भजन, जप आरंभतो न् चार पैसे कमवितो.. नारायण एका टांगेवाल्याला धरून आणून त्यांचा 'कल्की अवतार' बनवितो.. जगच बुडणार म्हणून अगोरम परीक्षेची पुस्तके फेकून देतो; आणि बापासाठी एक सिनेमाचे तिकीट काढून आणतो.. (?) तेवढ्यात तेरा तारखेस खरोखरच वीजप्रवाहात काहीतरी बिघाड होऊन, दिवे उघडझाप करू लागतात. संशोधक 'सक्सेस! सक्सेस' इतका बेभानपणे ओरडतो की, तेथेच त्याचा हार्टफेल होतो, व तो अंगणात कोसळतो. वीजप्रवाह नीट होताच पुन्हा रेडीयो बोलू लागतो. सर्वांचे नित्य व्यवहार पुन्हा सुरू होतात...हरे रामा! हरे कृष्णा! जगबुडीबद्दलचे भजन चालूच राहाते. त्या संशोधक शेजाऱ्याच्या प्रेताजवळ, तोंड झाकून अगोरम् म्हणतो, 'खरंच, आपण सारे वेडे आहोत...आपापल्या वेडामागे धावणारे.. वुई आर नायदर फिट टू लिव्ह, नॉर टू डाय' नाटक इथेच संपते. तीन तास खदखदा हसविणारे नाटक ऐन शेवटच्या क्षणी करुण होते, अन् तोच ठसा मनावर राहातो.

बाहेर पडणारा प्रेक्षकवर्ग हाच विचार करीत बाहेर पडतो की, जगाचा शेवट खरा असो वा खोटा, पण मनुष्याचा शेवट नक्की आहे. तो कधी आहे हे ठाऊक नाही. तरीदेखील प्रत्येकजण शेवटपर्यंत धावत असतो. मनुष्य शेवटी वेडाच तर. जगबुडीच्या प्रीत्यर्थ करावयाच्या भजनात शेशुमणी वर्गणीतून हात ओले करतो, तर तेव्हा गायला मिळणार म्हणून मंगू खूष असतो. नवविवाहित अगोरम् म्हणतो 'मद्रास आता थंड थंड होणार तर! बरं झालं! हनीमूनला जायचं गाडीभाडे वाचले.'

वयस्कर पार्थसारथी हे गाजलेले दिग्दर्शक अन् त्यांचे जोडीस ए. आर. श्रीनिवासन्. दोघेही नाटक सांभाळून नेतात. स्टेजवरती खरे दुमजली घर उभे करण्याचे

पृष्ठ २३ वर

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## फराक्का जिवंत ठेवण्यासाठी ....

गंगा नदीचे तीन विभाग अस्तित्वात आहेत. सुरुवातीची गंगा, मधली भागीरथी व शेवटची हुगळी. फराक्का योजनेनुसार गंगा-भागीरथी जोडून जर कालवे तयार केले; व त्यांची दिशा बदलली की हुगळीत पाणी पडणार कुठले ? हुगळीच्या काठचे कलकत्ता बंदर साहजिकच ओस पडणार. थोडक्यात, फराक्का योजनेमुळे कलकत्ता बंदराला फार मोठा धोका पोचतो ही पार्श्वभूमी.

केंद्रीय मंत्र्यांनी फराक्का योजनेच्या संदर्भात नुकतंच कलकत्यात विधान करून, लोकसभेत बोलण्यासाठी पार्श्वभूमी तयार करून ठेवली आणि प्रत्यक्ष बोलायला उभे राहिले तेव्हा शब्दांच्या कोलांटयातून कलकत्ता बंदराच्या नशिबी जन्मठेपच आहे; 'असे विधान दिखाऊ निराशेच्या सुरात व्यक्त केले. थोडक्यात भाषा इंजिनियरची आणि हुषारी वकीलाची, असे त्यांचे धोरण होते.

कलकत्याचे श्री. देवेश मुखर्जी – एक विद्वान इंजिनियर आणि फराक्का बारेज प्रॉजेक्टचे पूर्वीचे जनरल मॅनेजर यांची प्रतिक्रिया विचारली असता भावनेच्या भरात येऊन त्यांनी म्हटले 'ह्या योजनेशी तिच्या जन्मापासून यशस्वी पूर्णतेपर्यंत माझा संबंध असल्याने फराक्काचा मृत्यू स्वतःच्या डोळयांनी बघताना मला फार दुःख होईल. ही गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष बापाने आपल्या मुलाचा मृत्यू बघण्यासारखे आहे. त्यापेक्षा आपलेच डोळे आधी मिटावेत असे मला वाटते.'

डॉ. राव लोकसभेत म्हणाले – 'फराक्का योजना १९६० मध्ये आखली गेली तेव्हा तिच्यामागे केवळ कलकत्ता बंदराचे संरक्षण हाच एकमेव हेतू होता. फराक्का येथे बांध घालून गंगा व भागीरथी यांना जोडणारा एक कालवा तयार करायचा; ज्यायोगे ४०,०००क्युसेक्स पाणी वाहात राहील व काही अवांतर कामासाठीही ह्याचा उपयोग करता येईल, एवढेच चित्र त्या वेळी तयार होते,' ही पूर्वकल्पना

आणि आता अंमलात येणारी योजना यात काहीतरी परस्पर संगती आहे का? प्रक्रियेचा हा नमुना सरकारने स्वीकृत केला, की डॉ. राव यांच्या मंत्रीमंडळाचे ते एक रोगग्रस्त अपत्य आहे? १९६० मध्ये तयार केलेल्या ह्या योजनेत बदल घडवून आणताना पश्चिम बंग सरकारचा सल्ला घेण्यात आला होता काय? योजनेला नवेच वळण द्यायचे होते; तर एवढा मोठा खर्च करण्यासाठी जो निर्णय घेण्यात आला; तो ह्या योजनेशी संलग्न असणारांचा सल्ला घेऊन उच्च अधिकारी वर्गानेच तो घेणे आवश्यक होते. आज तर इरिगेशन मंत्र्यांच्या विधानामुळे होणारे परिणाम पाहून, कलकत्ता पोर्ट कमिशनर्स देखील अस्वस्थ झाले आहेत.

आता अवस्था अशी झाली आहे की, पूर्वीच्या फराक्का योजनेमागील मूळ उद्देश जो कलकत्ता बंदराचे संरक्षण हा होता त्यात आता निराळीच भर पडली आहे. फराक्का योजनेला आता कालवा-योजना असे निराळेच स्वरूप प्राप्त झाले आहे. संपूर्ण गंगेच्या खोऱ्याचा समावेश आहे. आतापावेतो ३४ मुख्य व १७० गौण कालवे योजना मंजूर झालेल्या आहेत. त्या कोणी मंजूर केल्या? त्या वेळी पाण्याचा प्रवाह बदलविल्याने कलकत्ता बंदराचे संरक्षण होईल अशी कोणी खात्री दिली होती काय? नदीच्या पाण्याची इतर प्रांतीयांनाही गरज आहे असे डॉ. राव म्हणतात. १९६० साली फराक्का योजनेचे स्वरूप आखताना भारत सरकारला ह्या गरजांचा विसर पडला होता काय? अन्य प्रांतात ह्या कालवे योजना भराभर पूर्ण करण्यात येत आहेत. जेणेकरून पाणी-पुरवठा शक्य तितक्या लवकर करता येईल. परंतु फराक्काचे बांधकाम काही ना काही कारणाने लांबणीवरच टाकले जात आहे. कधी कॉन्ट्रॅक्टर हजर नसतात तर कधी लेबर ट्रबल उपस्थित होतो. आता तर डॉ. राव म्हणतात की १९७३ अखेरपर्यंत ह्या कामाला सुरुवातच होऊ शकत नाही.

ह्या सर्वातून निष्कर्ष एकच निघतो की, कलकत्ता बंदराचे नशीब बंदिस्त आहे. गंगेचे पाणी हुगळीत पडेपर्यंत डॉ. राव यांच्या १९७३ अखेर ह्या अनुमानानुसार २०४ कालवे योजना भर वेगात सुरू होतील; आणि त्यांचे जे पाणी कलकत्ता बंदराच्या संरक्षणार्थ राखून ठेवण्यात येणार होते. ते शेतकी विकासासाठी वापरण्यात येईल.डॉ. रावांनी सुकत चाललेल्या बंदरासाठी म्हणून मोठ्या औदार्याने देऊ केलेले पाण्याचे प्रमाण पुरेसे कधीच होणार नाही. कारण बांगला देशला उन्हाळ्यात दिवसात १५००० क्युसेक्स पाणी पुरवठा करू असा आम्हीच शब्द दिलेला आहे. म्हणजे कलकत्ता बंदरासाठी फक्त ५००० क्युसेक्स एवढाच पाणी-पुरवठा मिळणार. ह्या अशा रीतीने बंदराचे संरक्षण (?) करावे असेच डॉ. राव सुचवितात आणि ह्या संरक्षणासाठी पब्लिक फंडातून १५६ कोटी रुपयां-पेक्षाही जास्त खर्च होत आहे. कलकत्ता बंदराच्या हेतुपुरस्सर होणाऱ्या खुनामुळे संपूर्ण पश्चिम बंगालची आर्थिक स्थिती ढासळून पडणार हे निश्चित. परिणामतः

संपूर्ण पूर्व भारतालाच ह्यापासून होणारे नुकसान सोसावे लागणार आहे. ह्या आणीबाणीच्या प्रसंगी जोरदार प्रतिकार करण्याची आवश्यकता आहे. नाहीतर फरा क्याच्या पोषणासाठी कलकत्ता बंदराचा बळी देण्याचा दुर्धर प्रसंग ओढवल्या खेरीज राहणार नाही !

## आकडेवारीचे नृत्य

पश्चिम बंगालमध्ये हिंसाचाराचे प्रस्थ माजण्यापूर्वी वर्षाला साधारणपणे सहाशे खून पडत. १९६८ मध्ये ही संख्या ६३१ होती आणि १९६९ मध्ये तिचे प्रमाण ७०९ पर्यंत चढले. आणि तेव्हापासून सुस्थितीला उतरती कळाच लागली. गृहमंत्री श्री. सुब्रत मुखर्जी यांच्या हिशोबानुसार जानेवारी १९६९ पासून मार्च १९७२ पर्यंतच्या ३८ महिन्यात पश्चिम बंगालमध्ये एकूण २४१५ खून पडले. उत्तर प्रदेशाच्या मानाने ही संख्या कमीच झाली. १९६३ मध्ये उत्तर प्रदेशात २९२८ माणसे खुनाला बळी पडली; व १९६९ मध्ये ३१४७ पर्यंत ही संख्या वाढली. भारतातील पाच-सहा राज्ये ह्या बाबतीत पश्चिम बंगालपेक्षा वरचढ असावीत. क्राईम स्टॅटिस्टिक्सनुसार हेच प्रत्ययाला येते की, पश्चिम बंगालचे नाव ह्या बाबतीत जितके बदनाम झाले आहे त्यामानाने खुनांचे प्रमाण पुष्कळच कमी आहे.

आणि ही बदनामी वाटचाला येण्याचे मुख्य कारण म्हणजे येथे राजकीय खून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर घडून आले. गृहमंत्र्यांनी स्पष्ट सांगितले की त्या ३८ महिन्यात जे २४१५ खून पडले त्यापैकी १७५१ केवळ राजकीय पातळीवरचे होते. १९६९ मधील १०८ ते १९७१ मधील १७५१ हे खुनांच्या वाढीचे जबरदस्त प्रमाण गणिताच्या भाषेत सांगायचे झाल्यास जॉमेट्रिकल प्रोग्रेशननुसार वाढत गेले. यावरून हे स्पष्ट होते की, अ-राजकीय खुनांचे प्रमाण फारच कमी कमी होत गेले. यापुढे आता केवळ राजकीय स्थैर्य प्रस्थापित झाले आहे; म्हणून खून पडणारच नाहीत असे धरून चालणे मात्र चुकीचे ठरू शकेल. कारण समाजात वावरणाऱ्या पैशाच्या प्रलोभनास्तव खून करण्यास प्रवृत्त होणाऱ्या लोकांना गेल्या तीन वर्षात अशा वागण्याने फार फायदा झालेला आहे. तीच प्रवृत्ती पुन्हा बळावणार नाही कशावरून ? म्हणूनच आमच्या सरकारने राज्यात शांतता प्रस्थापित झाली असली तरीदेखील निश्चित असू नये. उलट ह्या बाबतीत जागरूक राहणेच आवश्यक आहे.

## एक सिंहावलोकन

अलीकडे लहान मुलांच्या चित्रांची प्रदर्शने म्हणजे एक नित्याचा कार्यक्रमच झाला आहे. पेन्सिल किंवा ब्रश चालवून कागदावर चित्रित केलेला बाल कल्पना-

विलास बघताना मोठी गंमत वाटते. त्यांच्या बालिश कलाकृती अनेकदा सराईत चित्रकाराइतक्याच श्रेष्ठ दर्जाच्या वाटतात. दरवर्षी ह्या चित्रप्रदर्शनात अधिकाधिक भर पडत असते. त्यामुळे अधिकाधिक बालकलाकारांना आपले नैसर्गिक कौशल्य व्यक्त करण्याची संधी सुलभतेने प्राप्त होते. त्यांच्यातील सुप्त कलाकार जगासमोर दृश्य स्वरूपात साकार होतो. बालकुमारांच्या चित्रांची प्रदर्शने भरवून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम स्वातंत्र्योत्तरच सुरू झाले असा एक दृढ समज आहे. पण तो खरा नव्हे ! कारण–

एकदा श्री. दिनेश भट्टाचार्य–रेल्वेचे एक साधे कर्मचारी–यांची भेट झाली. वयाच्या उतरणीला लागलेले हे गृहस्थ, कलेमध्ये विशेष गम्य नसलेले ! पण ते साधार प्रतिपादन करतात की कलकत्त्यात बालकलाकारांची समाजाला ओळख करून देणारी पहिली व्यक्ती ते स्वतःच आहेत. वयाच्या चाळीशीत ' गव्हर्मेंट कॉलेज ऑफ आर्ट 'चे विद्यार्थी असताना त्यांनी ३१, शोभाबझार स्ट्रीट येथे ' किशोर आलेख्य सम्मेलन ' नावाची संस्था स्थापन केली; आणि १९४३ साली कलकत्त्यातील पहिले वाहिले बालकलाकारांचे चित्र प्रदर्शन आयोजित केले. ह्यात ४० बालकांनी भाग घेतला होता. ही संख्या वाढत वाढत १९५० मध्ये २५० पर्यंत गेली. ह्या संस्थेचे आधारस्तंभ म्हणजे आज मान्यता पावलेले अनेक महान् चित्रकार होत. त्यात श्री. रामेन्द्रनाथ चक्रवर्ती, श्री. बिमल रॉय, श्री. पी. सी. लाहिरी आदी उल्लेखनीय.

श्री. भट्टाचारी त्या भूतकाळाकडे आजही मोठ्या आत्मीयतेने, कौतुकाने बघतात. ते म्हणाले, खिशातला शेवटचा पैसा खर्च होईपर्यंत न चुकता दरवर्षी हिवाळ्यात बालकलाकारांच्या रम्य आविष्काराची प्रदर्शने त्यांनी घडवून आणली आणि दर उन्हाळ्यात स्पर्धा जाहीर केल्या. मात्र अखेर अगदीच नाइलाज झाला आणि कौटुंबिक जीवनाचे कर्तव्य पार पाडण्याच्या जबाबदारीने त्यांना ह्या आनंद देणाऱ्या कलाविश्वापासून दूर दूर खेचत नेले ! ...

सत्तेसाठी लोकशाही संकेतांचा बळी

# ओ रि सा

## नवकाँग्रेस अधिकारावर आली म्हणून अस्थिरता संपली असं समजणं चूक ठरेल.

**वा. दा. रानडे**

विरोधी पक्षांची सरकारे पाडण्याचा काँग्रेसचा खेळ ओरिसात यशस्वी होऊन तेथील स्वतंत्र पक्ष व उत्कल काँग्रेस यांचे संयुक्त मंत्रिमंडळ गडगडले; व श्रीमती नंदिनी सत्पथी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकार अधिकारावर आले. ज्या पद्धतीने हा सत्तापालट झाला, त्यावरून सत्तेसाठी हपापलेल्या संधिसाधु आयाराम-गयारामांची साथ अजून संपलेली नाही, हे पुन्हा एकदा दिसून आले.

ओरिसा हे देशातील अस्थिर राज्यांपैकी एक आहे. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून गेल्या वीस वर्षांत तेथे नऊ मंत्रिमंडळे गडगडली. पाच वर्षांची मुदत संपेपर्यंत एकही सरकार अधिकारावर राहू शकले नाही. कोणत्याही पक्षामागे स्थिर बहुमत नसले तर संधिसाधूंचे फावते. जो पक्ष जास्त प्रलोभने किंवा आमिषे दाखवील, तिकडे हे लोक वळतात. त्यामुळे एकामागून एक सरकारे गडगडतात; व याच लोकांच्या पाठिंब्याने नवी बनविली जातात. या संधिसाधूंना पक्षनिष्ठा नसते. सत्तेची खुर्ची कधी सोडावयाची नाही, मग त्यासाठी बाकी सारे सोडावे लागले तरी त्याला त्यांची तयारी असते. सत्तेच्या खुर्चीशी ते एकनिष्ठ असतात.

बिजू पटनाईक यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने १९६१ साली जिंकलेली निवडणूक सोडली तर ओरिसात काँग्रेस पक्ष कधीच प्रबळ नव्हता. १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसला १४० पैकी फक्त ३० जागा व ३०·३८ टक्के मते मिळाली होती. काँग्रेसच्या अपयशाची ही सर्वात जास्त घसरगुंडी होती. १९६१ मध्ये काँग्रेसला विजय मिळवून देणारे बिजू पटनाईक व त्यांच्यामागून मुख्यमंत्री झालेले बिरेन मित्र यांच्या भ्रष्ट कारभारामुळे काँग्रेस जनतेत अत्यंत अप्रिय झाली होती. राज्यात

आपल्या हाती सत्ता पुन्हा कशी मिळविता येईल, या दृष्टीने १९६७ च्या पराभवा-पासूनच काँग्रेस नेत्यांनी हालचाली सुरू केल्या होत्या. काँग्रेसमधील फुटीनतर बिजू पटनाईक यांच्या नेतृत्वाखालील उत्कल काँग्रेसने इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस किंवा संघटना काँग्रेस यापैकी कोणालाही न मिळता राज्यापुरता स्वतःचा सवतासुभा ठेवला होता. यामागे काही मोठी तात्त्विक भूमिका किंवा तत्त्वनिष्ठा होती असे नव्हे. देशात कोणत्या काँग्रेसला अधिक पाठिंबा आहे हे पहावे व कालां-तराने जिकडे फायदा होईल तिकडे जावे. दरम्यान राज्यातल्या प्रश्नांवर भर देऊन राज्यपातळीवर तामिळनाडूच्या द्रविड मुन्नेत्र कळघमप्रमाणे आपला पक्ष बलवान करावा अशा बिजू पटनाईक यांच्या हालचाली होत्या. काँग्रेसमध्ये फूट पडली त्यावेळी विधानसभेत काँग्रेसचे ३२ आमदार होते. त्यापैकी २३ पटनाईकांच्या उत्कल काँग्रेसला, ७ इंदिरा काँग्रेसला आणि फक्त २ संघटना काँग्रेसला मिळाले.

## जनकाँग्रेसला सुरुंग

अशा परिस्थितीत कोणाच्या पाठिंब्याने आपले बळ वाढविता येईल असा इंदिरा काँग्रेसपुढे प्रश्न होता. राज्यात त्यावेळी स्वतंत्र पक्ष आणि जनकाँग्रेस यांच्या आघाडीचे सरकार होते. पटनाईकांची उत्कल काँग्रेस आपल्यात सामील होत नाही हे स्पष्ट होताच जनकाँग्रेसला आपल्यात ओढण्याचे प्रयत्न इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी सुरू केले. ओरिसाचे माजी मुख्यमंत्री हरेकृष्ण मेहताब यांनी १९६७ च्या निवड-णुकीपूर्वी काँग्रेसमधून जनकाँग्रेस स्थापली होती. मेहताब गटाला आपल्यात ओढून जनकाँग्रेसला सुरुंग लावण्यात इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना यश आले. स्वतंत्र पक्ष आणि जनकाँग्रेस यांची सत्तारूढ आघाडी फुटली. ओरिसात राष्ट्राध्यक्ष राजवट आली व तेथे १९७१ साली लोकसभा निवडणुकीबरोबरच विधानसभा निवडणुका घेण्यात आल्या. निवडणुकांपूर्वी जनकाँग्रेसमधील मेहताब यांचा गट इंदिरा काँग्रेस-मध्ये सामील झाला. दुसऱ्या गटाने आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवले व जनकाँग्रेसच्याच तिकिटावर निवडणुका लढविल्या, पण जनकाँग्रेसला राज्यात काही स्थान राहिलेले नाही; हे निवडणूक निकालांनी सिद्ध केले. त्या पक्षाला फक्त एक जागा मिळाली.

मेहताब गटाच्या पाठिंब्याने निवडणुकांत बहुमत मिळवून राज्यात पुन्हा सत्ता-रूढ होण्याचा इंदिरा काँग्रेसचा मनसुबा मात्र साध्य झाला नाही. इंदिरा काँग्रेसला ५२ जागा मिळाल्या. सरकार बनविण्यासाठी आणखी किमान १९ सभासदांचा पाठिंबा आवश्यक होता. तो मिळू शकला नाही. याउलट बिजू पटनाईक यांच्या उत्कल काँग्रेसने स्वतंत्र पक्षाशी युती केली व त्या आघाडीचे सरकार अधिकारावर आले. स्वतंत्र पक्ष ३५, उत्कल काँग्रेस ३१, झारखंड ४ व अपक्ष ४ अशा ७४ सभासदांचा पाठिंबा या सरकारला होता. राज्यात चार पोटनिवडणुका झाल्या, त्या सर्व सत्तारूढ आघाडीने जिंकल्या व तिचे पक्षबळ ७८ पर्यंत वाढले.

दरम्यान इतर पक्षात फूट पाडून पुन्हा सत्तारूढ होण्यासाठी इंदिरा काँग्रेसच्या

हालचाली चालूच होत्या. १९७२ च्या निवडणुकात इंदिरा कॉंग्रेसला मोठा विजय मिळाल्यानंतर या हालचालींना अधिकच जोर आला. इंदिरा कॉंग्रेसने प्रथम प्रजा-समाजवादी पक्षाशी युती केली; व या युतीचे पर्यवसान अखेर तो पक्ष इंदिरा कॉंग्रेसमध्ये विलीन होण्यात झाले. प्र. स. पक्षाचे चार आमदार मिळाल्याने इंदिरा कॉंग्रेसचे बळ ५२ वरून ५६ पर्यंत वाढले. यानंतर स्वतंत्र पक्ष, उत्कल कॉंग्रेस व झारखंड पक्षाचे काही सभासद फोडण्याच्या कारवाया सुरू झाल्या. त्यात यश येऊन स्वतंत्र पक्षाचे ६ व उत्कल कॉंग्रेसचे ३ सभासद फुटले. या बंडखोरांमध्ये एक मंत्री व दोन उपमंत्री होते. झारखंड पक्षाच्या सभासदांनीही कॉंग्रेसला पाठिंबा जाहीर केला.

## संकेत धुडकावले

या फाटाफुटीनंतर मंत्रिमंडळाला बहुमताचा पाठिंबा आहे की नाही हे अजमावण्यासाठी २३ जूनला विधान सभेची बैठक बोलावण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला व राज्यपालांना तशी शिफारस केली. बहुमत गमावलेल्या मुख्य मंत्र्यांना राज्यपालांना सल्ला देण्याचा अधिकारच राहिलेला नाही. त्यांनी सरळ राजिनामा द्यावा. राजिनामा देत नसल्यास राज्यपालांनी मंत्रिमंडळ बडतर्फ करावे; आणि कॉंग्रेसला मंत्रिमंडळ बनविण्याची संधी द्यावी अशी कॉंग्रेस पक्षाचे नेते विनायक आचार्य यांनी मागणी केली. ही मागणी कितपत योग्य होती? राज्यपाल केंद्र सरकारच्या सूचनांनुसार वागतात. आपल्याला नको असलेले सरकार पाडण्यासाठी व हवे असलेले सरकार अधिकारावर आणण्यासाठी त्यांचा उपयोग केंद्र सरकार करते अशी टीका अनेकदा झालेली आहे. राज्यपालांसाठी काही मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यासाठी विचार चालू आहे; असे आश्वासन केंद्रीय गृहखात्याचे राज्य-मंत्री के. सी. पंत यांनी १९–११–७० ला लोकसभेत दिले होते. राज्यपाल परिषदेत राज्यपालांची एक समितीही यासाठी नेमली होती पण अजून अशी मार्ग-दर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली नाहीत. ही तत्त्वे केव्हा ठरायची असतील तेव्हा ठरोत. पण काही थोडे सभासद फुटण्याने सरकारमागे असलेल्या बहुमता-बद्दल अनिश्चित परिस्थिती निर्माण झाली असेल तर; राज्यपालांनी स्वतः याबाबत कोणताही निर्णय न घेता विधान सभेची बैठक तातडीने बोलावून त्यात सरकार-बहुमतात आहे की नाही हे अजमावले पाहिजे, हा संकेत रूढ होणे आवश्यक आहे. ओरिसाच्या राज्यपालांना हा संकेत कळला नाही. विधान सभेची बैठक बोलावण्याच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यावर निर्णय घेण्यास त्यांनी विलंब लावला. मंत्रिमंडळाने सुचविलेली तारीख लांबची वाटत असेल; तर त्यांनी ती अलीकडे ओढायला हवी होती; पण जरा थांबा, घाई करू नका. आणखी फाटाफूट होणार आहे. विधान सभेची बैठक बोलावण्याची वेळच येणार नाही असा अनधिकृत सल्ला त्यांना कॉंग्रेस गोटातून मिळाला असावा; व त्यांनी तो ऐकला असे दिसते.

सत्तारूढ आघाडीतील उत्कल काँग्रेसच्या ३२ सभासदांचा पूर्ण गटच २ जूनला फुटला व काँग्रेसमध्ये सामील होण्याचा निर्णय त्याने घेतला. एवढ्या मोठ्या फाटाफुटीनंतर मंत्रिमंडळाने बहुमत गमावले याबद्दल काही शंकाच राहिली नाही. तेव्हा मुख्यमंत्री विश्वनाथदास यांनी मंत्रिमंडळाचा राजिनामा सादर केला.

## खरी वस्तुस्थिती ही आहे

"इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे हे जनतेने दिलेला कौल आणि सुप्रीमकोर्ट व निवडणूक कमिशनच्या निर्णयाने स्पष्ट झाले आहे; म्हणून काँग्रेसमध्ये आम्ही सामील होत आहोत असे विलीनीकरणाच्या ठरावात उत्कलकाँग्रेसने म्हटले आहे. "आईच्या घरी आम्ही परत येत आहोत; झाल्या गेल्या गोष्टी तिने उदारमनाने विसराव्या " असे उत्कल काँग्रेसपक्षाचे विधीमंडळातील नेते राऊत रॉय यांनी सांगितले. पक्षाचे वतीने तुमचे व इतर समाजवाद्यांचे आम्ही स्वागत करतो; असे पत्र ओरिसा प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष ब्रजमोहन महंती यांनी राऊत रॉय यांना पाठविले. इंदिरा गांधींची कांग्रेस हीच खरी काँग्रेस आहे हे वास्तविक १९७१ च्या लोकसभा निवडणुकांनीच सिद्ध झाले. निवडणूक कमिशन व सुप्रीम कोर्टाच्या निर्णयालाही बरेच महिने झाले. मग इंदिरा काँग्रेसमध्ये सामील होण्याचा निर्णय उत्कल काँग्रेसने त्याचवेळी का घेतला नाही ? तेव्हा हे कारण खरे नाही. आपली सत्ता टिकविण्यासाठी काँग्रेसमध्ये जाण्याशिवाय दुसरा मार्ग राहिलेला नाही म्हणूनच उत्कल काँग्रेस, काँग्रेसमध्ये सामील झाली; ही खरी वस्तुस्थिती आहे.

'तुमचे व इतर समाजवाद्यांचे आम्ही स्वागत करतो' ही ओरिसा प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षांची भाषाही मानभावी आहे. उत्कल काँग्रेसचे लोक समाजवादी केव्हापासून झाले ? हे लोक समाजवादी असते तर त्यांनी आतापर्यंत स्वतंत्र पक्षाशी केलेली युती समाजवादात कशी बसते ? आणि हे लोक समाजवादी असतील तर मेहताब गटाऐवजी काँग्रेसने त्यांच्याशीच युती का केली नाही ? तेव्हा समाजवादाची भाषा ढोंगीपणाची असून सत्तेसाठीच ही सोयरीक झालेली आहे हे उघड आहे.

ओरिसात सत्ता मिळविण्यासाठी काँग्रेस नेत्यांनी शिस्त व लोकशाही संकेत गुंडाळून ठेवले. पक्षांतराला आळा घालायचा असेल तर पक्षांतर केलेल्या सभासदांनी विधान सभेचे राजिनामे देऊन, नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे हा लोकशाही संकेत सर्व पक्षांनी पाळला पाहिजे. पण हा संकेत न पाळता संधीसाधु आयारामना पक्षात सरळ प्रवेश देण्यात आला. पक्षांतर केलेल्यांना किमान एक वर्ष मंत्रिपद किंवा कोणतेही अधिकारपद दिले जाणार नाही; हा संकेतही काँग्रेसने पाळला नाही. फुटीर गटाचे नेत्यांना लागलीच मंत्रिपदे देण्यात आली. श्रीमंती नंदिनी सत्पथी यांच्या मंत्रिमंडळात राऊत रॉय (उत्कल काँग्रेस),

च गंगाधर प्रधान (स्वतंत्र पक्ष) यांचा समावेश, याच उद्देशाने केला आहे. राऊत रॉय यांना बिजू पटनाईक यांच्याबरोबरच पक्षातून सहा वर्षे काढून टाकले होते; पण राऊत रॉय यांना नुसते पक्षात घेतले एवढेच नव्हे तर मंत्रिपद देण्यात आले.

ओरिसा काँग्रेसमध्ये श्रीमती नंदिनी सत्पथी यांचा गट व विनायक आचार्य यांचा गट असे दोन गट आहेत. सत्पथी यांच्या मुख्यमंत्रिपदास आचार्य यांनी मान्यता दिली असली; तरी हे दोन गट व त्यांच्यात नव्याने सामील झालेला उत्कल काँग्रेसचा गट यांच्यात सत्तास्पर्धा चालूच राहील. सध्या काँग्रेसच्या हाती सत्ता आली असली; तरी ओरिसातील अस्थिरता संपली असे मानण्याचे कारण नाही. सत्तेसाठी हपापलेले संधिसाधु केव्हा दगा देतील व आयारामचे गयाराम बनतील याचा नेम नाही.

□ □ □

## अय्यय्यो मदरास....

पृष्ठ १४ वरून

सेटिंग्जचे वैशिष्टय पाहायला मिळते. गॅलरीतून खालच्या भाडेकऱ्यांशी रूकमांगदन कठड्यावर रेलून गप्पा करतो. वर जाण्याच्या जिन्यात वाकड्यातिकड्या सायकली अन् एक उभी केलेली बाज ही वास्तवता. नवविवाहित अगोरम कॉलेजात जाताना पत्नीचा पुनः पुन्हा निरोप (?) घेतो. ती पण एखाद्या मॉंटेसरीच्या मुलाप्रमाणे त्याला पुन्हा पुन्हा 'नीट जा व लौकर ये' म्हणते. वास्तविक हे सारे घरासमोरच्या अंगणातच चाललेले असते. तो उगीचच 'जाऊ का मग' विचारीत परतत असतो. इतका वेळ दाराच्या आडून फटीला डोळे लावून ताटकळलेले सारे शेजारी एकाच क्षणी बाहेर येऊन, जोरात कोरसमध्ये 'प्पो' (म्हणजे 'जा') म्हणतात तेव्हा तर सारे थिएटर हसण्याने हादरते.

ह्याच मंडळींनी १९६८ मध्ये मुंबईस तीन नाटके केलेली, आत्तापर्यंत विसरून गेलेले असाल तुम्ही! कन्नन वंदान व अंडर सेक्रेटरी ही नाटके तेव्हा झाली होती. येत्या आक्टोबरात 'हरे रामा' मंडळी मुंबईस येणार आहेत. वाट पहाणार ना? कुठे? चेंबूरला.. आणि तुमच्या पुण्यालाही...रास्ता पेठेत!

□ □ □

ज्या देशाचे आरमार प्रबल असेल तोच देश व्यापार
आणि संरक्षणात यशस्वी होतो,
हेच युरोपचा गेल्या हजार वर्षांचा इतिहास सांगतो.
केवळ आरमाराच्या जोरावर
ब्रिटनने निम्म्या जगावर राज्य केले.
व्यापार जिंकला.
जर्मन-फ्रेंच-डच-पोर्तुगीजांना पाणी पाजले.
आज रशिया हेच करू पाहात आहे.
आपण मात्र सहा वर्षांच्या 'अल्पावधीत' एक अजस्त्र (?)
युद्धनौका 'निलगिरी' समुद्रात तरंगू लागली म्हणून
सोहळे साजरे करू या... टाळ्या वाजवू या.

---

# सागरी वर्चस्वासाठी रशियाचे प्रयत्न !

एकोणीसशे सत्तरच्या सुरुवातीला अमेरिकन लष्करी हेरखात्याला—पेंटॉगॉनला एक खळबळजनक माहिती मिळाली. काळ्या समुद्रातील रशियाच्या निकोलायेव्ह बंदरामध्ये सोविएत नौदलाच्या शिपयार्डमध्ये एका वैशिष्ठ्यपूर्ण अजस्त्र बोटीची बांधणी चालू आहे. तेव्हा पासून सदर बोटीचे फोटो मिळविण्याचे पेंटॉगॉनने अवकाश हेरांतर्फे, उपग्रहांद्वारे शर्थीचे प्रयत्न सुरू केले. जस जसा या बोटीचा सांगाडा आकार घेऊ लागला तस तशी नवीन नवीन माहीती उपलब्ध होऊ लागली. बोटीचे अवाढव्य एलीव्हेटर – प्रचंड तेलटाक्या – उंचसपाट डेक. तेव्हा मागच्या डिसेंबरमध्ये अमेरिकन लष्करी हेरखात्याने महत्त्वाचा अंदाज वर्तवला की, 'रशियाने स्वत:ची पहिली अॅटॅक कॅरीयर बांधण्यास सुरुवात केली आहे.' कदाचित ती बोट म्हणजे अवाढव्य तेलवाहू नौकाही असेल किंवा मालवाहू नौकाही असेल. पण अमेरिकन लष्करी खाते आणि अमेरिकेची दोस्त राष्ट्रे मात्र खात्रीपूर्वक सांगत आहेत की, 'ती रशियाची पहिली अॅटॅक कॅरीयरच आहे.'

काल परवापर्यंत अमेरिकन अॅटॅक कॅरीयरसना 'तरंगत्या शवपेटीका' किंवा 'तलावात विहार करणारी बदके' म्हणून हिणवणाऱ्या सोविएत नौदलाने जर

स्वतःची अॅटॅक कॅरीयर बांधण्यास सुरुवात केली असेल तर, मॉस्कोच्या नौदल-विषयक धोरणात नाट्यमय आणि मूलभूत बदल झाल्याचे ते द्योतक ठरेल. एके-काळचा मॉस्कोमधील अमेरिकेचा नेव्हल अॅटॅची आणि ' सोविएत रशियाचे नौदल विषयक धोरण ' या ग्रंथाचा लेखक कमांडर रॉबर्ट वॉरींग हेरीक म्हणतो ' खेळाचा सारा रंगच बदलला आहे.

रशियाच्या मागच्या दशकातील जहाज बांधणीच्या जलद कार्यक्रमात सोविएत नौदलाची भूमिका प्रामुख्याने बचावात्मक होती. त्याचा मुख्य हेतू रशियन भूमीचा लक्ष्यवेध घेणाऱ्या क्षेपणास्त्रांनी सुसज्जीत अमेरिकन पोलरीस पाणबुड्यांना प्रतिबंध करणे. स्वतःचे सागरीमार्ग आणि सागरी हितसंबंध यांचा बचाव करणे; एवढाच मर्यादीत होता. पण आज रशियाच्या नौदलात क्रूझरच्या आकाराच्या दोन हेलीकॉप्टर सपोर्ट कॅरीयर आधीच दाखल झाल्या आहेत. तशा आणखीन काही बोटींची बांधणीही जलद चालू आहे. या व्यतिरिक्त अॅटॅक कॅरीयरची बांधणी चालूच आहे. याचा इत्यर्थ हा की, सोविएत नौदलाने आपले पहिले बचावात्मक धोरण सोडून आक्रमक धोरण स्वीकारले आहे. सोविएत नौदलाच्या या नव्या पवित्र्याने अमेरिकेच्या सागरी प्रभूत्वाला धक्का बसला असून; दोन्ही नौदलात जीवघेण्या स्पर्धेला सुरुवात झाली आहे. आणि याचे प्रत्यंतर एकाहत्तरच्या संरक्षण खात्याच्या वाढलेल्या अंदाजपत्रकात दिसलेले आहे. ◻

## रशियाचे नवे पवित्रे

आज सोविएत आरमारात अॅटॅक कॅरीयर नसतानाही एरवीच सोविएत आरमाराचा राजकीय आणि मानसिक प्रभाव जबर आहे. कारण त्या मागे उभी असलेली सोविएत लष्करी आणि हवाई ताकद होय. आजच रशियाकडे १५१० इंटर कॉंटीनेंटल बॅलेस्टीक मिसाइल्स आहेत; त्याचे अमेरिकेशी तुलनात्मक प्रमाण, रशियाकडे ३ तर अमेरिकेकडे दोन या प्रमाणात आहे. या हुकमाच्या एक्क्या व्यतिरीक्त रशियाच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा वीस लाखाच्या खड्या सैन्याचा दरारा आहेच. रशियन हवाईदल तर सतत पाश्चात्य देशांची ताकद अजमावून पाहात असते. गेल्या वर्षात म्हणजे एक्काहत्तर सालात केवळ ब्रिटनच्याच हवाईहद्दीचा रशियन बॉम्बर्सनी तीनशे वेळा भंग केल्याची ब्रिटनची तक्रार आहे. अशा परिस्थितीत सोविएत नौदलाच्या नव्या पवित्र्याने अमेरिकन सागरीप्रभुत्व गौण ठरू लागले आहे. जागतिक रंगभूमीवरील ' लाल काफिल्याचे आगमन ' म्हणजे रशियाच्या पोलादी इच्छाशक्तीचे आणि निर्धाराचेच प्रतीक आहे. इंटर-नॅशनल इन्स्टीटयुट ऑफ स्ट्रॅटेजीक स्टडीजचा डेप्युटी डायरेक्टर, ब्रिगेडीयर केनेथ हंट हा नेहमी आपल्या अमेरिकन मित्रांना बजावतो—' लक्षात ठेवा तुमचे आरमार अजूनही जगात दुसऱ्या क्रमांकाचेच आहे. पृष्ठ ४३ वर

# कविता

## सौंदर्याचे नाव कशाला

वर्तमान पळतोय
वाढवून भलता
लोकपसारा...
जिवंत देहा प्रेते
समजुन ..
आज चालली
स्मशानभरती...
सौंदर्याचे...
नाव कशाला
जळून चाललाय
मोर पिसारा...

— महावीर जोंधळे

## भीक

नाही मागणार भीक
नको पोरक्याचे दान
नसे जितेपणासाठी
माझी दुबळी तहान
जन्मा घातलेस तेव्हा
आता सांभाळ विटाळ
माझ्या प्राक्तनाच्या रेषा
तूच हव्या तशा पीळ

— कल्याण इनामदार

## कळ

शूर तरुणांचे रक्त
इथे मातीत सांडले
कण मातीचा बोलतो
'देशा स्वराज्य लाभले'— १

काळ चालता चालता
लुप्त वीस वर्षे झाली
सुराज्याची सुखस्वप्ने
अश्रुजलात विरली — २

भूक पोटात ठेवून
मार्ग चालतो गतीचा
मागे पाहता वळून
ठाव नाही प्रगतीचा — ३

तप्त रक्ताची ओंजळ
तुझ्या पायाशी वाहिली
साऱ्या रक्तवेदनांची
कळ मातीत उठली — ४

— शशिकांत राजदेरकर

## आस्वाद

'सौंदर्याचे नाव कशाला' ही महावीर जोंधळे यांची कविता म्हणजे वर्तमानाच्या वास्तव जाणीवेवर टाकलेला एक कवडसा आहे. वाढलेला लोकपसारा आणि

जिवंत देहांना प्रेते समजण्याची वृत्ती ही जाणीव तसे म्हटले तर जुनीच. पण 'आज चालली स्मशानभरती ...' हा आविष्कार मात्र निराळा. कवीचा स्वतःचा पूर्वपरिचित वास्तव समाजसत्याची जाणीव कवीला स्वतःपुरती तीव्र नाविन्याने झालेली आहे. म्हणून 'जळून चाललाय मोर पिसारा ...' हा आक्रोश प्रामाणिक आहे. वास्तवाच्या कठोरतेचे धगधगीत दर्शन वगैरे घडवणारा नसला तरी खरे-पणाचा प्रत्यय देणारा आहे. आपल्या मनःप्रखर जाणिवेच्या कक्षा उचलून रुंदा-वण्याचा अथवा गिरवून गडद करण्याचा कवीने कृत्रिम प्रयत्न केलेला नाही हेही कौतुकास्पदच.

'भीक' या कवितेत कल्याण इनामदार यांनी मात्र अत्यंत भेदक विलक्षण-पणाने आपली व्यथा मांडलेली आहे. भीक न मागण्याचा निर्धार कवीनें आता केला आहे; कारण त्याला पोरवयाचे दान नको आहे. केवळ जितेपणाची दुबळी तहान त्याला नाही. ज्याने जन्माला घातले त्या ईश्वराने आपला विटाळ सांभाळावा ही रोखठोक अपेक्षा या बेदरकार अस्मितेतून उद्भवली आहे. 'माझ्या प्राक्तनाच्या रेषा तूच हव्या तशा पीळ' हे म्हटलें तर आव्हान आहे, म्हटले तर ती स्वतःच्या निर्लेपपणाची खणखणीत जबानी आहे. या कवितेच्या आठ ओळीत फार मोठ्या व्यक्तिमत्त्वाचा निर्धार समर्थपणे पेलण्याचे सामर्थ्य आहे. अर्थपूर्ण, परिणामकारक, नेटकी आणि पारदर्शक भाषा इथे आहे.

शशिकांत राजदेरकर यांची 'कळ' ही कविता तालबद्ध भावदर्शन घडविणारी आहे. त्यातील दुसरे आणि तिसरे कडवे केवळ स्पष्टीकरणात्मक आहे. त्यातही सुखस्वप्ने अश्रुजलात विरणे आणि भूक पोटात ठेवून गतीचा मार्ग चालणे या कल्पना भावस्पर्शी आहेत. पण कवीच्या भावनेची खरी हृद्यता व्यक्त होते, ती पहिल्या आणि शेवटच्या कडव्यात. शूर तरुणांचे रक्त सांडलेल्या मातीची भाषा पहिल्या कडव्यात आहे; आणि शेवटी कवीच्या मनाची प्रतिवेदना या मातीच्या भाषेशी हितगुज करते आहे. तिची कळ जाणून घेते आहे. कारण कवीने तप्त रक्ताची ओंजळ या मातीला वाहिलेली आहे. कवितेच्या आशयाला एकदम उच्चता देणारा हा अनुभव आहे.

— रसिक

## एका घराण्याची ही जीवघेणी सत्यकथा

कशानं तरी एकदा फिरायला लागलेले वासे थांब म्हटलं तर थांबत नाहीत. वासे फिरले, की माणसंही बदलायला लागतात. दयेची जाण तोंड लपवते आणि मग मामा, मामा रहात नाहीत. मावशी, मावशी म्हणू देत नाही. मग रहातं नुसतं घर.

# संध्यासमईचे सूर.....

महावीर जोंधळे

आणि तोही दिवस संपला. दीपावलीच्या मंगलमय पर्वणीचा दुसरा दिवसच असावा तो.

त्या सकाळी–हो, त्या सकाळीच पिल्ल्या वारकानं हाळी दिली–

"माल ऽ कय् !"

त्याच्या हाळीने घरातील सारे जागे झाले. आईपासून वहिनीपर्यंत. आईनं आणि वहिनीनं सगळ्यांच्या अंगाला तेल चोळलं. कढत पाण्यानं आंघोळी घातल्या–

अंगणात दारूकामाचे फवारे उडाले !

अग्निबाण आकाशाचे वेध घ्यायला निघाले !!!

रॉकेट चंद्राच्या दिशेने सुटले !!!!

आणि फुलबाजे सुवर्णकण उधळू लागले......

माझी वहिनी नखशिखांत नटली होती. भरजरी शालू, हातांत होत्या गोठ-पाटल्या, बोटात मोहोरेची आंगठी, गळचात एकदाणी, टिक्का, चपलाहार–फळा-फुलांनी झाड लगडावं तशी ती दागिन्यांनी लगडून गेली होती–

–लक्ष्मीपूजनाच्या दिवशी त्या सकाळी–

वहिनी मामंजींच्या पाया पडली–



सासूबाईच्या पाया पडली–

आमच्या घरची लक्ष्मी तिच्या नारायणाच्या, माझ्या भावाच्या पाया पडली. माझ्या चुलत्याच्या पाया पडली.

–वाड्याच्या अंगणात...

वाड्याच्या अंगणात रांगोळीनं लक्ष्मीची पावलं रेखली होती. आईनं रांगोळी काढायची अन् तिच्या पाठोपाठ वहिनीनं त्यात हळद-कुंकू भरायचं, आई पुढं आणि वहिनी मागं! कुणालाही वाटायचं नाही, ह्या सासू-सुना आहेत म्हणून. आलेगेले विचारायचेदेखील–सरूआक्का, ही तुझी लेक तर न्हवं? त्यावर माझी आई हसायची तोंड भरून!

आणि वाड्यावर! नाही, वाड्याच्या दरवाजावर दोन आकाश-कंदील डौलानं डुलायचे. पणत्या-मेणबत्त्या वाड्यावर लागायच्या. वाड्यावरची रोषणाई पहायला सारा गाव जमा व्हायचा. नेहमी असंच घडायचं चांगलं; पण आज घडलं ते सारे विपरीत. त्या दिवसाच्या दुपारपासून ह्या मंगलमय दिवसाला वेगळंच वळण मिळालं.

–दुपार!! साडेबारा वाजलेले!!!

सगळी मंडळी जेवायला बसलेली. घरच्या रिवाजाप्रमाणं पहिल्यांदा आमच्या थोरल्या चुलत्यांच्या पानावर तुपाचा पहिला चमचा वाढायचा; आणि त्यांनी 'पार्वतीपते' म्हणून अनुज्ञा दिल्यावर साऱ्यांची जेवणं सुरू व्हायची.

पंक्तीला वहिनी वाढत होती. तिच्या हातात तुपाचं भांडं होतं. ती वाढायला पंक्तीत आली तंवर एका लहान पोरानं, 'आधी मला वाढ' म्हणून मोठ्यांदा भोकाड पसरलं, आणि वहिनीनं त्याची समजूत काढायला म्हणून त्याच्या पानात तुपाचा चमचा पालथा केला आणि क्षणात......

—आणि क्षणात वीज कोसळावी असा अनर्थ कोसळला. भरल्या वाड्यात एकच कल्लोळ उडाला. वहिनी जागच्या जागीच थांबली. आईची तर वाचाच बंद झाली. अपमानाच्या कल्पनेनं हिरव्या पिवळ्या झालेल्या चुलत्यांनी समोरचं ताट भिरकावून दिलं. ते ताट खणखण आवाज करीत बाहेरच्या अंगणात येऊन केविलवाणेपणानं उताणं पडलं. जेवायला बसलेली सारी मंडळी अन्नावरनं माशा उडाव्या तशी भराभर उठली. कुणाला काय बोलावं हे सुचेना. अगदी क्षुल्लक कारणाच्या तिरीमिरीत चुलते जे एकदा भरल्या ताटावरनं उठले, ते मरेपर्यंत पुन्हा पाणी प्यायला म्हणूनही आले नाहीत.

—तसं पाहिलं तर कारण किती छोटं होतं; आणि चुलत्यांनी आम्हाला दिलेली शिक्षा किती भयंकर होती. पण तो माणूसही तशाच ताणापिळाचा होता. विनाकारण व सकारण कुणाच्या अध्यामध्यात ते पडले नाहीत.

सदा आपल्या प्रतिष्ठेची नशा सांभाळण्यात दंग असायचे. कधी तेलमालीश नको की अत्तर नको. भल्या पहाटे परसातल्या आडावर जाऊन भरलेल्या बादल्या भराभर अंगावर ओतून घ्यायचे; आणि ओलेत्यानंच देवघरात देवापुढं जप करीत उभे राहायचे. सहासहा तास. अगदी खडे. कुणाशी दोन शब्दांच्यावर तिसरा शब्द बोलायचे नाहीत आणि ते दोन शब्द कडकडीत तेलासारखे. घरात कमवून आणायचं माझ्या वडिलांनी पण घरातला सर्व कारभार चुलत्यानं करायचा. मालमत्ता त्यांच्या नावानं. माझ्या वडिलांची एक ब्र बोलायची छाती नसायची त्यांच्यापुढे.

—त्या दिवाळीत माझे चुलते हे असे निघून गेले. वडीलही उठून देवापुढं डोकं गच्च धरून बसले. लहान मुलं एकमेकांच्या तोंडाकडं बघत राहिली. वहिनी आसवं गाळीत होती. थोरल्या भावानं गड्याला हाक मारली. सगळी ताटं गोळा करायला लावली आणि बैलासमोर ठेवायला सांगितली. पण बैलही साले इमानी. त्यांनीही ते हुंगलं नाही. मालक उपाशी—बैल उपाशी. तो दिवस तसाच भयाण गेला. दुसराही—तिसराही. त्यानंतर आजतागायत वाड्यावर कधी आकाशकंदील डोलला नाही. मेणबत्त्या लागल्या नाहीत, की पणत्या तेवल्या नाहीत. कुणी फटाके वाजवले नाहीत. भुईनळे पेटले नाहीत की चंद्रज्योती हसल्या नाहीत. फक्त हसले आकाशातील निर्जीव तारे. पण कशासाठी? एका माणसाच्या तर्कट स्वभावाला. बैलं

खातील एक वेळ खुषीनं; पण या घरात माणसं खाणार नाहीत. त्यानंतर साऱ्या दिवाळ्या अशाच गेल्या. अशांत...अशांत...!

चुलते डोक्यात राख घालून निघून गेल्या दिवसापासून माझ्या चुलतीनं अन्न-पाणी सोडलं. परसदाराच्या तुळशीकट्ट्यापाशी कुणाशीही न बोलता सवरता ती तासन् तास भकास डोळ्यानं पहात नुस्ती बसून राहायची. तशी माझी चुलती ही दुसऱ्या बाजूनं माझी सख्खी मावशीच. दोघी बहिणी जावा जावा.

चुलती...! चुलती लई जहाल बाई!! जगाला प्रेमळ पण बहिणीबहिणींचं कधीच पटलं नाही. कुणी मेलं, की त्याच्या मातीला हजर. कुणी पहिलटकरीण अडली, की तिथंही हजर. कुणाच्या लग्नाला शेपाचशे बिनबोभाट दे – तर कुणाला उसन्या-पासन्याची मदत कर. खरं म्हणजे या काळात ती असती तर आमदार नक्कीच झाली असती! या घरात थोरल्या चुलतीला थोरली आई म्हणण्याचा प्रघात. चुलतीला मूलबाळ झालंच नाही. तिनं आमच्यावर जिवापाड प्रेम केलं. चुलते घरातून निघून गेल्यापासून ती खंगणीलाच लागली. आई-वडिलांनी नाना-तऱ्हेने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. रडले, भेकले, विनवणी केली. तिन-तिनदा पाया पडले, पण तिचा आपला एकच हेका – 'भरल्या ताटावरून धनी उठून गेले. आता मी तरी खाऊ कशी. 'आणि मग अशा अवस्थेत तिला भ्रम झाला. सारखी आपआपल्यातच ती बडबडायची ' – अग पानं घेतली का फराळाची. न्हाणीधुणी झाली ना? कारभारी कवाचं खोळंबून बसल्यात. आता वाढा '– दिवसरात्र आपलं हेच चालू असायचं. सारा काळ आपल्या परसदारीच्या वृंदावनापुढे हातवारे करीत बसलेली असायची. ...

अशाच एका संध्याकाळी वहिनी दिवा लावायला परसदारी गेली. तशी थोरली आई तट्कन उभी राहिली; आणि किंचाळली – "चांडाळणी! तुपाचं घे की ग. माणसं कवाची खोळंबल्यात दिसत न्हाई काग ऽऽ अवदसे!" बिचारी माझी वहिनी! तिच्या हातातलं निरांजनाचं तबक खाणकन खाली पडलं! साऱ्या वाड्यात एक क्षणभर मुकी भयाण शांतता पसरली; आणि एकच रडण्या भेकण्याचा आकांत उडाला. दूरवर देवळात वाजणारी सनई नित्याप्रमाणं संध्यासमईचे सूर वाऱ्यावर सोडीत होती. या क्षणी किती भेसूर वाटत होते ते सूर!

चुलती मेली – कशी गेली! घरातलं वैभव संगसंग घेऊन गेली. ती गेल्यावर गोठ्यातली जनावरं बाहेरची वाट चालायला लागली. – तिजोरीतल्या पैशाला पाय फुटायला लागले. शेतात पुन्हा पायजे तसं धान्य पिकलं नाही. घरात देवधर्म झाला नाही. पूर्वीसारख्या सणावाराला उठणाऱ्या पंक्ती उठल्या नाहीत, की तुळजा-ईच्या मंदिरात गोंधळ घातला नाही. सारं सारं तिनं आपल्याबरोबर नेलं. आलेली लक्ष्मी तिच्या पावलांचा मागोवा घेत जायची चिन्हे दिसायला लागली.

– चुलता चुलतीच्या अशा जाण्यानं वडिलांनी हाय खाल्ली अन् हांतरूण धरलं.

मी वडिलांना 'मामा' म्हणत असे. थोडंथोडं पण चांगलंच आठवतं मला. तांबडा फेटा... पायांत बूट...जाडभरडं धोतर– बाराबंदी झुबकेदार मिशा... मनमोकळं आणि खळखळून हसणं. कधी कधी बिडी ओढायचे. पंढरपूर आळंदीच्या वाऱ्या पायी चालत करायचे. भजनी फडात रात्र रात्र मृदंगावर फडफडणारी त्यांची लांबसडक सावळी बोटं आणि त्याच ठेक्यात तालात सुरात हालणारी मान. आणि केव्हाकेव्हा मला सोलून दिलेल्या भुईमुगाच्या तांबड्या कोवळ्या कोवळ्या शेंगा! माझे वडील गेले तो दिवसही असाच पक्का राहिला आहे लक्षात. सूर्य नुकताच मावळला असेल किंवा नसेल. लक्ष कुणाचं होतं म्हणा त्याच्याकडे पाहायला. माझ्या या वाड्यात, वाड्यात...वाड्यात....

हो वाड्यात अभद्र गडबड चाललेली होती. रडारडीचा आवाज माजघरात येत होता. एकमेकाला समाजावण्याचा आवाज त्यात क्षीणपणानं मिसळला जात होता. वडील नेहमीसारखे अंथरूणावर झोपले होते. तोंड सताड उघडं होतं. इतक्यात कुणीतरी त्यांच्या तोंडात तुळशीचं पान सारलं....

सनईचे संध्यासमईचे सूर कानांवर पडतच होते. कोपऱ्यावर हेल काढून रडणाऱ्या कुत्र्याचा भेसूर आवाजही त्यात मिसळून गेला. रडून शेजारच्या मावशीबाईच्या घरी ओसरीवर आंथरलेल्या पटकुरावर केव्हा झोप लागली कळलंच नाही.

दुसऱ्या दिवशी घरी आलो तर ...

वडिलांचा पत्ता नव्हता...गादी टाकलेली नव्हती. खोकल्याचा आवाज नव्हता.

वडील गेले. घराच्या अवकळेत आणखीनच भर पडली. खरं म्हणजे वडील गेले तो दिवस श्रावणातला होता. श्रावणात आमच्या वाड्यात सत्यनारायणाची पूजा ठरलेली असायची. सत्यनारायणाच्या पूजेच्या दिवशी वहिनीची तर भारीच घाई. स्नानाचं पाणी तापविण्यापासून ते पूजेच्या तयारीपर्यंत सगळं तीच बघायची. शिवाय घरातली, गावातली, दोनशेच्यावर माणसं त्या दिवशी जेवायची. दिवसभर सासू सुना स्वयंपाकात दंग असायच्या. संध्याकाळी पाच वाजता पूजा सुरू व्हायची. देवळातला सनईवाला आज आमच्या वाड्यावर सनई वाजवायचा. संध्यासमयीचे सूर वाड्यावर घुमायचे. उदा-धुपाचा वास दरवळायचा. तीर्थप्रसादाला सारा गाव झाडून वाड्यावर लोटायचा, पूजा मोठी थाटामाटात व्हायची. रात्रीच्या कीर्तनाला आणि वडिलांच्या भजनाला ही गर्दी लोटायची वाड्यावर. रात्रभर नुस्ता जल्लोष चालायचा.

पण वडिलांच्या माघारी या घरात आता सत्यनारायणच काय साधी देवपूजाही व्हायची मारामार पडते. आळंदी-पंढरपूरची वारी कुणाकडून घडत नाही. पैशाअभावी घरातील पोराबाळांची शिक्षणं अर्ध्यावर लोंबकळली. कुळकायद्यात बरीचशी जमीन गेली. रोजच्या भाकरीचा आवाज महाग झाला. मग सत्यनारायणाची महापूजा तरी कशाची होणार?–

कशानं तरी घराचे वासे एकदा फिरायला लागले म्हणजे फिरतच रहातात, थांब म्हटल्यानं थांबणार नाहीत कधी ते. वासे फिरले, की सारं घर फिरू लागतं. माणसं बदलतात. उपकाराची फेड अवहेलनेनं होती. दयेची जाण तोंड लपवते. मध असेपर्यंत माशा जमायच्या मोहळाभोवती. पैसा होता तंवर मामा, मामा होते. मावश्या होत्या मावस भाऊ होते. जात होते, येत होते आणि आता.. ही सारी पैशाची दुनिया.

—आईच्या वाटचाला आले ते आयुष्यभर कष्ट. रानातल्या गड्याच्या भाकरी थापल्या. ताकं केली. दळणं दळली, तिखटं कुटली, हाडाची काडं केली. ढळत्या हातानं तिनं काळ्यामसाल्यापासून गुळाच्या ढेपापर्यंत आणि तुपापासून गव्हांच्या पोत्यापर्यंत ज्या भावांची घरं भरली, तेच भाऊ आज तिला पारखे झाले आहेत. साऱ्या आप्तांना जवळ केलं. महिना महिना चालणाऱ्या गुऱ्हाळात ठेवून घेतलं, बोळवण करून पाठवली. अंगावर सोनं घातलं, पैठण्या घेतल्या. चोळी केली. काकणं भरली. सारं केलं तिनं माहेरच्या माणसांसाठी, पण आज कुणी तिला आक्का म्हणत नाही, की ताई म्हणत नाही. जवळ होतं तोपर्यंत ती साऱ्यांची आत्या होती मावशी होती, मामी होती आणि आईसुद्धा होती.

—आमचे थोरले बंधुराज नावाप्रमाणेच सावकार! जिल्हाधिकाऱ्यापासून खालती अन् वरती. सगळ्यांच्या ओळखी सलगीच्या. आमच्या गावापासून पुणे शंभर मैल लांब, पण नाटकं बघायला पुण्याला—मुंबईला जाणार म्हणजे जाणार. ह्यांच्या पायाला सारखं चक्र बांधलेलं. एका जागेला म्हणून कधी ठरायचे नाहीत हे. आज कुठं, तर पुणं. उद्या कुठं, तर मुंबई. अन् परवा कुठं? तर संपलेला सारा खिसा भरायला बार्शीच्या अडतीला.

नाव सावकार, राहणी सावकारी! चालणंही सावकारी अन् बोलणंही सावकारी. थाटाचं तसं नेटाचं!

ह्या भावाचं लग्न मोजून एकोणीस दिवस गाजलं. चार मैलांच्या टापूतल्या झाडून पुसून साऱ्या खेड्यान्ला लाडूपुरीचं जेवण घातलं. सनईचे सूर एकोणीस दिवस घुमले. वरात निघाली. तऱ्हेतऱ्हेच्या आहेरांचे ढीग जमले. आलेले पाव्हणे-रावळे मानापानानं वापस आपआपल्या घरी गेले. आणि नवी वहिनी लक्ष्मीच्या सोनपावलांनी माप लवंडून घरी आली.

वहिनी कशी छान दिसायची त्यावेळी. गोरी गोरी पान. चापेकळी नाक, नऊवारी कोल्हापुरी काष्टा घालून नेसलेलं लुगडं, ती जुन्यावळणाची खोपावेणी, नाकात नथ, हातात मोहोरेची आंगठी, एकदाणी, चपलाहार. मोठी गोड बोलायची, हसायची अशी की खुदकन, जणू मोत्याचा सर ओघळल्याचा भास व्हायचा. ती घरात फिरायला लागली, की लक्ष्मीचा वावर झाल्यासारखं वाटे घरभर. घरातल्या माणसांना तर तिनं जीव लावलाच; पण तिनं घरातल्या गुरांवरही प्रेम केलं. सणा-

वाराला जनावराला अस्सल खाऊ घातलं. मागं पुढं पाहिलं नाही. पोळयाच्या दिवशी बैलांच्या अंगाला लक्स लावलं, गरम पाण्याच्या आंघोळी घातल्या. पायांना आरती ओवाळली. आळती लावली. शेंब्या रंगवल्या. बाशिगं बांधली. सारं केलं— सारं केलं ! .. पोळयाच्या दिवशी त्यातील एक गाय रुसायची, वहिनीनं हातानं भरवल्याशिवाय ती खायची नाही. इतका जिव्हाळा त्या दोघींचा !

पण नवरा जिंकणं मात्र माझ्या वहिनीला जमलं नाही. थोरल्या भावाला सावकारी रुबाबाबरोबरच वडिलांच्या माघारी नको ते नाद खाऊन टाकायला लागले. आईचा वचक त्याला मुळापासूनच नव्हता. कमी कमी होणारी आमदानी ...आणि खरं म्हणजे माणूस कितीही कर्तबगार असला तरी बाई बाटलीपुढं कुबेराचा तरी पाड लागेल काय ? घरची ही अशी ओढगस्त आणि नजरेसमोर खंगणारी पोरं ! आईतरी किती दिवस सोशील ? एक दिवस संध्याकाळच्या वेळी झोकांड्या देत आलेल्या भावापुढं तिने थडाथडा डोकं आपटून घेतलं. अन् तळमळून बोलत राहिली. पण नशेत असलेला तो माणूस चकार शब्द उलटून बोलला नाही. मात्र तिथपासनं त्याच्या रात्री घरात जात नाहीत. चार चार दिवसातनं कधीमधी उगवतो. असले चार पैसे खिशात तर आमच्या तोंडावर फेकतो. नसले, तर घरातलंच काही तरी घेऊन विकायला जातो...सारी रांडांची धन.

परवा तर त्यानं कहरच केला. करकरीत तिन्ही सांजेची वेळ. आई देवघरात देवापुढे सांजवात लावून बसली होती. वहिनी चुलीपुढं भाकऱ्या थापीत होती. मी अंगणात एकटाच बसलो होतो. देवळातल्या सनईचे सूर कानांत साठवीत. इतक्यात


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

बाहेर पायताणं वाजली. झुकांड्या देत अडखळत स्वारी आत आली. भाऊजवळ येताच आंबुस दुर्गंधीचा भपकारा येत होता. नशेतच तो कुणाला तरी शिव्या देत होता. तोंडात मधूनच अडखळत लावणीचा बेसूर चरण गात होता. आला तसाच स्वयंपाक घरात वहिनीपुढं जाऊन उभा राहिला...

...आणि काय होतं आहे हे कुणाला कळायच्या आतच त्यानं तिच्या गळ्यातल्या डोरल्याला हात घालून हिसका मारला. अस्फुटसा चीत्कार तेवढा वहिनीच्या तोंडातनं बाहेर पडला. चुलीपुढंच तिची शुद्ध हरपली. कोसळता कोसळताही ती माऊली दारूड्या नवऱ्याच्या पायावर पडली. लाथेनं तिला बाजूला सारून तो बडबडत दाराबाहेर पडला. अंधारात दिसेनासा झाला. मी बाहेर पाहिलं, पण दिसत होता काळाकुट्ट अंधार आणि कानी पडत होते ते संध्यासमयीचे सूर.

एकदा उन्मळून पडलेली ती सायलीची वेल पुन्हा उभी म्हणून राहिली नाही. आम्ही आमच्याकडून खूप उपचार केले. तालुक्याला नेलं. पुण्याला ससूनमध्ये आणून दाखल केलं, होतं नव्हतं तेवढं किडूक-मिडूक विकलं, पण उपयोग झाला नाही. यश आलं नाही.

कुणीही कुणाचं नसतं ते पुन्हा प्रत्ययाला येऊ लागलं. वहिनी ससूनमध्ये आणली होती. घरापासून ससून हॉस्पिटलच्या लिफ्टपर्यंत पोचणंही तिला शक्य नव्हतं. जवळची पुंजी संपुष्टात आली होती.

...आणि आज तिच्या अखेरच्या मातीला आम्ही...शरम वाटते सांगायला... तिच्याच हातातील मोहोर विकून पैसा उभा केला...जिच्या आगमनाचा सोहळा एकोणीस दिवस सतत चालला...जिच्या आगमनाप्रीत्यर्थ कित्येक लोकांची तोंडं गोड झाली. जिनं आपल्या हातानं गाईगुरांना लाडू, पुऱ्या भरवल्या...त्या माझ्या वहिनीच्या मातीला तिच्याच हातातील एकुलती एक राहिलेली मोहोर विकायची पाळी आली.. दुर्दैव ! बिचारी भरला गळा घेऊन आली आणि जाताना ओका गळा घेऊन गेली !!

वहिनी गेली ! भोळी, मनमिळाऊ ! ती गेल्यापासून या अनिल विश्वासच्या घरी केव्हाच काही चांगलं घडलं नाही. वहिनी संध्यासमयालाच गेली – देवळातली सनई संध्यासमयीचे सूर छेडीत असताना गेली...

आमच्या वाट्याला, सोबतीला उरले ते संध्यासमयीचे सूर. उदास, भयाण ! याच सुरांना साक्षी ठेवून गेली. हृदयाला घरं पाडून गेली. लक्ष्मीची पावलं घेऊन गेली...पेटती चूल बंद करून गेली–भरली तिजोरी रिकामी करून गेली. गाई-बैलं बरोबर घेऊन गेली...

–आणि हे सारं कुटुंब बसलं आहे संध्यासमयीचे सूर भोगत !!!

◻ ◻ ◻

# फिडेल चे आणि क्रांती

**अरुण साधू**

**लेखांक : चार**

जुलै १९५५ मधील एका कडक थंडीच्या संध्याकाळी फिडेल कास्ट्रो मेक्सिको शहरी पोचला. त्याचा भाऊ राऊल तिथे त्याची वाटच पाहात होता. त्या दोघांनी एका हॉटेलात जेवण घेतले. आणि नंतर अगोदर ठरविल्याप्रमाणे आपल्या एका अर्जेंटिनियन मित्राची ओळख करून देण्यासाठी राऊल फिडेलला घेऊन गेला. त्या उंच, देखण्या आणि तेजस्वी डोळ्यांच्या डॉक्टर मित्राचे नाव होते अर्नेस्टो चे गव्हेरा. क्यूबन क्रांतिविषयी आस्था असणाऱ्यांना एकत्र जमविण्यास राऊलने सुरुवात केली होती. त्यातलाच डॉ. गव्हेरा.

मेक्सिकोतल्या एका अंधाऱ्या खोलीत त्या कडक थंडीच्या रात्री, मंद दिव्याच्या प्रकाशात फिडेल आणि चे प्रथम एकमेकांस भेटले तेव्हाच त्यांनी एकमेकांचे पाणी ओळखले. रात्रभर ते दोघेही चर्चा करीत होते. आंतरराष्ट्रीय राजकारण, लॅटिन अमेरिकन राष्ट्रांची परिस्थिती आणि क्यूबा. पहाट झाली तेव्हा दोघांची दिलजमाई झाली होती आणि फिडेलला आपल्या योजनेसाठी एक सच्चा क्रांति-

हॅवानात परतल्यावर फिडेलने अहिंसक चळवळींची सर्व दारे ठोठावली. पण ती सर्वच दारे त्याला बंद दिसली. अखेर निराश मनाने फिडेलने क्यूबा सोडून मेक्सिकोत प्रयाण केले. जाताना त्याच्या डोक्यात निश्चित योजना होत्या. आपला गट जमवायचा, शस्त्रास्त्रे जमवायची, युद्धाचे शिक्षण द्यायचे आणि एक दिवस क्यूबाच्या किनाऱ्यावर उतरायचे ते बाटीस्टाची राजवट उलथून पाडण्याच्या जिद्दीनेच.

---

कारी सैनिक मिळाला होता. तेव्हापासूनच चे गव्हेराने क्यूबन क्रांतीसाठी स्वतःला वाहून घेतले.

क्यूबन क्रांतीने लॅटिन अमेरिकेला दोन असामान्य क्रांतिकारी नेते मिळवून दिले. फिडेल कास्ट्रो आणि चे गव्हेरा, फिडेलपेक्षाही चे गव्हेराभोवती गूढरम्यतेचे वलय अधिक गडद आहे. कारण दम्याच्या दुखण्याने सतत ग्रस्त असलेल्या या तरुण देखण्या क्रांतिकारकाने केवळ क्यूबन क्रांतीसाठीच कष्ट सोसले असे नव्हे, तर साऱ्या लॅटिन अमेरिकेत पददलितांची क्रांती घडवून आणण्याची त्याने ईर्षा राखली,त्यासाठी सत्तेची गादी झिडकारून लॅटिन अमेरिकन जंगलामध्ये गनिमी लढे उभारण्याचे सतीचे वाण हाती घेतले; आणि त्या कामातच छातीवर गोळी झेलून हसत देह ठेवला.

रोमँटिक, (गूढरम्य) क्रांतिकारकाचे आदर्श प्रतीक म्हणजे चे गव्हेरा. बघितल्या-बरोबर एकदम आवडावी अशी काही माणसे असतात. त्यांपैकी चे होता. त्याचा साधेपणा, प्रेमळ आणि मित्रत्वाचा स्वभाव, नैसर्गिक वागणूक आणि प्रथम दर्शनीच जाणवणारे स्वच्छ व्यक्तिमत्त्व यांमुळे तो चटकन कुणालाही आपलेसे करीत असे. आणि त्याच्याबरोबर राहणाऱ्या साथीदारांना त्याचे इतर गुण हळूहळू कळू लागले, की त्याच्यावर एकदम त्यांची श्रद्धा बसे.

चे हा अफाट मानसिक सामर्थ्याचा माणूस होता. दम्याचा विकार लहानपणा-पासून त्याला सतावीत असतानाही त्याने क्रांतिकार्याचे खडतर व्रत हाती घेतले. सिएरा मेस्त्रामधले अत्यंत कष्टाचे आणि हालअपेष्टांचे जीवन स्वीकारले. केवळ मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या शारीरिक व्याधीवर त्याने मात केली !

क्रांतिकार्यावर अपरंपार निष्ठा, जिद्दीने कामे करण्याची वृत्ती आणि जिवाची मुळीही पर्वा न करता कोणताही धोका पत्करण्याची तयारी यामुळे चे याने फिडेलच्या सर्व अनुयायांची मने जिंकली. फिडेलच्या बंडखोर गटात चे सामील झाला, तो

साधा सैनिक म्हणून. क्रांती जेव्हा यशस्वी झाली तेव्हा तो क्रांतिकारकांचा नंबर दोनचा नेता बनला होता; आणि त्याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी लाभली होती.

फिडेल हा अत्यंत बोलघेवडा आणि तासन् तास भाषणे ठोकणारा. तर चे अबोल. भाषणे देण्यात त्याला रस नव्हता; पण आपले विचार लिहून काढण्यात त्याला रस होता. लॅटिन अमेरिकेबाहेर चे याला अमाप प्रसिद्धी मिळाली ती त्याच्या लिखाणामुळेच. सिएरा मेस्त्रामधील क्यूबन गनिमी युद्धाचे अनुभव त्याने अतिशय प्रभावीपणे लिहून काढले आहेत. बोलिव्हियात त्याला मृत्यू येण्यापूर्वी त्याने लिहून काढलेली डायरीही सुप्रसिद्ध आहे. परंतु जगभरच्या तरुण बंडखोरांचे चे दैवत बनला तो त्याच्या गनिमी युद्धशास्त्रावरील पुस्तकाने. क्यूबातील अनुभवांच्या आधारावरच त्याने हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकामुळे चे एकदम माओ-त्से-तुंग, जनरल झाप या गनिमी युद्धावरील तज्ज्ञांच्या रांगेत जाऊन बसला. फिडेलला लिहिण्यात मुळीच रस नाही.

लॅटिन अमेरिकन जंगलात चे याला आलेल्या गूढ मृत्यूमुळे त्याची प्रतिमा अधिकच उत्कट आणि उदात्त झाली आहे. माणसाला शोकांतिकेची एक विलक्षण ओढ असते. क्यूबामध्ये चे याने विजय मिळविला असला तरी त्याच्या ऐन तारुण्यातील मृत्यूमुळे त्याच्या जीवनाला शोकांतिकेची कातर धार आली आहे. सबंध लॅटिन अमेरिका तेथील दडपशाही राजवटीविरुद्ध पेटवून उठवायची, हे त्याचे स्वप्न अपुरेच राहिले, शेवटी शेवटी तर त्याला आपल्या अपयशाची जाणीवही झाली असावी. कारण क्रांतिपूर्व क्यूबा आणि इतर लॅटिन अमेरिकन देश यांच्या परिस्थितीत तफावत होती. चे कदाचित जिवंत राहिला असता तर त्याने आपले कार्य तडीलाही नेले असते. पण मृत्यूने तो ऐन तारुण्यात असताना घाला घातला. मृत्युसमयी त्याचे वय अवघे ३८ वर्षांचे होते.

क्यूबन क्रांती यशस्वी झाल्यावर चे याला क्यूबाचे नागरिकत्व देण्यात आले होते. फिडेलच्या सरकारात त्याला मंत्रीपदही देण्यात आले होते. पण लॅटिन अमेरिकेतील इतर देशांतील परिस्थिती त्याला सुखाने स्वस्थ बसू देत नव्हती. अखेर १९६५ साली एके दिवशी या कलंदर क्रांतीकारकाने क्यूबामधील सर्व अधिकाराच्या जागा सोडल्या, क्यूबन जनतेचा प्रेमाचा निरोप घेतला आणि पाठीवर आपल्या सामानाची पिशवी टाकून व हातात बंदूक घेऊन लॅटिन अमेरिकन जंगलाचा रस्ता धरला. असा हा चे गव्हेरा.

चेच्या या वैयक्तिक भावरम्यतेबरोबरच महत्त्व आहे ते त्याने डाव्या प्रागतिक विचारसरणीच्या अंमलबजावणीत कृतिशील अशी याच्या मोलाची भर घातली त्याला. क्यूबन क्रांतीच्या वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपणाचा प्रवक्ता म्हणून चेला महत्त्व आहे. रशियन कम्युनिस्टपक्षांशी बांधलेल्या पक्षाशिवाय दुसरे कोणी कुठे समाजवादी क्रांती करू शकत नाही या दाव्याला चे याने धक्का दिला. पुढे क्यूबाने साम्यवाद

स्वीकारल्यानंतरही चे याने क्यूबाला पूर्णपणे रशियनांच्या ताब्यात जाऊ दिले नाही. या बाबतीत फिडेल आणि चे या दोघांचेही महत्त्व सारखेच आहे. क्यूबन स्वातंत्र्याचा झेंडा या दोघांनीही फडकावीत ठेवला. क्यूबाने साम्यवाद स्वीकारल्यापासून अमेरिकनांची ठराविक टीका क्यूबन नेत्यांवर सुरू झाली. पण साम्यवाद स्वीकारूनही रशियाच्या अथवा चीनच्या अंकी न जाता क्यूबाने आपले स्वतःचे एक मर्यादित क्षेत्र उभे केले हे अमेरिकन टीकाकार विसरतात. इटली आणि फ्रान्समधील डाव्या विचारसरणीच्या तरुणांचे चे आणि फिडेल आदर्श आहेत ते त्यांच्या याच वैशिष्टयामुळे.

## बालपण - शिक्षण

अर्नेस्टो चे गव्हेराचा जन्म १९२८ साली जून १४ रोजी अर्जेंटिनामधील रोझारियो या महत्त्वाच्या शहरात झाला. त्याचे कुटुंब मध्यमवर्गीय. वडील इंजिनियर होते. घरात मुक्त वातावरण होते. पण वडिलांची विचारसरणी डाव्या बाजूची होती.

अर्नेस्टो हा सगळ्यात मोठा मुलगा. वयाच्या दुसऱ्या वर्षी त्याला दम्याचा झटका आला. या व्याधीपासून तो पूर्णपणे कधीच मुक्त झाला नाही. दम्यामुळे येणारा थकवा, गुदमरून येणे आणि छातीतील आग, शाळा-कॉलेजांमधून, सिएरा मेस्त्राच्या पहाडीतून आणि बोलिव्हियाच्या जंगलातून त्याचा सतत पाठपुरावा करीत राहिली.

चांगल्या वैद्यकीय उपचारांसाठी गव्हेरा कुटुंब अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनॉस आयर्स येथे राहण्यासाठी गेले. तेथील हवामानामुळे तर अर्नेस्टोला अधिकच त्रास होऊ लागला. अर्नेस्टोचे वडील रात्रभर त्याच्याजवळ बसून असत. कारण बापाच्या छातीवर डोके ठेवून झोपले, की त्याला जरा बरे वाटे. दम्याचा त्रास कमी वाटे, पण त्याची प्रकृती आणखीच बिघडली. डॉक्टरांनी हवापालट करण्याचा सल्ला दिला.

गव्हेरा कुटुंबाने पुन्हा आपले बिऱ्हाड उचलले आणि कॉर्दोबा प्रांतात अनेक ठिकाणी भटकल्यावर आल्टा ग्रेशिया या ठिकाणी ते स्थायिक झाले.

अर्जेंटिनामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे होते. पण अर्नेस्टोला दम्याचा विकार असल्याने तो शाळेत जाऊ शकत नव्हता. त्याची आईच त्याला घरी शिकवू लागली. शाळेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात तो नियमितपणे वर्गात जात असे. पण पुन्हा पुढची तीन वर्षे त्याला नियमित शाळेत जाणे जमले नाही. त्याची भावंडे शाळेतील धडे त्याच्यासाठी घरी आणीत.

अर्नेस्टोला चार धाकटी भावंडे. सेलीया, रॉबर्टो, ॲना मारिया आणि जुआन मार्टिन. ही सर्व भावंडे खेळण्या-कुदण्यात सतत आघाडीवर असत. मारामारीतही कधी मागे घेत नसत. दम्याचा त्रास असूनही अर्नेस्टोला कठीण मारामारीचे खेळ आवडत. खेळताना मध्येच अर्नेस्टो थांबे जरा बाजूला जाऊन खिशातले औषधी

व्हेपरायझर बाहेर काढी आणि घशावर औषध शिंपडून पुन्हा खेळात सामील होई. अगदी लहानपणीदेखील त्याला धोक्याचे खेळ आवडत. दोन गच्च्यांवरील तीन-चार फुटांच्या दरीवरून उडी मारून इतर मुलांना चिडविणे हा त्याचा आवडता खेळ होता.

वय वाढू लागले तसा अर्नेस्टो आपल्या दम्यावर काबू मिळवू लागला. दम्यामुळे आपण कुठल्याही क्षेत्रात मागे राहता कामा नये अशी त्याची जिद्द होती; आणि ती त्याने खरी करून दाखविली. रग्बीसारख्या कठीण आणि मारामारीच्या खेळातही तो सर्वांपुढे असे; आणि इतरांना त्याची भीती वाटे.

अर्नेस्टोचे वडील खूप वाचणाऱ्यांपैकी होते. घरी मोठे वाचनालयच होते. मुलांनाही सर्व वाचण्यास मुक्त मुभा होती. त्यामुळे ज्यूल्स व्हर्नपासून फ्रॉईडपर्यंत सर्व तऱ्हेचे साहित्य अर्नेस्टोने वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत वाचून काढले होते. चौदाव्या वर्षी त्याच्या हाती फ्रॉईडचे पुस्तक बघून त्याच्या वडिलांच्या मित्राला एकदा धक्काच बसला होता.

## बंदूक असली तरच....

वयाच्या बारा-तेराव्या वर्षीच अर्नेस्टोला स्वतःचे व्यक्तिमत्त्व आणि स्वतःची मते प्राप्त झाली होती. स्वतः हायस्कूलमध्ये असतानाही विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांशी त्याचे जास्त जुळे. एकदा विद्यापीठातील अन्यायाविरुद्ध संप करताना कॉर्डोबा विद्यापीठातील त्याच्या एका मित्राला अटक करण्यात आली. अर्नेस्टो त्याला भेटायला गेला असताना या मित्राने सांगितले, आम्हाला इथे तुरुंगात चांगली वागणूक मिळत नाही. त्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी तुम्ही हायस्कूलातले विद्यार्थी रस्त्यांवर निदर्शने का करीत नाही ?

अर्नेस्टो उत्तरला, "मुळीच नाही. रस्त्यावर जायचं आणि पोलिसांच्या लाठ्या खायच्या ? मुळीच नाही. माझ्या हाती बंदूक आली तरच मी निदर्शने करीन–"

शाळेत असल्यापासूनच अर्नेस्टोला पायी किंवा सायकलवरून प्रवास करण्याची चटक लागली. आपल्या मित्रांबरोबर तो दूर दूरच्या सहलींना पायी जात असे.

सुरुवातीला गव्हेरा कुटुंबाची परिस्थिती सुखवस्तू होती. पण पुढे काळ बदलला. त्याच्या आईला स्वतःचे मोठे शेत विकावे लागले आणि अर्नेस्टोला शिक्षण पूर्ण करण्यासाठी एक लहानशी नोकरी पत्करावी लागली.

हायस्कूल शिक्षण पूर्ण झाल्यावर अर्नेस्टोने आपले नाव वैद्यकीय शाळेत दाखल केले. वयाच्या अठराव्या वर्षी सक्तीच्या लष्करी सेवेसाठी अर्नेस्टोला बोलावणे आले. अर्नेस्टो दाखल झाला. पण वैद्यकीय परीक्षेनंतर त्याच्या दम्यामुळे कोणत्याही तऱ्हेच्या लष्करी कामासाठी तो नालायक असल्याचा शेरा मारून त्याला परतवून लावण्यात आले.

दर सुटीमध्ये जमेल त्या मार्गाने अर्नेस्टो प्रवास करी. कधी पायी, कधी साय-

कलने. सुट्यांमध्ये त्याचे सारे मित्र परीक्षेची तयारी करण्यासाठी अभ्यास करीत. अर्नेस्टो म्हणायचा, " करा लेकांनो. मी भटकूनही येईन आणि तुमच्याबरोबर पासही होईन. " अर्नेस्टो नापास कधीच झाला नाही. अधिक गुण मिळविण्याऐवजी उपयुक्त त्याच गोष्टींचा अभ्यास करण्याकडे त्यांचा कल होता. सर्व लॅटिन अमेरिका अशा तऱ्हेने अर्नेस्टोने पायाखाली घातली. लॅटिन अमेरिकन जनतेची दरिद्री परिस्थितीही त्याने या निमित्ताने जवळून पाहिली.

गव्हेरा आणि त्याचा मित्र अल्बर्टो ग्रॅनाडो हे दोघे डिसेंबर १९५१ मध्ये लॅटिन अमेरिकेच्या एका लांब सफरीवर मोटरसायकलवरून निघाले. ते चिलीपर्यंत पोचले नाहीत तोंच त्याची मोटरसायकल एवढी नादुरुस्त झाली, की ती तशीच टाकून देऊन ते दोघे पायीच पुढे निघाले. जवळ पैसे नव्हते. म्हणून ट्रक ड्रायव्हर, हमाल, खलाशी, भांडीघाशे, डॉक्टर अशा विविध भूमिका बजावीत, पैसे कमावीत ते प्रवास करीत राहिले. ठिकठिकाणच्या लोकांची दरिद्री अवस्था आणि शहरांमधून पाण्यासारखा वाहणारा पैसा यामुळे व्यथित होत राहिले. आणि गव्हेराच्या मनात उत्तर अमेरिकेच्या साम्राज्यवादी पिळवणूकशाहीची चीड घर करू लागली.

दक्षिण अमेरिकेतील जंगले, नद्या, पर्वतमय प्रदेश तुडवीत या दोघांनी ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील सान पाब्लो येथील एका महारोग्यांच्या वसाहतीत काही महिने काढले. डॉक्टर म्हणून काम केले, रुग्णांची सेवा केली. त्यांच्याबरोबर सहली काढल्या. रोग्यांचे त्यांच्यावर एवढे प्रेम बसले, की त्यांना ती वसाहत सोडवेना. अखेर त्यांच्या प्रेमाचा निरोप घेऊन, त्यांनीच बांधून दिलेल्या एका तराफ्यातून त्यांनी ॲमेझॉन नदी पार केली. अधिकृत परवाने नव्हते म्हणून कोलंबियात त्यांना अटक झाली. सुटका झाल्यावर एके ठिकाणी त्यांनी फुटबॉल शिक्षक म्हणून काम केले. तेथून ते व्हेनेझुएलामध्ये गेले. ग्रॅनाडोने त्याच देशात एका महारोगी वसाहतीत मुक्काम ठेवायचे ठरविले.

परंतु अर्नेस्टोचा प्रवास अद्याप पुरा व्हायचा होता. घोड्यांनी भरलेल्या एका विमानातून त्याने मियामी येथे प्रयाण केले. तेथे दोन दिवस राहून ब्यूनॉस आयर्स येथे परतण्याचा त्याचा इरादा होता. पण पैसे नसल्याने तो तिथेच अडकून पडला. दिवसभर वाचनालयात मुक्काम ठोकणे आणि एक पेला दुधावर आणि पाण्यावर दिवस काढणे असा त्याचा क्रम होता. अमेरिकेच्या एफ. बी. आय. एजंटांनीही त्याला तिथे त्रास दिला. शेवटी कसेबसे पैसे जमवून तो महिन्यानंतर मायदेशी परतला.

तेथून परत आल्यावर अर्नेस्टोने जोरदार अभ्यासाला सुरुवात केली. चार-पाच वर्षांत जे विषय करायचे अशा ११–१२ विषयांच्या परीक्षेला तो एका वर्षाच्या अभ्यासानंतर बसला आणि मार्च १९५३ मध्ये डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाला. वैद्यकीय व्यवसाय करून पैसा मिळविण्यास मोकळा झाला.

पण चे यानेच लिहिले आहे, 'मी जेव्हा वैद्यकीय शिक्षणास सुरूवात केली तेव्हा मी कुणी क्रांतिकारक नव्हतो. कोठली क्रांतिकारी ध्येयेही माझ्यासमोर नव्हती. इतर सर्व लोकांप्रमाणे मलाही यशाची आसक्ती होती. मोठा प्रसिद्ध संशोधक व्हावे आणि मानवजातीसाठी खूप काहीतरी करावे असे माझे धूसर स्वप्न होते. परंतु कशी कोण जाणे, मला प्रवासाची आवड उत्पन्न झाली. सर्व अमेरिकाभर (दक्षिण) प्रवास केला. पायी आणि सायकलवरील प्रवासामुळे दारिद्र्य, भूक, रोगराई यांनी लॅटिन अमेरिकन जनता किती पिडलेली आहे, हे मी प्रत्यक्ष पाहिले. पुरेसे अन्न नसल्याने रोगग्रस्त झालेल्या अर्भकांना आपण रोगमुक्त करू शकत नाही हे मला जाणवले. अपुऱ्या आहारामुळे मुलाबाळांची, स्त्रियांची होत असलेली झीज मी जवळून पाहिली. हुकूमशाही राजवटीची दडपशाही अनुभवली. तेव्हा माझ्या ध्यानात आले, की वैद्यकीय संशोधन करून खूप काहीतरी करण्याएवढीच महत्त्वाची गरज आहे ती या लोकांना मदत करण्याची.'

अर्नेस्टो त्याच्या मोठ्या सहलीवरून परतला तेव्हाच तो राजकारणात अधिक रस घेऊ लागल्याचे त्याच्या सहकाऱ्यांना आढळून आले. डॉक्टरीची परीक्षा पूर्ण झाल्यावर तर वैद्यकीय व्यवसाय करण्याची त्याची फारशी इच्छा उरली नाही.

ग्रॅनाडोला भेटायला जाण्यासाठी अर्नेस्टोने पुन्हा व्हेनेझुएलामध्ये जायचे ठरविले. सहा हजार मैलांचा रेल्वे प्रवास करून पुढे पुन्हा दुसरा प्रवास करायचा होता. वाटेत इक्वेडोरमध्ये गयाकिल येथे तो पोचला तेव्हा त्याची अर्जेंटिनामधून पळून आलेला एक वकील रिकार्दो रोजो याची गाठ पडली. रोजो हा क्रांतिकारक होता. आणि त्यावेळी तो गटेमाला या देशात क्रांतीची बीजे पेरण्यात मग्न होता. जेव्हा आपण व्हेनेझुएला मध्ये जात असल्याचे अर्नेस्टोने त्यास सांगितले, तेव्हा रोजो म्हणाला, 'पण अर्नेस्टो, तिकडे जाऊन तू काय करणार? पैसे कमाविण्यासाठी तो देश ठीक आहे. माझ्याबरोबर गटेमालात चल. तिथं खरीखुरी सामाजिक क्रांती चालू आहे.'

अर्नेस्टोचा मोर्चा गटेमालाकडे वळला. इथेच त्याला चे हे टोपण नाव पडले. अर्जेंटिनियन लोक संभाषणात खंड घेताना नेहमी चे...चे... असा शब्द वापरतात. त्यामुळे मध्य अमेरिकेत साऱ्याच अर्जेंटिनियनांना 'चे' असेच संबोधतात. अर्नेस्टोचे तर चे हे नावच पडून गेले. अर्नेस्टोला त्याचा अभिमान होता.

गटेमालातील खेड्यांमध्ये तेथील आदिवासींच्या वस्त्यांमध्ये, जंगलामध्ये वैद्यकी करण्याचा चे याचा इरादा होता. परंतु गटेमाला सरकारने त्याच्या वैद्यकीय डिप्लोमाचे त्याने नूतनीकरण करावे अशी अट घातली. त्यासाठी आणखी दोन-तीन वर्षे घालवावी लागली असती. म्हणून त्याला तो विचार सोडून द्यावा लागला. गटेमाला शहरातच त्याने मुक्काम ठोकला. त्याचे सामाजिक आणि राजकीय संबंध वाढू लागले. पण अवस्था मात्र अत्यंत दरिद्री होती.

अंगावर होते तेवढेच त्याचे कपडे. फाटके बूट, मळलेला शर्ट ढगळ पँटीत कसा-तरी कोंबलेला, अशा अवतारात तो शहरातून हिंडायचा. पँट फारच फाटली तर एखाद्या मित्राला मागायचा. इथेच त्याची अनेक लॅटिन अमेरिकन क्रांतिकार-कांशी गाठ पडली. हिल्डा गेदीया ही पेरूमधील क्रांतिकारक. तिने गटेमालात आश्रय घेतला होता. अर्नेस्टो आणि हिल्डा यांची मने जुळली. आणि तशा दरिद्री अवस्थेतही त्यांनी विवाह केला.

त्याच सुमारास मोंकाडा हल्ल्यात भाग घेतलेले आणि तुरुंगवासानंतर क्यूबा सोडून आलेले काही क्यूबन क्रांतिकारक गटेमालात आले होते. त्यांची चे याच्याशी गाठ पडली. हे क्रांतिकारक फिडेलचे निष्ठावंत अनुयायी होते. आणि त्यांच्या तोंडी नेहमी फिडेलच्या कथा असत. त्यामुळेच त्यावेळी गटेमालात असलेल्या सर्व लॅटिन अमेरिकन क्रांतिकारकांमध्ये फिडेलविषयी आदर उत्पन्न झाला.

त्यावेळी गटेमालामध्ये लॅटिन अमेरिकेतील एकमेव लोकशाही क्रांतिकारक राजवट, चालू होती. पण तेथेही अमेरिकन भांडवलदारांचे आक्रमण होतेच. क्यूबा-तील बहुतेक शेतीजमीन अडकवून बसलेली अमेरिकन युनायटेड फ्रूट कंपनी गटे-मालातदेखील आपले पाय पसरवीत होती. फेब्रुवारी १९५३ मध्ये गटेमाला सर-कारने या कंपनीची सव्वादोन लाख एकर एवढी पडून असलेली जमीन ताब्यात घेतली, तेव्हा अमेरिकेचे पित्त खवळले. त्यावेळचे गटेमाला सरकार नव्या विचार-सरणीचे होते. त्यामुळे आधीच ते अमेरिकेच्या डोळ्यांत सलत होते. युनायटेड फ्रूट कंपनीवर घाला येताच अमेरिकेने आपले लष्करी सामर्थ्य वापरून सरकारला गुडघ्यावर आणले.

ही खरी लढा देण्याची वेळ होती. चे याने काही तरुण जमवून बंडखोर गट बनविण्याचे प्रयत्न केले, पण त्यात त्याला यश आले नाही. अमेरिकन विमानांचे बॉबिंग सुरू झाले तेव्हा ब्लॅक आऊटच्या काळात चे याने रक्षकाची जबाबदारी पत्करली. त्याला आघाडीवर जायचे होते. पण ते जमले नाही. अखेर अमेरिकेने आपला काबू गटेमालावर पूर्णपणे बसविला तेव्हा चे याला तेथून काढता पाय घ्यावा लागला.

गटेमालाच्या या प्रकरणामुळे चे याची खात्री पटली, की सशस्त्र क्रांतीशिवाय दुसरा तरणोपाय नाही. आणि साम्राज्यवादाविरुद्ध विजय मिळवायचा असेल तर पहिले पाऊल सशस्त्र क्रांतिकारकांनीच टाकले पाहिजे. परिस्थितीत योग्य तो बदल होण्याची वाट पाहत बसण्यात काहीच अर्थ नाही. या दरम्यान चे याने मार्क्स. लेनिन आणि इतर मार्क्सिस्ट विचारवंतांचे वाङ्मय वाचून काढले होते. आणि त्याच्या विचारांना शिस्तबद्ध बैठक प्राप्त झाली होती.

चे लिहितो, ' गटेमालात असताना क्रांतिकारक डॉक्टरची कर्तव्ये काय असावीत याविषयी मी टिपणे काढून विचार करू लागलो. परंतु नंतर युनायटेड फ्रूट

कंपनीच्या आक्रमणानंतर मला एका मूलभूत गोष्टीची जाणीव झाली. क्रांतिकारी डॉक्टर बनण्यासाठी आधी क्रांती होणे आवश्यक आहे."

अखेर गटेमालात जगणे जेव्हा असह्य झाले तेव्हा चे मेक्सिकोत गेला.

मेक्सिकोमध्येही त्या युनायटेड फ्रूट कंपनीचे जाळे होतेच. कंपनीला धोका उत्पन्न करणारे जे जे म्हणून बंडखोर आढळतील त्यांना गुप्तपणे ठार मारण्याचे सत्र मेक्सिकोतील एफ. बी. आय. एजंटांनी आरंभिले होते. त्यामुळे तेथेही त्याला अत्यंत जपून रहावे लागत होते. मेक्सिको शहरीही क्रांतिकारी तरुणांचे अड्डे होतेच. अशाच एका अड्ड्यात चे याची राऊल कास्ट्रोशी गाठ पडली. दोघांची मैत्री जमली. आणि फिडेल मेक्सिकोत येताच राऊलने प्रथम त्याची गाठ चे शी घालून दिली.

चे लिहितो 'लॅटिन अमेरिकेत एवढे सर्वदूर भटकल्यावर आणि गटेमालातील अनुभव घेतल्यावर कोठल्याही हुकूमशाही विरुद्धच्या क्रांतीमध्ये भाग घेण्याची माझी एका पायावर तयारी होती. परंतु मी जेव्हा फिडेलला भेटलो तेव्हा त्याने माझ्यावर जबरदस्त प्रभाव पाडला. अशक्य गोष्टीही शक्य करून दाखविण्याचा त्याचा आत्मविश्वास होता. आपण करू ते अगदी बरोबर ठरेलच याची त्याला खात्री होती. आपण क्यूबामध्ये पोचूच याविषयी त्याला शंका नव्हती. तेथे पोचल्यानंतर आपण लढा उभारू; आणि एकदा लढा उभारल्यावर त्यात नक्की विजयी होऊच; याची त्याला शंभर टक्के खात्री होती. त्याचा आशावाद अतिशय प्रखर आणि संसर्गी होता. त्याची एकदा गाठ पडल्यावर कृतिशील न होणे कठीण होते. आता तक्रार करायला जागा नव्हती. संघटना उभारणे, बळ वाढविणे आणि लढ्याला तयार होणे याशिवाय दुसरा इलाज नव्हता."

आग ओकणारी बंदूक सतत जवळ बाळगणारा चे कवी मनाचा अत्यंत संवेदनाक्षम असा तरुण होता. फिडेलच्या पहिल्याच भेटीत तो भारावून गेला; आणि त्याने पुढील कविता केली–

उषेच्या जहाल भविष्यवेत्त्या,
चल, निघू या,
काटेरी, नागमोडी वळणांच्या गुप्त रस्त्याने
तू ज्या हिरव्या भूमीवर प्रेम करतोस तिला मुक्त करण्यास.
चल, निघू या,
अनंत अन्याय पुसून काढण्यास,
आपल्या मस्तकात फुटतात बंडखोर तारे,
मृत्यू वा विजय – शपथ घेऊन निघू या.
आणि जेव्हा पहिल्या गोळीच्या आवाजाने,

पृष्ठ ५९ वर

## सागरी वर्चस्वासाठी रशियाचे प्रयत्न पृष्ठ २३ वरून

१९६१ ला अमेरिकेने रशियन भूमीचे लक्ष्यवेध घेणारी क्षेपणास्त्र सुसज्जीत पोलरीस सबमरीन बांधल्या तेव्हापासून रशियाने आपले आरमारी सामर्थ्य वेगाने वाढविण्यास सुरुवात केली. क्युबाच्या पेचप्रसंगानंतर हा वेग अतिशय वाढला आणि सागरीसामर्थ्याला राजकीय आणि राजनैतिक प्रयत्नांची पद्धतशीर जोड देण्यास रशियाने सुरुवात केली. रशियन आरमार प्रमुख अॅडमिरल सर्जी ग्रोश्कोव्हने नाटो राष्ट्रांच्या भोवती पींसर डावपेच अवलंबून नाटोला शह देण्यासाठी युरोपच्या दक्षीण उत्तर भागात सोविएत आरमारी काफले एकवटले. उत्तर अटलांटीकमध्ये रशियन युद्धनौका व नाटोच्या युद्धनौकांचे प्रमाण ६:१ असे झाले होते. केवळ त्यामुळे डेन्मार्क आणि नॉर्वेसारख्या छोटया भांडवलदारी देशांनी देशातील विरोध डावलून नाटोचे सदस्यत्व चालू ठेवले. भूमध्य समुद्रात, जेथे अमेरिकेचे सहावे आरमार आहे तेथे रशियन आरमार इतके वाढविण्यात आले की, तेथे अमेरिका, रशिया यांच्या आरमाराचे परस्पर प्रमाण ४० : ६१ झाले. त्यामुळे तुर्कस्थान-ग्रीस-इटली हे देश अस्वस्थ झाले. इकडे इजिप्त आणि सिरीयाच्या बंदरामध्ये इस्त्राइली हवाई-हल्ल्यास प्रतिबंध करण्यासाठी रशियन आरमार सदैव नांगर टाकून असते. इजिप्तच्या अॅलेक्झांड्रीया बंदरात आणि लीबियाच्या सरहद्दी लगतच्या भागात रशियाने आपल्या आरमारासाठी उपयुक्त अशा सुसज्ज तळांची बांधणी सुरू केली आहे. त्यामुळे जर मध्यपूर्वेत पुन्हा युद्ध सुरू झालेच तर रशियन आरमार इस्त्राएलची नाकेबंदी करू शकेल. जशी आज अमेरिकेने व्हिएतनामची केली आहे. आणि या कारवाईसाठी रशिया अॅड्रीअॅटीक समुद्रातील युगोस्लावीयन बंदराचा उपयोग करून घेऊ शकेल. रशियाच्या नव्या पवित्र्याने अमेरिका आणि त्याच्या दोस्त राष्ट्रात खळबळ माजली असली तरी अरब राष्ट्रात आणि पूर्व युरोपियन राष्ट्रांत सुरक्षिततेची जाणीव निर्माण झाली आहे. कारण रशियाने 'साम्राज्यवादी देशांपासून विकसीत देशांचे संरक्षण करण्यासाठी हा पवित्रा घेतला असल्याचे' जाहीर केले आहे. तर अॅडमिरल ग्रोश्कोव्हने घोषीत केले आहे की, 'अरब जगतातील आमचे बंधू व शांतताप्रीय जनतेने रक्षण करणे हेच सोविएत नौदलाचे पवित्र्य कर्तव्य आहे.

□

## अमेरिकेला आव्हान

वॉशिंग्टनची खरी झोप उडाली जेव्हा रशियन आरमार पर्शियाच्या आखातात आणि हिंदी महासागरात संचार करू लागले तेव्हा. अमेरिकन लष्करीतज्ज्ञांना तेव्हा पासूनच भिती वाटू लागली की, ज्याप्रमाणे इजिप्तने सोविएत आरमाराला तळ

बांधून दिले, त्याप्रमाणे भारतसुद्धा देईल. अमेरिकनांच्या या भितीत भारत-रशिया करारापासून भरच पडली – जरी भारताने आपल्या चिमुकल्या आरमाराचा व्यर्थ अभिमान बाळगून या शक्यतेचा इन्कार केला असला तरी रशियाच्या या वाढत्या सागरी प्रभुत्वाला पायबंद घालण्यासाठी अमेरिकेने जाहीर केले की, पॅसिफिक मधील सातवे आरमार या पुढे हिंदी महासागरातही गस्त घालेल. (सातव्या आरमाराची अशी गस्त आपण बांगला देशच्या युद्धात पाहिलीच) अशा रीतीने ब्रिटीश आरमार चालते झाल्याने हिंदी महासागरात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी रशिया-अमेरिकेत रस्सीखेच सुरू झाली. पण यामुळे जपान मात्र काळजीत पडला की, जपानच्या बचावापासून सातवे आरमार विचलीत होईल आणि रशिया-अमेरिकेला जरब बसवण्यासाठी चीनदेखील स्वतःचे आरमार सामर्थ्यसंपन्न बनवेल आणि जपान दुहेरी कात्रीत सापडेल.

हिंदी महासागरातील या आव्हानापेक्षा खरे आव्हान रशियन आरमाराने अमेरिकेच्या उंबरठ्याशी जाऊन दिले. अमेरिकन भूमीचे लक्ष्य वेध घेणाऱ्या पाच रशियन पाणबुड्या अमेरिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यालगत क्षेपणास्त्रांनी सज्ज होऊन ठाण मांडून बसल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत क्युबन नौदलाच्या छोट्यागटाबरोबर सोविएत टास्क फोर्सने मेक्सीकोच्या आखातात पाणबुडीविरोधी ज्या कवाईती चालवल्या आहेत त्यात कित्येक वेळा रशियन आरमार अमेरिकन भूमीपासून केवळ तीस मैलांवर येऊन उभे ठाकले होते. यामुळे अमेरिकन जनतेत घबराट पसरू नये म्हणून निक्सन सरकारने क्युबामधील सोविएत आरमार कायम तेथे राहणार नसल्याचे जाहीर केले. तरी पण कॅरेबियन समुद्रातील अमेरिकन नौदलाच्या कमांडरचे असे म्हणणे आहे की, सोविएत आरमार यापुढे क्युबातच ठाण मांडून बसेल. क्युबाच्या दक्षिण किनाऱ्यालगत सिनफ्युएगो या ठिकाणी खोल समुद्रात नांगर टाकता येण्याजोग्या तीन प्रचंड गोद्या बांधण्यात आल्या असून क्युबाने सोव्हिएत आरमारांस इंधनाच्या आणि दुरुस्तीच्या सर्व सोयी सवलती दिल्या आहेत. इतकेच नव्हे तर पाणबुड्यांशी संपर्क साधण्यासाठी सोविएत आरमाराने तेथे अत्याधुनिक सामुग्रीने सज्ज असा उंच रेडीओ टॉवरही उभारला आहे. या व्यतिरिक्त क्युबन बंदरातून रशियन मच्छिमारी बोटी, व्यापारी बोटी, सागरी संशोधन नौकांची मोठ्या प्रमाणावर जा-ये चालू असतेच. आधीच छोटासा कम्युनिस्ट क्युबा अमेरिकेच्या छाताडावर पाय रोवून उभा राहिला, त्यात त्याला नष्ट करण्याचे अमेरिकेचे सारे प्रयत्न कम्युनिस्टांच्या एकजुटीमुळे व्यर्थ ठरले – आणि आता तर सोव्हिएत आरमारास तळ देऊन क्युबाने आपले अस्तित्व आणखीन भक्कम केले आहे. याबाबत बोलताना कॅलीफोर्नीयातील सेंटर फॉर स्ट्रॅटेजीक अॅण्ड इंटरनॅशनल स्टडीजचा जॉर्जटाऊन युनिव्हर्सिटीचा तज्ञ रॉबर्ट कीलमर्ज म्हणतो की– 'सोविएत आरमाराची येथील शक्ती भूमध्य समुद्रातील शक्तीएवढीच दिसू लागेल." ◻

केवळ आरमार वाढवण्यावर रशिया स्वस्थ बसला नसून आपली व्यापारी नौकांची ताकदही त्याने गेल्या दशकात नेत्रदीपकरीत्या वाढवली आहे. आजच रशियन व्यापारी नौकांचे टनेज अमेरिकन व्यापारी नौकांच्या टनेजपर्यंत जाऊन ठेपले आहे. त्यात भर म्हणजे पोलंड आणि पूर्व जर्मनीच्या शिपयार्डमध्ये रशियासाठी अनेक व्यापारी नौकांचे बांधकाम चालू आहे. याव्यतिरिक्त जपान नेदरलंडसारख्या भांडवलदारी देशांकडेही व्यापारी नौकांसाठी रशियाने ऑर्डरी नोंदवल्या आहेत.

नुसत्या सागरी संशोधनासाठीच रशियाने दोनशे बोटींचा काफला तयार केला असून जगातील इतर राष्ट्रांच्या तुलनेत तो सर्वांत मोठा आहे. समुद्रातील प्रत्येक प्रवाहाचे वेग–खोली–तपमान–समुद्रतळ यांचे वेध आणि तपशील घेण्याचे काम सतत चालू असते. हा तपशील कोळी–पाणबुड्या–सागरी प्रवासाप्रमाणेच आरमारालाही जास्त उपयुक्त असतो.

जरी रशियन व्यापारी आणि आरमारी नौदलाचे प्रमुख वेगवेगळे असले तरी त्यांचे कार्य विशिष्ट ध्येयानुसार सुसूत्रच चालत असते. उदा. तटस्थ राष्ट्रांना भेटण्यासाठी जेव्हा रशियन युद्धनौका जातात तेव्हा 'ट्रॉवलर फ्लीट 'ना-संरक्षक नौकांनाही गोदीत धक्क्याला लावण्याची परवानगी मागून घेण्यात येते. त्या पाठोपाठ राखाडी रंगाची व लाल निशाणाची क्षेपणास्त्र सज्ज क्रुझर येतेच.

सोविएत आरमारामध्ये केवळ ऱ्याऐंशी फुटांच्या कोमार मिसाइलपासून एकोणीस हजार दोनशे टनापर्यंतच्या स्वेअर्डलो क्रुझरपर्यंत विविध आकाराच्या–विविध प्रकारच्या बोटी आहेत. पोलरीस पाणबुड्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी रशियाने हंटरकीलर पाणबुड्या बांधण्यावर भर दिला आहे. रशियन क्रेस्टा II क्रुझरच्या अत्याधुनिक आणि सामर्थ्यशिलतेची अमेरिकन तज्ज्ञांनीही मुक्तपणे प्रशंसा केली आहे. क्रीवाक या आकाराने लहान, स्वस्त पण परिणामकारक डीस्ट्रॉयरची भर सोविएत आरमारात सतत पडतच आहे. या घटकेस रशियाकडे सागराखालील मोठे शस्त्र म्हणजे वायक्लास पाणबुडी. जिला अमेरिकन नौदल यांकी म्हणून ओळखते. ही पाणबुडी पोलरीस पाणबुड्यांच्या तोडीची असून या घटकेस रशियाकडे अशा बेचाळीस पाणबुड्या आहेत व त्यात वर्षाला बारा या प्रमाणात भर घातली जात आहे. तर अमेरिकेच्या पोलरीस बोटींचा आकडा एक्केचाळीसवरच थांबला आहे. अगदी अलीकडे समुद्राखालून तीन हजार मैलांवर मारा करणारे क्षेपणास्त्रे बसवलेल्या मोठ्या पाणबुड्या रशियाने बांधावयास काढल्या आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाच हजार मैलांवर मारा करणारी अंडरसी लाँगरेंज मिसाइल सिस्टीमची बांधणी अमेरिकेने सुरू केली आहे. पण अमेरिकेच्या अशा किरकोळ प्रयत्नांनी सोविएत आरमाराची पिछेहाट होऊ शकणार नाही, कारण आजच अमेरिका व रशिया यांच्या वेगात भलतीच तफावत पडली आहे. सोविएत रशिया जेव्हा आठ

जहाजे बांधतो तेव्हा अमेरिका एक जहाज बांधते. अमेरिकन नौदलातील बोटी अठरा वर्षांनंतर बाद ठरवण्यात येतात तर रशियन बोटी आठ वर्षानंतर बाद ठरवण्यात येतात. एक तर त्या इतर राष्ट्रांना विकण्यात येतात वा रूपांतरित केल्या जातात किंवा निकालात काढल्या जातात. त्यामुळे रशियन बोटी अमेरिकन बोटीं-पेक्षा अधिक वेगवान आणि अत्याधुनिक झाल्या आहेत.

रशियन नौदल भौगोलिक दृष्टचा चार प्रकारच्या काफिल्यात मोडले जाते. बाल्टीक–नॉर्दन–ब्लॅकसी–पॅसिफिक. या प्रत्येक काफील्यात २७० ते ३५० बोटी असतात. अमेरिकेशी तुलना करता हे दुसऱ्या क्रमांकाचे आरमार ठरेल. काही प्रकारच्या युद्धनौकात तर ते अमेरिकेपेक्षा भलतेच वरचढ आहे. पण असे असले

## तुलनात्मक आकडेवारी

| आरमार | अमेरिका | रशिया |
|---|---|---|
| नौसैनिक | ६,१०,९८५ | ४,६०,००० |
| ॲटॅक कॅरीयर्स | १४ | ० |
| हेलीकॉप्टर आणि सपोर्ट कॅरीयर्स | १० | २ |
| क्रुझर्स | ९ | २५ |
| डीस्ट्रॉयर, फ्रीगेट व डीस्ट्रॉयर एस्कॉर्ट | २१४ | १९० |
| न्युक्लीअर पॉवर्ड सबमरीन | ५ | ९० |
| इतर सबमरीन | ४२ | २६० |
| लँडींग क्राफ्ट | ६८ | १०० |
| टॉरपेडो आणि मिसाइल बोटस | २ | ५६० |
| मर्चंट फ्लीट | १४ | १४ |
| एकंदर बोटींची संख्या | ४६८ | १२४१ |

(३१ जानेवारी ७२ च्या 'टाइम 'चे अंकातून)

तरी युद्धकाळात रशियन नौदल त्याच्याच भौगोलिक परिस्थितीमुळे कैदी बनून राहण्याची शक्यता आहे. ज्या नौका सागरात गेल्या नसतील त्यांना सागरात जाताच येणार नाही. कारण मरमागस्कजवळील सीव्हेरोमोर्क्स या नॉर्दन आरमारी तळाचा अपवाद वगळता इतर आरमारांचे तळ हे डावपेचात्मक दृष्ट्या अत्यंत कठीण जागी वसले आहेत. कॅटेगॅट आणि डर्डानेल्स या ठिकाणी जर शेकडो पाण-सुरुंग योग्य प्रकारे पेरले तर बाल्टीक आणि काळ्या समुद्रातील आरमारांची पुरी गळचेपी होऊ शकेल. जपानचेवरील व्लाडीवोस्टोक येथे पॅसिफिक आरमारी तळ आहे. पण हे बंदर उथळ असून वर्षातील कित्येक महिने बर्फाने भरलेले असते. त्या बंदरातून पॅसिफिकमध्ये येण्यास चार अरुंद सामुद्रधुनींचे मार्ग आहेत. त्यामुळे त्या आरमाराची कोंडी करणे सोपे आहे. त्याचबरोबर युद्धशास्त्रदृष्ट्या सोविएत आरमाराची भूमिका लक्षात घेता रशियाच्या भौगोलिक परिस्थितीमुळे पृथ्वीच्या गोलार्धात रशियन आरमार फार ताणले गेले आहे. रशियन आरमाराने पहिल्या फेरीत आपल्याजवळचा शस्त्रसंभार शत्रूवर ओकला, की पुन्हा शस्त्रे भरण्यासाठी त्याची फार धावपळ होईल. तेवढ्या मधल्या काळात त्याची अवस्था रिकाम्या भात्यामुळे संरक्षणविहित राहील. यासाठी सोविएत आरमाराला प्रभावी हवाई-छत्रीची गरज भासणार. त्याचप्रमाणे विविध देशातून कायमचे विकसित तळ लागणार जे मिळवण्यात रशिया आज यशस्वी होत आहे.

गेली सोळा वर्षे अधिकारावर असलेल्या ॲडमिरल सर्जी ग्रोशकोण्हच्या चाणाक्ष आणि तज्ञ नेतृत्वाखाली सोविएत आरमार स्वतःच्या उणीवा झपाट्याने दूर करीत आहे. शांततेच्या काळात जो तत्पर असतो तोच युद्धकाळात विजयी होऊ शकतो. हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवून रशियन आरमार अमेरिकन आरमाराची हालचालींची माहिती मिळवण्यासाठी सतत झटत असते. अमेरिकन आरमाराच्या कवाईती चालू असताना जवळ उभे राहून रशियन आरमार त्याच्या फिल्म्स घेत असते. कित्येकदा ही आरमारे केवळ काही मिटर्सच्या अंतरावर येऊन उभी ठाकतात. अशाच एखाद्या प्रसंगातून चकमकी उडू नयेत म्हणून परवाच्या मास्को भेटीत रशिया–अमेरीकेमध्ये खुल्या सागरात एकमेकावर चढाई न करण्याचा करार करण्यात आला. या वरून गांभीर्याची कल्पना येईल.

पण जर अचानक युद्धाला तोंड फुटलेच तर? तर आपण नक्की विजयी होऊ की नाही याबद्दल अमेरिकन अधिकारी सांशक आहेत. अमेरिकन नौदलातला एक अधिकारी म्हणतो ‘मध्यपूर्वेचेच उदाहरण घ्या. जर आमच्या दोन ॲटॅक कॅरीयरस आम्ही गमावल्या तर आम्ही फार अडचणीत येऊ. रशियाकडे ३०० मैल दूर झेपावणारी मिसाइलस क्रुझरवर बसवलेली आहेत, तर आमच्याकडे पाच इंची तोफा. या मध्ये तुलना होऊ शकेल काय? कदाचीत शक्तिशाली हवाई छत्रीमुळे आम्ही त्यांना हारवू देखील पण आता पूर्वी सारखी खात्री वाटत नाही.’ ◻

## काही बोध

'राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी आणि राजकीय प्रतिष्ठेसाठी सागरी सामर्थ्याची अत्यंतिक आवश्यकता असते' एवढेच रशिया-अमेरीकेच्या सागरी प्रभुत्वासाठी चाललेल्या रस्सीखेची वरून स्पष्ट होते, या वरून भारतीय नेते काही बोध घेतील काय ?

समुद्रपर्यटन निषिद्ध मानण्याच्या घातक रूढीने या देशाचे तितकेच नुकसान केले आहे जितके चातुवर्ण आणि जातीयतेने केले आहे. हजारो मैलांचा प्रदीर्घ किनारा असून आसपास प्रतिस्पर्धी राष्ट्रे नसूनही आमच्या दर्यावर्दीपणाचे इतके खोबरे झाले की, आरमार आणि व्यापारी नौकानयन सोडाच धड मच्छीमारीच्या धंद्यातही आम्ही प्रगती करू शकलो नाही.

ज्या देशाचे आरमार प्रबळ असेल तोच देश व्यापार आणि संरक्षणात यशस्वी होतो हेच युरोपचा गेल्या हजार वर्षांचा इतिहास सांगतो. केवळ आरमाराच्या जोरावर छोटयाशा ब्रिटनने जगभर राज्य कमवले, व्यापार जिंकला. जर्मन, फ्रेंच, पोर्तुगीज, डचांना पाणी पाजले. या उलट भारताचा व्यापार शतका पूर्वीच अरब अडत्यांनी ताब्यात घेतला. नंतर ब्रिटीशांनी. मंदबुद्धीच्या पेशव्यांनी घरभेदीपणात स्वत:चे आरमार स्वत:च नष्ट करून ब्रिटीशांना मोकळे रान दिले. आणि दुर्दैवाची गोष्ट ही की, आज स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षांनंतरही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. आमच्या आयात निर्यातीतला सत्तर टक्के भाग परराष्ट्रांच्या व्यापारी बोटीतून भाडयाने आणला-नेला जातो. सुंदर सुंदर बंदरे गाळांनी भरून जाऊन मृतवत होऊन पडली आहेत. इतका प्रचंड सागर किनारा असूनही मासे हे या भुकेकंगाल देशात पुरक अन्न होऊ शकले नाही व अन्नासाठी दाहीदिशा फिरावे लागले आणि आरमार ते इतके चिमुकले की मोठ्या लाटेतही बुडून जाईल.

सहा वर्षांच्या 'अल्पावधीत' एक अजस्र (?) 'युद्धनौका निलगरी' तयार करून आरमाराला अर्पण करण्याचा सोहळा झाला. तो सोहळा म्हणजे राज्यकर्तृत्वहीनतेचे आणि अनाठायी अहंगंडाचे लाजीरवाणे प्रदर्शनच होते. पंचवीस वर्षांनंतर एक युद्धनौका जीचे बहुतांशी आणि महत्त्वाचे भाग परदेशातूनच आयात केले गेले ती इथे जोडण्यात जेमतेम यश लाभले, ते सुद्धा सहा वर्षांनंतर आणि त्याचा केवढा गाजावाजा. युद्धनौकांचे एकवेळ राहू द्या पण मालवाहू आणि प्रवासी बोटीसुद्धा आम्हाला बनवता येऊ नयेत ? त्यासाठी युगोस्लोविया सारख्या छोटया देशाची मदत घ्यावी लागावी ? हा हंत हंत.

दुसऱ्या महायुद्धाने पोळलेले कावेबाज युरोपियन आपापल्या साठमारीसाठी आशियाचे रणक्षेत्र आणि ते सुद्धा आशियन प्याद्यांच्या सहाय्याने खेळू पहात आहेत. अविकसीत मागासलेल्या आफ्रो आशियाई राष्ट्राचे शोषण करण्यासाठी अमेरिकन साम्राज्यवादी नाना मार्ग हुडकताहेत. त्यासाठी हिंदी महासागरात ते मोकाट सुटले आहेत आणि याला जबाबदार भारतीय नेते. हिंदी महासागराच्या संरक्षणाची

निसर्गताच जबाबदारी ज्याच्यावर ते भारतीय आरमार इतके किरकोळ आहे, की सातव्या आरमाराचे एंटर प्राइज सरळ सरळ भारतीय अस्मितेला पायदळी तुडवत बंगालच्या उपसागरात शिरले तेव्हा त्याला बुडवणे सोडाच, हटकणे देखील भारतीय आरमाराला शक्य नव्हते. या उलट टोकीनच्या आखातात अमेरिकन आरमाराने प्रवेश करताच जमतील तेवढी–आवाक्यात असतील तेवढी जहाजे छोटयाश्या व्हिएटनाम्यांनी बुडवून टाकली. हॅफान बंदराची नाकेबंदी करू पाहणाऱ्या जहाजांवर हल्ले चढवले. पाणसुरुंग काढावयाचे प्रयत्न करून येनकेन प्रकारेण ती नाकेबंदी फोल ठरवून अमेरिकेचे नाक कापले.

जगातल्या साम्राज्यवादी राष्ट्रांच्या कचाटयातून सुटायचे असेल तर अविकसित देशांनी परस्परांशी मदत-सहकार्य-व्यापार करूनच पुढे गेले पाहिजे आणि अविकसित तटस्थ राष्ट्रांचे 'स्वयंभू नेते' व्हायचा प्रयत्न भारताचे यच्चावत सारे पंतप्रधान करीत आले आहेत. पण नेतृत्व केवळ घोषणांनी आणि भावनात्मक भाषणाने येत नाही. त्यासाठी सामर्थ्य असावे लागते. पण इथे तर भारताचा सारा व्यापार-उदीम आफ्रो-आशिया पुरता मर्यादीत आणि तो व बाकीचा व्यापारसुद्धा बडया राष्ट्रांच्या सदीच्छेवर आणि महतीवर चाललेला. अशा परिस्थीतीत कोणते शहाणे राष्ट्र भारतीय नेत्यांना किंमत देईल ?

जी प्रवाही असते ती संस्कृती आणि प्रवाही नसते ती केवळ विकृती होय. भारत आणि चीनच्या पूर्वकालीन संस्कृतीची जी भ्रष्ट विकृती नंतरच्या काळात शिल्लक राहिली त्याचे प्रमुख कारण-या दोन्ही देशांनी सागर संचाराकडे दुर्लक्ष करून समृद्धी ज्ञान आणि बळालाच लाथाडले. म्हणूनच या विशाल देशावर, जे हजारो वर्षापूर्वी वैभवाच्या शिखरावर होते अशा या देशावर किरकोळ युरोपियन राष्ट्रे सत्ता गाजवू शकली. त्यांना गुलाम करू शकली. पूर्वीच्या या इतिहासावरून कम्युनिस्ट चीन शहाणपणा शिकला आहे. त्याने व्यापारी नौकानयनात स्वयंपूर्णता गाठली असून स्वतःचे आरमारही त्याने इतक्या झपाटयाने वाढवयास सुरुवात केली आहे, की जपानसारख्या संपन्न आणि अमेरिकन कृपाछत्राखालील राष्ट्रालाही त्याची दहशत बसली आहे !

आपण मात्र पावसाळयात गटारात कागदी बोट सोडून नाचणाऱ्या पोरांप्रमाणे निलगरी अरबी समुद्रात तरंगू लागली म्हणून टाळया वाजवू या. भारताचेच बांधव शोभणाऱ्या छोटया पाकिस्तानच्या इवल्याश्या आरमाराचा भारतीय आरमाराने कसा फडशा पाडला याची तिखटमीठ लावून चर्चा करू या–(जो प्रत्यक्षात बरोबरीचाच सामना झाला) आणि युद्धस्य कथा रम्या या न्यायाने रशिय अमेरिकेच्या अजस्र आरमारांची केवळ वर्णने वाचून हर्षोत्फुल्लीत होऊन अबब करत बसू या !!

□ □ □

## क्रीडांगण

# हे व्हायला नको होते!

**मुकुंद मणूरकर**

सध्या घटना दुरुस्तीचे पेव सर्वत्र फुटले आहे. क्रीडासंस्था तरी त्याला अपवाद कशा राहणार! मुंबईच्या क्रिकेट क्लब ऑफ इंडिया (सी. सी. आय.) ने मागील आठवड्यात मोठी धमाल उडवून दिली. पाकिस्तानचे अध्यक्ष जनाब भुट्टोमियाँ हे सी. सी. आय. चे आजीव सभासद होते. संस्थेतील त्यांचे नामधारी अस्तित्व काहींना नामुष्कीचे वाटत होते. परंतु कायदेशीर अडचणींमुळे सहजासहजी त्यांचे सदस्यत्व रद्द होणार नव्हते. म्हणून घटना दुरुस्तीचा मार्ग अवलंबिला आणि हा घटना दुरुस्तीचा ठराव निर्विवाद बहुमताने पसार झाला. या ठरावात भुट्टोंचा नामोल्लेख नव्हता. आणि इथेच गाडे चुकले! ठरावात असे म्हटले की, भारताच्या शत्रुराष्ट्राचे किंवा ज्या देशाचे भारताशी युद्ध चालू आहे त्या देशाचे नागरिक, हे संस्थेचे सदस्य म्हणून राहू शकणार नाहीत. यामुळे भुट्टो आणि इतर ४७ पाकिस्तानी नागरिकांचे सदस्यत्व रद्द झाले. भुट्टोंचे सदस्यत्व रद्द करण्याबद्दल दुमत संभवत नाही. त्यांचे सदस्यत्व रद्द व्हायलाच पाहिजे होते, पण ते पाकिस्तानचे अध्यक्ष वा पाकिस्तानचे नागरिक म्हणून नव्हे तर एक व्यक्ती म्हणून! एखादी व्यक्ती, मग ती शत्रुराष्ट्राची नागरीक असो, वा आपल्याच देशाची असो, तिने भारताशी किंवा भारताच्या सर्वश्रेष्ठ नेत्याची असभ्य शब्दात निर्भत्सना केल्यास तिचे सदस्यत्व जरूर रद्द करावे. भुट्टो हे सतत भारताची निंदा करीत असतात. त्यामुळे ही गोष्ट नामुष्कीची वाटून सी. सी. आय. ने एकट्या भुट्टोंचे सदस्यत्व रद्द करावयास हवे होते. पण त्यांनी इतर ४७ पाकिस्तानी नागरिकांवर अकारण वरवंटा फिरविला. केवळ ते शत्रुराष्ट्राचे नागरिक म्हणून! पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, राजकारणात शत्रू वा मित्र कधीच शाश्वत नसतो. इंदिरा गांधी व भुट्टो यांची शिखर परिषद २८ जूनला दिल्लीत होणार आहे. जर या बैठकीत मतभेद मिटून भारत-पाकिस्तानात सलोखा निर्माण झाला, 'हिंदी-पाकिस्तानी भाई भाई' या घोषणेचे वारे घुमू लागले तर पाकिस्तान हे शत्रूराष्ट्र म्हणून समजले जाईल का? सदस्यत्व रद्द झालेल्या इतर ४७ जणात के. सी. इब्राहिम नावाचा भारताचा माजी कसोटीपटू आहे. तसेच एक दोघे मुंबईतील स्थानिक संघाकडून खेळत असत. फाळणीनंतर हे सर्वजण पाकिस्तानात गेले.

या इथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे. अनेक भारतीय नागरिक पाकिस्तानातील काही क्रीडासंस्थाचे सभासद आहेत. फाळणीपूर्वी त्यांचा त्या संस्थांशी संबंध होता. त्या संस्थांही आता या भारतीयांचे सदस्यत्व रद्द करतील. इतकेच कशाला, भारतातील अनेक प्रसिद्ध खेळाडू, क्रिकेट बोर्डाचे पदाधिकारी लंडनच्या 'एम. सी. सी.'चे तहह्यात सभासद आहेत. समजा उद्या भारत सरकार आणि इंग्लंड सरकार यांचे राजकारणात वाजले, गंभीर स्वरूपाचे मतभेद निर्माण झाले; तर एम. सी. सी. सुद्धा या लोकांचे सदस्यत्व रद्द करू शकेल. आणि त्या वेळी मात्र 'क्रीडांगणात राजकारण कशाला आणता ?' म्हणून हे सी. सी. आय. चे वीरच शंख करतील. विजय मर्चंट सारख्या सुजाण व अभ्यासू माणसांनी या ठरावाला विरोध केला. पण त्यांची 'पाकिस्तानीप्रेमी' म्हणून संभावना केली गेली. राष्ट्राची अस्मिता हा खेळाचा आत्मा; असे या ठराव आणणाऱ्यांचे म्हणणे. आणि हे शंभर टक्के खरे आहे. पण या लोकांनी जरा स्मरणशक्तीला ताण द्यावा. भारत-पाकिस्तान युद्ध ऐन धुमश्चक्रीत चालू असताना ऑस्ट्रेलियात, शेष विश्वसंघ व ऑस्ट्रेलिया यांच्यात कसोटी सामने चालू होते. शेष विश्वसंघात सुनील गावसकर, बेदी व इंजिनियर हे भारतीय खेळाडू इतिखान आलम, झहीर अब्बास व मसूद या पाकिस्तानी खेळांडूबरोबर खेळत होते. एका हॉटेलात राहात होते. ते एकमेकांचे मित्रही होते. असे असताना गावसकर प्रभृतींना राष्ट्राभिमान नाही असे म्हणणार का ? खेळात राजकारण येऊच शकत नाही हे या खेळाडूंनी दाखवून दिले. आणि

---

## पुण्यात पावसाळी छत्र्या

पुणे :– पावसाळ्यात वळचणीच्या जागी पाणी साचून अनेक 'पावसाळी छत्र्या' उगवतात. पण मध्यंतरी ऐन उन्हाळ्यात अशा छत्र्या उगवल्या ! थांबा, असे आश्चर्याने पाहू नका ! निसर्ग असले अचरट चमत्कार कधीच करीत नाही. हा चमत्कार घडला होता पुणे जिल्हा खोखो असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ! त्या दिवशी नियामक मंडळाची निवडणूक होती. सर्व सत्ता ताब्यात घ्यायची तर पुरेसे सभासद पाठीशी हवेत. म्हणून पुण्यातील एका संघाने नवीन क्लृप्ती अवलंबिली. ऐन वेळी सभासदांची संख्या वाढविण्यात आली. मूळात अस्तित्वात नसलेले संघ एकेका व्यक्तीच्या रूपाने आकार घेऊ लागले. रीतसर शुल्कही भरण्यात आले. बघता बघता एका तासात मूळच्या २० संघांचे ३८ संघ झाले. नंतर अभूतपूर्व गोंधळ होऊन सभा स्थगित झाली. आता ही सभा येत्या २५ तारखेला पुन्हा भरणार आहे. तेव्हा अध्यक्षांनी या नवीन संघातील खेळाडूंची माहिती सभासदांना करून या संघांच्या अस्तित्वासंबंधी सभासदांच्या मनात असलेला संशय दूर करावा, व एका तासात नवीन अठरा संघ उदयास आणल्या-बद्दल क्रीडारसिकांची शाबासकी मिळवावी !

---

वकिली थाटातच बोलावयाचे झाल्यास इंदिरा गांधींच्या वक्तव्याचा आधार घेणे योग्य होईल. त्या वारंवार सांगत असतात की, 'पाकिस्तान व पाकिस्तानी जनता यांच्याशी आमचे कधीच वैर नव्हते. मतभेद आहेत ते केवळ पाकिस्तानी सरकारच्या धोरणांशी ! म्हणजे इंदिरा गांधींच्या दृष्टीनेही पाकिस्तानी जनता भारताची शत्रू ठरत नाही. त्यामुळे हा ठराव ज्या तऱ्हेने पास झाला तसा व्हायला नको होता. केवळ भुट्टोंचेच सदस्यत्व रद्द करून थांबावयास पाहिजे होते. या गडबडीत सी. सी. आय. ने एक वाईट पायंडा पाडून दिला आहे. उद्या कुठल्याही संस्थेतून एखाद्या गटाला बाहेर काढावयाचे झाल्यास बहुमताच्या जोरावर ते सहज शक्य होईल. 'आजीव सभासद' सन्माननीय सभासद' या शब्दांना काहीच किंमत राहणार नाही.

पाकिस्तानी आक्रमणामुळे सर्व भारतीयांप्रमाणे सी. सी. आय. चे सभासदही संतप्त झाले हे समजू शकते. त्यातूनच हा ठराव आकारास आला. पण क्षणैक भावनेच्या भरात हाताळण्यासारखा हा प्रश्न नव्हता, व नाही. असो. भुट्टो प्रभृतींचे सदस्यत्व रद्द झाल्याचे दुःख नाही, इतर संस्था सोकावतील !

## 'महाभारत केसरी' चंदगीराम !

जयपूर येथे सवाई मानसिंग स्टेडियमवर 'महाभारत केसरी' पदासाठी कुस्त्या झाल्या. त्यात भारताचा सर्वश्रेष्ठ मल्ल मास्टर चंदगीरामने 'भारत केसरी' मेहेरदीनवर मात करून विजय मिळविला. या दोन मल्लांची गाठ पडण्याची ही चौथी वेळ. एक अपवाद वगळता या सर्व लढती चंदगीरामनेच जिंकल्या.

तीस हजार प्रेक्षकांसमोर झालेली ही लढत खचितच रोमहर्षक ठरली. प्रथम काही वेळा दोन्ही मल्लांनी एकमेकांच्या ताकदीचा अंदाज घेतला. पण थोड्याच वेळात चंदगीरामने त्याच्या नेहमीच्या खेळीस प्रारंभ केला. प्रतिपक्षाचे मनगट वाकविण्यास सुरुवात केली. अर्थात हा त्याचा प्रयत्न फसला. पण आठव्या मिनिटालाच चंदगीरामने मेहेरदिनचा पाय ओढून त्याला खाली पाडले व त्याच्या पाठीवर बसला. मेहेरदीन आखाड्याचा दोर धरण्याचा प्रयत्न करीत होता. नियमाप्रमाणे पंच लढत परत सुरू करणार होते. पण चंदगीरामने त्याला हरकत घेतली. तो तसाच मेहेरदीनच्या पाठीवर बसून राहिला. अखेर सोळाव्या मिनिटाला पंचांनी दोन्ही मल्लांना मध्यभागी आणून परत लढत सुरू केली. पण चंदगीरामने त्याला पुन्हा खाली पाडले. व त्याच्या पाठीवर बैठक मारली. मेहेरदीन वर येण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याला ते शक्य झाले नाही. पंच परत लढत सुरू करण्याच्या विचारात होते. पण मेहेरदीन अतिशय दमला होता. त्याने स्वतःच पंचांना लढत थांबविण्याची विनंती केली व आपण पराभव मान्य केला.

ऑलिंपिकपूर्व शिबिरासाठी चंदगीराम आता पुण्याला येईल तो आत्मविश्वास घेऊनच. ऑलिंपिकमध्ये कुस्तीतील चंदगीराम हे भारताचे एकमेव आशास्थान असेल, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ◻ ◻ ◻

# मध्यंतर

## शोनार बांगला

### अजूनही धागा सापडत नाही.

**—पुष्पा भावे**

मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेने श्री. श्री. ना. पेंडसे यांचे 'शोनार-बांगला' हे नवे नाटक सादर केले आहे. प्रचलित विषयावर लिहिल्या गेलेल्या नाटकांविषयी, का कोण जाणे, मनात काही शंका नेहमीच असतात. या शंका मराठीच्या संदर्भात समर्थनीयच ठरतात; कारण मराठी नाटककाराने सामाजिक अनुभव जीवंतपणे व्यक्त केले आहेत, असे क्वचितच घडते. तरीही प्रस्तुत नाटककार मराठीतील अत्यंत महत्त्वाचा कादंबरीकार असल्यामुळे त्याच्या कोणत्याही नव्या नाटकाविषयी किमान अपेक्षा असतातच. श्री. श्री. ना. पेंडसे कादंबरीकार म्हणून आपले अनुभव फार पारखून निवडतात; त्याची रचनाही अंतर्वेधी असते. परंतु त्यांची सारीच नाटके त्यांच्या प्रस्थापित वाङ्मयीन व्यक्तिमत्वाला न्याय देणारी नाहीत. किंबहुना नाटक हे आविष्कारमाध्यम त्यांना सापडले आहे असे कधीच वाटत नाही. हे असे का होते याचे उत्तर शोधणे फार कठीण आहे. पण चटकन् काही विरोध जाणवतात ते असे की, कादंबरीतील रचनाकृतीविषयी कला व कारागिरी या दोन्ही अंगांनी जागृत असणारे पेंडसे नाटकाच्या रचनेविषयी उदासीन वाटतात. कादंबरीमध्ये अनेक विलक्षण एकारलेली व्यक्तिचित्रे निर्माण करणारे पेंडसे नाटकामध्ये सपाट, साचेबंद व्यक्तिचित्रे उभी करतात आणि अत्यंत खटकणारा विरोध असा की कथानकप्रधान असूनही अंतर्मुखतेकडे प्रवास करणाऱ्या कादंबऱ्या लिहिणारे पेंडसे, नाटककार म्हणून अत्यंत बहिर्मुख कथाबीज निवडतात. असे का होते ? यामध्ये व्यावसायिक रंगभूमीच्या स्वरूपाचा काही वाटा आहे की आविष्कार-माध्यमाचे तर्कशास्त्र न गवसल्याचा हा परिणाम आहे, हे नकळे.

'शोनार बांगला' हे पेंडश्यांचे नवे नाटक बांगला देशाच्या लढ्यातील काही दिवसामध्ये घडत असले, बुलेटिन काढणारे गांगुली, त्यांच्यापुढील प्रश्न, पुलिन, सत्येन सारखी निष्ठावान माणसे, स्वामीजींसारखा हेर हे सगळे त्यात असले, तरी

हे नाटक उभे राहते ते सोना या सतरा वर्षाच्या मुलीच्या दैनंदिनीतून. (ओळखीच्या खुणेने दचकण्याचे कारण नाही. नाटककारानेच ‘Diary of Ann Frank’ चा उल्लेख करून त्यातील कल्पना संबंध व्यक्त केला आहे). सोना, तिचे आई-वडील, सत्येन हा जखमी क्रांतिकारक, पुलिन, स्वामीजी ही माणसे एका ज्यूट-मिलच्या माळचावर अडकलेली आहेत. तिथे कोंडलेल्या वातावरणातून ती आशेने बाहेरील जगाचा आपापल्या परीने वेध घेत आहेत. बाहेर बांगलामुक्तीचे भीषण नाट्य चालू असतानाच या टिचभर जगात अडकलेल्या जिवांमध्ये वेगवेगळे ताण निर्माण होत आहेत. पुलिन व सोना यांच्यामध्ये काही वेगळे बंध निर्माण होत आहेत. बाहेर घनघोर संग्राम चालू असताना आपण सुरक्षित राहणे योग्य नाही; प्रेमाचा स्वीकार करण्याची ही वेळ नाही, असे वाटून पुलिन सोनाचा व त्या घराच्या आश्रयाचा त्याग करतो. जवळ येणाऱ्या यशाने बांगला देशातील तरुण रक्त बेहोष होत असते तर गांगुलींना मुसलमान अत्याचारांना बळी पडलेल्या कुमारी मातांचा प्रश्न भेडसावत असतो. १९४७ मध्ये घडलेली पातके पुन्हा घडू नयेत यासाठी ते तळमळत असतात. यशानंतरच्या अधिक अवघड लढाईच्या कल्पनेने तळमळत असतात. तर इकडे गांगुलींची पत्नी, सोनाची आई, आपली लेक एका बेवारशी मुलावर प्रेम करते या कल्पनेने तळमळत असते. कष्टाचे दिवस सरत आले आहेत असे वाटते; विजयाची बेहोष वार्ता बांगला देशात अवतरते; त्याच क्षणी या ज्यूटमिलच्या माळचावरील देशभक्तांचा खानांना सुगावा लागतो; आणि शेवटच्या क्षणी सारे नाहक बळी पडतात; पुलिनला सर्वस्व देण्याचे स्वप्न पाहणारी सोनाली खानांच्या हाती सापडते; तरी नाटकाच्या अंती पुलिन येऊन तिचा स्वीकार करतो. सोनालीची दैनंदिनी हे या नाटकाचे प्रमुख सूत्र आहे. परंतु याचा नाटककाराला अनेकदा विसर पडलेला दिसतो. ज्या वेळी एका व्यक्तीच्या दृष्टिकोनातून तुम्ही एखादा अनुभव पाहता, त्या वेळी त्या अनुभवाचे स्वरूप अधिक अंतर्लक्षी असायला हवे. परंतु तसे या नाटकात घडत नाही. नाटककाराच्या मनातील दुसरे प्रमुख सूत्र म्हणजे स्त्रीच्या मुक्ततेला असलेली नैसर्गिक मर्यादा. कोणातरी पुरुषाच्या वासनेला बळी पडलेल्या स्त्रीला पतित मानावयाचे काय हा सनातन प्रश्न (मामा वरेरकरांच्या ‘अपूर्व बंगाल’चे स्मरण करावयास हरकत नाही) परंतु नाटकाची रचना मात्र या दोन्ही सूत्रांशी एकनिष्ठ राहून झालेली नाही. नाटकात लक्ष वेधून घेतात ती लोभस व्यक्तिमत्त्वे, त्यातील सांकेतिक आकर्षकता. श्री. पेंडसे यांनी आशुतोषबाबू गांगुली – सोनाली व सोनाची आई यांचे नाते मात्र हृद्यपणे व्यक्त केले आहे. सोनाची व्यक्तिरेखा ही कोणाही रसिकाला प्रथमदर्शनी आवडेल अशी असली तरी Ann Frank चे स्मरण आपल्या मनात असल्यामुळे अपुरी वाटते हे खरे. वरवर फटकळ वाटणाऱ्या परंतु निरागस स्वप्निल नायिका नेहमीच लोकप्रिय होतात हे खरे असले तरी पेंडश्यांसारखे वाङ्मयीन व्यक्तिमत्व व्यक्ति-

रेखेमागे असल्यास तिला अधिक तीव्र स्वरूप प्राप्त व्हावे अशी साहजिकच अपेक्षा असते. स्वामीजींचे सारेच प्रकरण बांडगूळवजा, या विषयावरील नाटकात तसे काही यायला हवे म्हणून आलेले, पहिल्याच अंकात पुढील परिणती सांगणारे, असे आहे. एक मात्र खरे की, या विषयावरील कोणत्याही नाटकाचा सूर चढा लागण्याची शक्यता असूनही नाटककाराने तो टाळला आहे.

## नेटके दिग्दर्शन

या नाटकाचे दिग्दर्शन श्री. रमेश चौधरी यांनी नेटके केले आहे. नाटकातील उणीवा नेमक्या जाणून त्या दिग्दर्शनाने झाकण्याचा यत्न केला आहे. विशेषत: हालचालींची योजना आणि मुद्राभिनयाचा वापर यामध्ये त्यांची जाणकारी व्यक्त होत होती. श्री. सखाराम भावे यांनी उभे केलेले नेपथ्य वास्तव होतेच; परंतु हालचालींच्या विविध रचना करण्यास उपकारक होते. या नाटकातील मुख्य भूमिका सोनालीची कु. भक्ती बर्वे यांनी केली. या तरुण अभिनेत्रीने गेल्या काही वर्षांत केलेल्या भूमिकांची रूपे इतकी सारखी आहेत, की त्यामुळे त्यांच्या अभिनयाचा एक साचा बनतो की, काय असे भय वाटते. याही नाटकात त्यांनी अभिनयाची समज व्यक्त केली असली तरी, त्या स्वत:ला दूर करू शकत नाहीत. त्या कु. बर्वे दिसतात, तशाच त्या बोलतात, वागतात. या नाटकात आश्चर्याचा धक्का दिला श्री. दाजी भाटवडेकर यांनी. 'कोणतीही भूमिका 'काकाजीं'च्या ढंगाने करणाऱ्या या नटाने आशुतोषबाबू गांगुली उभे करताना, लेकीचे–आपले नाते रंगमंचावर प्रस्थापित करताना, संयत अभिनयाचा योग्य व लक्षणीय वापर केला. त्याबद्दल त्यांचे व दिग्दर्शक श्री. चौधरी यांचे अभिनंदन. सौ. भडभडे यांची शब्दोच्चारणाची लकब अत्यंत सदोष होती. श्री. अनंत वर्तक, श्री. कारेकर यांनी योग्य साथ दिली. पुलिनची भूमिका करणारा लिलाधर मयेकर मुद्राभिनयाचा फार परिणामकारक वापर करीत असला तरी त्याचा आवाज फार कमकुवत आहे.

श्री. पेंडसे यांच्यासारख्या समर्थ लेखकाने विविध नाट्यात्मक शक्यता असणाऱ्या कथाबीजातून इतके सामान्य नाटक का निर्माण केले कोण जाणे. परंतु श्री.चौधरींच्या दिग्दर्शनाने व श्री. भाटवडेकर आणि कु. बर्वे यांच्या अभिनयामुळे या नाटकाचा प्रयोग सुसह्य झाला आहे. श्री. अशोक रानडे यांनी बंगाली वातावरणाचा आभास संगीतयोजनेने निर्माण केला आहे. एकूण सध्या मराठी नाटकाचे प्रयोग पाहात असताना दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, अभिनय, नेपथ्य यातील कार्यक्षमता विरुद्ध सुमार लेखन असाच प्रकार दिसतो.

पुण्या-मुंबईत बराच बोलबाला झालेला

# अनुभव

**देवीदास बागूल**

पुरुष स्त्रियावर अन्याय करतात काय ? तो पुरुष कोण आहे यावर या प्रश्नाचं उत्तर अवलंबून आहे. म्हणजे तो जर भाऊ असेल तर मग उत्तर नकारार्थी. भावा-बहिणीचे प्रेम कोणाला माहित नाही ? तो जर मुलगा असेल तर मग त्याला अन्याय हा शब्दच माहीत नसणार. कारण 'प्रेमस्वरूप आई, वात्सल्य सिंधू आई' ही कविता तोंडपाठ असल्यावर हा मुलगा कशाला आईला छळील ?

पण हाच पुरुष नवरा असेल तर मग मात्र स्त्रीचा छळ ठरलेलाच आहे म्हणून खात्री बाळगा. खोटं वाटत असेल तर 'अनुभव' नावाचा चित्रपट पाहा. त्यातली नायिका नवऱ्याला चक्क म्हणतेच की 'तूही सगळ्या पुरुषासारखाच आहेस. लग्न होऊन सहा वर्षे झाली, पण तुझ्याकडून मला हवं ते सुख कधीच मिळालं नाही.'

पण पुरुष जर प्रियकर असेल तर मग मात्र 'ते' सुख सहा तासातसुद्धा मिळतं.

पण जीवनात पुरुष कायम प्रियकर राहू शकत नाही. तो कधीतरी नवरा होतो. आणि मग स्त्रीचं दुःखी जीवन सुरू होते.

आता ह्या दुःखी जीवनाचा 'अनुभव' कसा आहे ?

मुंबई नावाच्या नगरीत 'उषा किरण' नावाची चोवीस मजली इमारत उदाहरणादाखल घेऊ. (हे उदाहरण भलतेच श्रीमंती आहे हे कबूल. ह्या इमारतीत जाऊन वैवाहिक दुःख भोगायचे म्हणजे ना. सी. फडक्यांच्या सुखवस्तू नायक-नायिकांनाही छपन्न वेळा विचार करावाच लागेल.) नवरा बडा पगारदार. घरात चार नोकर. पार्टीच्या प्रसंगापासूनच चित्रपट सुरू करू. नवरा-बायको मिळून मिसळून सगळ्यांचे स्वागत करतात. सगळे आरामात दिसतात. आता अशा वेळी दुःख कसे दिसेल ? त्याची काळजी नको. ते बघा एक पोर दिसते आहे. त्याने भोकाड पसरले की नायिका त्याला उचलून घेऊन झोपायच्या खोलीत जाते. त्याला थोपटून झोपवते.

पण पुढे म्हणजे पार्टीबिर्टी आटोपल्यावर आईचा फोन येतो आणि पोर स्वगृही परत जाते.

या गोष्टीवर नायिका विचार करीत असताना दृश्य गोठवण्यात येते आणि त्या दृश्यावर चित्रपटाची श्रेयनामावली सुरू होते.

म्हणजे खरा चित्रपट पुढेच आहे. झालं ते सर्व पार्श्वभूमी म्हणून. यावरून कोणी काही अंदाज बांधील की नायिकेला मूलबिल नाही म्हणून पुढच्या चित्रपटात काही घडणार असेल.

हा अंदाज साफ कोसळतो.

म्हणजे आधीच्या नमनाचे तेल वायाच गेले.

नंतरच्या चित्रपटात संसारात जिव्हाळा ('लगाव' हा नायिकेच्या तोंडचा शब्द) नाही म्हणून नायिका तो निर्माण करण्यासाठी मोहीम काढते. त्या मोहिमेचा भाग म्हणून ती घरातल्या तीन नोकरांना काढून टाकते आणि स्वत: घरकामे करून नवऱ्याला न्हाऊमाखू, खाऊपिऊ घालते. नवऱ्याला तर हे सुख चांगलेच मानवते. दोघे सुखाने राहू लागतात.

आता पुढे काय करायचे ? चित्रपट पुढ कसा ढकलायचा ?

मग आणा. नायिकेच्या विवाहपूर्व जीवनातला प्रियकर.

त्याप्रमाणे तो येतो. पण तो भलताच समजूतदार. तो तर चक्क म्हणतो की आपण दोघे नवऱ्याप्रमाणे एकत्र येऊन परस्पर परिचय करून घेत घेत आनंदाने राहू. हे म्हणजे चित्रपट उद्‌ध्वस्त करण्याचेच ढंग दिसतात. तसं करून कसं चालेल ? म्हणून नायिका मागचं मनात धरून त्याला घरी यायला बंदी करते. ही बंदी न कळत नवऱ्याच्या कानावर पडते. मग तो अस्वस्थ होतो. पण राग आपल्याच बायकोवर काढण्याऐवजी प्रियकराला स्वत:च्या ऑफिसमधून काढून टाकण्याचे ठरवतो. पण माजी प्रियकर फारच समजूतदार. तो म्हणतो की मी आधीच राजीनामा लिहून आणला आहे. त्याच्या हस्ताक्षरातील राजीनामा पाहिल्यावर नवरा शांत आणि समजूतदार होतो. माजी प्रियकराला नोकरीत कायम करून घरी येतो आणि बायकोशी सुखाने नांदू लागतो.

तात्पर्य—चित्रपटातले लोक जर समजूतदार असले तर संसार सुखाचा होईल. ही साठा उत्तराची कहाणी सफल संपूर्ण.

असला चित्रपट म्हणजे एक थट्टेखोरपणाच झाला ! कोणाच्याच मनात जर भांडण करायचे नसेल तर गोष्ट तरी कशी उभी राहणार ? घेतली समस्या की सोडवली चुटकीसरशी, हा प्रकार तर रविवारच्या वर्तमानपत्रातील उषा वहिनींच्या सल्ल्यावरही ताण करणारा आहे.

बरे ह्या चित्रपटात दुसऱ्या काही गंमतीजमती असतील तर त्याहीबाबतीत ठणठणाट ! अगदी चित्रपटाच्या सुरुवातीचा हिशोब घ्या ना. नायक म्हणतो की

काम, भरपूर काम केले पाहिजे. नोकर म्हणतो, साहेब, सहा-सात तास तरी झोपले पाहिजे. नायक म्हणतो की सहा-सात तास म्हणजे फारच झाले. २४ तासांचा तिसरा हिस्सा. म्हणजे आयुष्यातली २० वर्षे झोपण्यात; ३–४ वर्षे खाण्यापिण्यात, स्वत:ची मोटार नसल्यास ४–५ वर्षे बसची वाट पाहण्यात, असा हिशोब मांडीत मांडीत शेवटी नायक म्हणतो की, म्हणजे स्वत:साठी फक्त चार-पाच वर्षेच उरतात.

असला विनोद खरे म्हणजे अनंत काणेकरांच्या लघुनिबंधात शोभून दिसेल. त्या निबंधात छत्री विकत का घेऊ नये हे पटवून देण्यासाठी असलाच वायफळ युक्तिवाद केला आहे.

चित्रपटाच्या सुरुवातीला नायकाच्या तोंडी असला 'वायफळ युक्तिवाद' घालून चित्रपटवाल्यांना 'अनुभवा'ची कोणती जात प्रस्थापित करायची आहे? असा प्रश्न विचारला तर उत्तर काही मिळणार नाही. बरे, नायक अगदीच रात्रंदिवस कामाच्या रगाड्यात गाडून घेतो असेही नव्हे. श्रेयनामावलीच्या आधी पाहावे तर तो चक्क पार्टीमध्ये मन:पूर्वक सामील होतो आहे. इतकेच नव्हे तर तो ऑफिसमध्ये सुद्धा टेबलावर बायकोचा फोटो समोर ठेवूनच काम करतो. लंचची वेळ झाली, की न विसरता बायकोला फोन करतो. अशा नवऱ्याच्या बाबतीत कोणती बायको वैतागेल? पण दिग्दर्शकाचा आग्रहच असला तर मात्र धडगत नाही.

चित्रपटात समजूतदार पात्रांची इतकी गर्दी झाली आहे, की प्रेक्षकांना फार संकोचल्यासारखे होते. नोकर काढून टाकण्याचा प्रसंग घ्या किंवा प्रियकराच्या आगमनाचा प्रसंग घ्या. सगळेच समजून उमजून चालणार! नोकरांना दोन महिन्यांचा पगार नायिका आपणहून देणार, तो घेऊन नोकर गुण्यागोविंदाने घराबाहेर पडणार! प्रेक्षक बिचारा कशाला मध्ये पडेल? प्रियकर तर समजूतदारपणाचा कळसच करतो. त्याच्या समजूतदारपणाचा 'अनुभव' पहिल्या फटक्यातच आल्याने प्रेक्षकांच्या मनात ताणच निर्माण होत नाही. त्यांना खात्रीच असते, की या संसारात सुईच्या अग्रावर मावेल एवढेही वादळ निर्माण होणार नाही. आपण आपले स्वस्थ बसू. याचेच नाव 'अनुभव' काय?

सुरुवातीला एक पार्टी झाल्यावर मध्ये पुन्हा एक उप-पार्टी होते, ती कशाला? तर मन्नाडेचे गाणे टाकण्यासाठी. म्हणजे हे तर चक्क चालू हिंदी सिनेमासारखेच झाले की!

एकदा तर चित्रपटात सुख इतके काठोकाठ भरते, की पुढे काय करावे तेच कुणालाही कळत नसेलसे झाले असावे. म्हणून मग नायिकेची टब-बाथमधली आंघोळ दाखवली. टब-बाथमध्ये आंघोळ कशी करतात ते फार लोकांना माहीत नसेल. तर तेवढ्यासाठी वाटल्यास हा चित्रपट पाहावा. त्या आंघोळीच्यावेळी नायिकेच्या तोंडी एक अवखळ गाणे आणि नायिकेच्या डोळ्यांपुढे मीलनाची दृश्ये.

आता असल्या चित्रपटात कोण कशाला चांगले संगीत देईल ? पहिल्या पोर्टीच्या वेळचे संगीत इतके भांडखोर का होते ? आणि जेव्हा नायकाच्या मनात संशयाचा भडका उडालेला असतो तेव्हा प्रियकराच्या आगमनाच्या वेळी युद्धहल्ल्याचा भोंगा वाजवून प्रेक्षकात हास्यकल्लोळ माजविणारा हा संगीतकार क्रांतिकारक नाही असे कसे म्हणता येईल ? शिवाय ह्या नवराबायकोच्या घरात रेडिओ, फॅन कुणीही नसताना दिवसभर रेडिओवरल्या जाहिराती कशा ऐकू येतात ? इतकं सगळं संगीत कमी पडलं म्हणून की काय, पात्रांच्या मनातली अस्वस्थता सूचित करण्यासाठी घड्याळाची टिकटिक घणाघाती नादात ऐकवली जाते. बा संगीतकारा, तू तरी आपला ठसा उमटवलास हे बरे झाले !

संजीवकुमार हा आपला आवडता नट. त्याच्याबद्दल कशाला वाईट बोला ? तनुजाबाईंनी त्यांच्याकडून काही कसूर केलेली नाही. पण चित्रपटातले अनुभवच इतके निरर्थक असल्यावर कोणाच्या कामाचे सार्थक तरी कसे होणार ?

चित्रपट संपल्यावर मनात प्रबळ इच्छा निर्माण झाली, की हा तापदायक 'अनुभव' विसरण्यासाठी ह्याच दिग्दर्शकाचा 'तिसरी क़सम' सिनेमा लवकरातल्या लवकर परत पाह्यला पाहिजे. त्या चित्रपटातील प्रेक्षणीय, श्रवणीय आणि मननीय अंगे विभिन्न असूनही परस्परपूरक होती. त्यातील पात्रांचे समज-गैरसमज मनोमीलनाच्या अभंगपणासाठी आणि शारीरिक ताटातुटीसाठी कसे काम करत होते ते आठवले म्हणजे दिग्दर्शकाच्या योजकतेची खूण मनोमनी पटत असे. बासू भट्टाचार्य ह्यांचा 'तिसरी कसम' हा सिनेमा आठवावा लागावा ही बाबसुद्धा 'अनुभव चे मोल कमी करण्यास कारणीभूत होतेच होते.

☐ ☐ ☐

---

## फिडेल, चे आणि क्रांती.... पृष्ठ ४२ वरून

झोपेतून दचकून जागे झालेल्या तरुणी प्रमाणे,
ती भूमी खडबडून उठेल,
तेव्हा आम्ही तुझ्या साथीला असू,
निश्चयाने, हाती बंदुका घेऊन.

आणि खरोखरच एका वर्षांच्या आत चे गव्हेरा बंदूक हाती घेऊन फिडेल आणि त्याच्या साथीदारांच्या खांद्याला खांदा लावून क्यूबन क्रांतीसाठी त्या भूमीवर उतरला.

[ क्रमशः ]

एका साध्याच कथेवरचा
पण मनाला चटका लावून जाणारा चित्रपट

# लव्ह स्टोरी

ह. शि. खरात

अत्यंत साधी परंतु मनाचा ठाव घेणारी उत्कृष्ट कथा, नितळ, अकृत्रिम परंतु जीवनानुभूतीचा छेद घेणारे आणि पुन्हा पुन्हा ऐकावेसे वाटणारे मार्मिक पण सहज संवाद व एकमेकांवर मनस्वी प्रेम करणारे, प्रेमावर नितांत श्रद्धा असणारे, संतप्त तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करणारे दोन अफलातून जीव हे 'लव्ह स्टोरी' ह्या चित्रपटाचे प्रमुख वैशिष्टय.

खरं म्हणजे ही 'लव्ह स्टोरी' जितकी सामान्य तितकीच असामान्य. ही नुसतीच भाकड प्रेमकथा नाही. मनस्वी प्रेम म्हणजे काय याचा प्रत्यय आणून देणारी ही आगळी कथा. इथे प्रेम हे केवळ आकाशातून भराऱ्या मारीत स्वप्न रंजन करणारे नसून त्याची मुळे जमिनीत खोल घट्ट रुतलेली. शुद्ध शाश्वत प्रेमाची जातकुळी सांगणारे हे प्रेम जितके देहावरचे आहे तितकेच मनावरचे आहे. देह आणि मन एकरूप होऊन झालेला मूर्तिमंत सुंदर प्रेमाचा अविष्कार म्हणजे 'लव्ह स्टोरी' चित्रपट. नेहमीचे सांकेतिक, रूढ इथे पाह्यला काही मिळत नाही. कथानक नेहमीचे असले तरी कसले ढोंग नाही की तात्त्विक चर्चा नाही, नेहमीच्या आणा-शपथा नाहीत की भयानक जिवघेणे उसासे नाहीत. हाडाच्या माणसांची ही हाडाची प्रणयकथा सौंदर्याच्या एका तरल पातळीवर जाऊनसुद्धा जीवनाची वास्तव अनुभूती देण्यात अत्यंत यशस्वी झाली आहे. व्यावहारिक जगाच्या क्षुद्र पातळीवर ती कधीच उतरत नाही. आपल्याच स्वयंभू विश्वाशी प्रामाणिक असणारी ही कथा कोणत्याही अभिजात कथेइतकीच किंबहुना त्याहूनही मला थोर वाटते ती तिच्या प्रांजळपणामुळेच.

प्रेमाला पैशाहून व स्वतःहून देखील अधिक मोल देणाऱ्या अफलातून तरुण पोरांची ही प्रेमकथा. ऑलिव्हर हा लक्षाधीशाचा बेटा, ग्रॅज्यूएट होऊ घातलेला, तर जेनी ही गरीबाघरची परंतु सुंदर डोळ्यांची अन् हुशार डोळ्याची एक लाघवी पोर.

दोघांच्या वागण्यात कसलीच 'पोज' नाही. दुसऱ्यांनी बघावे म्हणून कसला प्रेमाचा 'शो' नाही. एकमेकांची फिरकी घेणारी, खिजविणारी, एवढंच काय पण एकमेकाला 'बास्टर्ड' किंवा 'बीच' म्हणून शिव्या देणारी, तरीसुद्धा अकृत्रिम शब्दाशब्दातून आपल्या तीक्ष्ण बुद्धीमत्तेचा आणि आनंदी स्वभावाचा प्रत्यय आणून देणारी ही 'जीवंत' पोरं. दोघेही खटचाळ स्वभावाचे.

## पहिली सलामी

पहिल्याच भेटीत जेन ऑलिव्हरची अशी फिरकी घेते की, ऑलिव्हरच काय पण आपणही तिला मानतो. कॉलेज लायब्ररी हॉलमध्ये पहिलाच सलामीचा संवाद असा :

ती : "यू आर स्टूपीड अँड रीच"

तो : "व्हॉट द हेल मेक्स यू सो स्मार्ट"

ती : "आय वूडण्ट गो फॉर कॉफी वूइथ यू"

तो : "लिसन् आय वूडण्ट आस्क यू"

ती : "दॅट इज व्हॉट मेक्स यू स्टुपीड"

—नाही तर काय! साल्या अशा मस्त पोरीला कॉफी प्यायला न्यायचं नाही तर काय सत्यनारायणाच्या पूजेला न्यायचं. जेनी तशी साधी अन् मनमोकळी—हवेतून तरंगत जाण्यापेक्षा जमिनीत पाय रोवून चालण्याची तिची पुरुषी परंतु लाडिक चाल. कॉफी घेताना 'आय लाइक यूवर बॉडी' म्हणून मनापासून सांगणारी, ऑलिव्हरने चुंबन घेताच त्याला खिजविण्याकरिता 'आय डोण्ट लाइक इट' म्हणणारी आणि त्यानं 'व्हॉट' म्हणून विचारताच 'द फॅक्ट दॅट आय लाइक इट' असा चतुर जबाब देणारी जेन त्याच्याकडे पाहून जेव्हा मंद स्मित करते तेव्हा स्मित या शब्दाला खरा अर्थ येतो. ऑलिव्हर काही कमी नसतो. तोही तिची फिरकी ताणतो. एकदा निरोप घेताना म्हणतो, 'आय मे नॉट कॉल यू फॉर ए फ्यू मन्थस्'. ती खलास. ती : 'व्हाय ?' त्याचं मस्त उत्तर : 'देन अगेन आय मे कॉल यू अॅज सून अॅज आय गेट टू माय रूम' 'बास्टर्ड' आपली फिरकी घेतल्याबद्दल तिची कॉमेंट. एकदा खेळात तो जखमी होतो. जखम गालावर घेऊन तो तिला भेटायला येतो. हा प्रसंग मोठा नाट्यपूर्ण आहे. ती त्या वेळेस कुणालातरी फोन करीत असते. त्याच्या कानावर तिचे शब्द पडतात, 'ऑफ कोर्स! अॅब्सोलुट्ली! फील. आय लव्ह यू टू फील.' इकडे याला बर्फाचा कडाच डोक्यावर कोसळल्यागत होते. ती त्याला विचारते, असा का चेहरा झालाय. तेव्हा तो म्हणतो, 'आय अॅम् इन्जुअर्ड!' खात्री करण्याकरिता तो मग विचारतोच. 'जेन, हू इज फील?' मस्त स्मित करीत ती उत्तरते, 'माय फादर.' तो म्हणतो तुझ्या बाला तू नावाने हाक मारतेस. ती म्हणते, 'होय, तू काय म्हणतोस तुझ्या वडिलांना?' तोही अफलातून सरळ सांगतो, 'सन ऑफ बीच.' या चित्रपटातील कितीतरी प्रसंग

अन् कितीतरी मस्त संवाद असे आहेत की ते पाहताना व ऐकताना भर उन्हात पावसाची रिमझिम सुरू व्हावी असे वाटते.

एकदा तो बिचकत तिला विचारतो, 'जेन, डू यू लव्ह मी ?'

ती : "व्हॉट डू यू थिंक"

तो : "या, आय गेस. मे बी"

ती : "ऑलिव्हर, आय डोण्ट जस्ट लव्ह यू..."

(इकडे ऑलिव्हर गॅसवर)...'आय लव्ह यू व्हेरी मच ऑलिव्हर' आणि ऑलिव्हरला पुन्हा हायसे वाटते. तिला लग्नाबद्दल विचारता ती त्याची पुन्हा गंमतच करते. ती : 'यू वाँट टू मॅरी मी ? व्हाय ?' त्याला काहीच सुचत नाही तो नुसताच म्हणतो, 'बिकॉज...'

आणि ती स्मार्ट पोरगी म्हणते, 'दॅट इज व्हेरी गुड रिझन' या चित्रपटातील संवाद हे ह्या चित्रपटाचे मर्मस्थान आहे. अर्थात तरुण पिढीला जवळचे वाटणारे हे 'खरे' संवाद आहेत.

ऑलिव्हर लक्षाधीशाचा बेटा असला तरी बापाशी नफरत करणारा, शिस्तबद्ध पण कृत्रिम, ढोंगी जगाला विटलेला व त्यामुळे बंडखोरी करणारा असतो. मात्र प्रेमावर अपार श्रद्धा असणारा, प्रेमासाठी वाटेल त्याचा त्याग करणारा खरा प्रेमवीर असतो. बापाचा लग्नाला विरोध. त्यातसुद्धा दोघांचे धर्म वेगळे. तो ज्यू तर ही कॅथॉलिक, परंतु दोघेही धर्मापेक्षा प्रेमाला थोर मानणारे. बापाशी संबंध तोडून तो साधेपणाने लग्न करतो. लग्न सोहळा मात्र काव्यमय. एकमेकाला आवडणाऱ्या कवीच्या काव्यपंक्ती म्हणून दाखवून ते एकमेकांचा पति-पत्नी म्हणून स्वीकार करतात. दोघांनाही ढोंगाची अत्यंत चीड. लग्न झाल्यावर बाहेर पडताना तो जेनीला म्हणतो, 'जेन, वुइ आर लिगली मॅरीड,' ती, 'या, नाऊ आय कॅन बी बीच' कसलीच 'पोज' नाही. स्वप्न-रंजन नाही. अलंकृत दिखाऊ भाषा नाही.

लग्नाआधी गळ्यात गळे घालून अभ्यास करणारे हे जोडपे लग्नानंतर पोटापाण्याचा उद्योग करीत अभ्यास करतात. ऑलिव्हरला परीक्षेत तिसरे प्राइझ मिळते. तो तिथेच जेनला 'मॅटरनिटी अवॉर्ड' म्हणून ते देऊन टाकतो. तो करारी असतो. निमंत्रण आले तरी बापाच्या वाढदिवसाला जात नाही. जेन काकुळतीला येऊन त्याला बापाशी दोन शब्द बोलायला सांगते. परंतु तो उलट तिच्यावरच चिडतो. ती चिडून निघून जाते. हा तिला खूप शोधतो. थकून घरी येतो तर ही घरी परत आलेली असते. तिला हमसाहमशी रडताना पाहून तो म्हणतो, "जेन आय ॲम सॉरी." तेव्हा जेन जे उत्तर देते ते उत्तर त्याच्यापुढील जीवनाचा ताम्रपट होतो. ती म्हणते, "लव्ह मीन्स नॉट एव्हर हॅविंग टू से यू आर सॉरी." लव्ह स्टोरी या कथेचं सार ह्या एका वाक्यात आहे.

असा हा सुंदर दृष्ट लागण्यासारख्या प्रेमाचा संसार चालू असताना क्रूर निय-

तीला हे मात्र बघवत नाही. अतिशय साध्या, सुंदर परंतु मनस्वी प्रेमात हे क्रौंच पक्षाचं जोडपं क्षुद्र जगाला विसरले असतानाच क्रूर नियतीच्या निर्दय बाणानं ती घायाळ होते. गरोदरपणात तिला लुकेमिनिया हा असाध्य रोग होतो. रिमझिमणाऱ्या पावसात अचानक वीज कोसळावी तसे आपणाला होते. तो तिला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. परंतु नियतीपुढे कुणाचेच चालत नाही आणि मृत्यूशय्येवर नियतीचं आव्हान स्वीकारणारी व म्हणून त्याला धीर देऊन आनंदी ठेवणारी, नव्या जीवनाला सामोरे जा म्हणून सांगणारी जेन अखेर त्याच्या बाहुपाशातच प्राण सोडते. शेवटी नेहमीप्रमाणेच बाप पोराला म्हणतो, "आय ॲम सॉरी" आणि जेनचा प्रियकर आपल्या बापाला सांगतो, "लव्ह मीन्स नॉट हॅविंग टू से यू आर सॉरी."

## काव्यात्मक चित्रण

अशा ह्या विशुद्ध प्रेमकथेचं चित्रण काव्यात्मकतेच्या तरल पातळीवर करणे ही गोष्ट कठीण असताना देखील कॅमेरा व दिग्दर्शक दोघेही इथे यशस्वी झालेत. ही आशयघन कथा चित्रित करताना हिमाच्छादित कुंद वातावरणाची पार्श्वभूमी निवडून व सारे चित्रण बर्फातच करून बर्फासारखे थंडगार हात असणाऱ्या मृत्यूच्या मांडीवरच ते खेळतात असे सुचविले आहे. बर्फातील चित्रित केलेले प्रणयप्रसंग जणू बर्फामधली शीतवादळे वाटतात. नेत्र सुखदायक व अर्थपूर्ण फिरविलेल्या कॅमेऱ्याबरोबरच ती वडिलांना फोन करतानाचा प्रसंग, बर्फातील प्रणयप्रसंग व मनातील विचारचक्रांचा वेग दर्शविणारे फास्ट ड्रायव्हींगचे घेतलेले आगळे शॉटस् मोठ्या बहारीने व कौशल्याने घेऊन दिग्दर्शक आर्थर हिलरने ह्या कथेला न्याय दिला आहे.

ॲलि मॅकग्रॉ हिची जेनची भूमिका आणि रायन ओनीलचा ऑलिव्हर दोघेही इतके जीवंत आहेत की ते अभिनय करत नसून त्या त्या भूमिका जगतात. विशेषतः ॲलि मॅकग्रॉचे मस्त हसणं आणि अल्लड चालणं मोठं देखणं आहे. जेनच्या बापाची छोटीशीच भूमिका करणाऱ्या नटाचे प्रभावी काम बघून आपल्या नाना पळशीकरांची आठवण होते. या नटाचा आवाजसुद्धा अगदी त्यांच्या सारखाच.

अशी ही मनाची पकड घेणारी भावनोत्कट प्रेमकथा. तिचा शेवट पाहताना मनात गलबलून येते. अत्यंत साधीच कथा पण मनाला चटका लावून जाते. ज्यांच्या वाट्याला असले भाग्य नाही त्यांनी निदान आयुष्यात एकदातरी हा चित्रपट पाहून धन्य व्हावं. शेवटी असं व्हायला नको होतं, नको होतं असे आपले मन हळहळत असतानाच जेनचे शब्द आठवतात. सालं प्रेमात कसली आलीय सॉरी. उलट ह्या अर्थहीन जीवनात माणसाच्या आयुष्यात प्रेमानुभव हाच काय तो अर्थपूर्ण तुकडा. जपून ठेवण्यासारखा. पुस्तकातल्या मोरपिसासारखा.

□ □ □

मुंबईस नव्या बंदराची आवश्यकता आहे का ?
आज मुंबईमध्ये वाहतुकीची गर्दीदाटी,
राहण्याच्या जागेची टंचाई, दूषित हवा,
सामाजिक असंतोष
अशा अनेकविध प्रश्नांची तीव्रता वाढत आहे.
जुळ्या मुंबईमुळे वरील प्रश्न सुटतील,
की ते अधिकच गंभीर व गुंतागुंतीचे बनतील ?
विदर्भ, मराठवाडा, कोकण या अविकसित विभागांवर
जुळी मुंबई योजनेचे परिणाम काय होतील ?

# माणूस

## जुळी मुंबई विशेषांक

नेहमीच्या आकारातील सुमारे चौसष्ट पृष्ठे,
नेहमीची किंमत
प्रसिद्धी : दिनांक ८ जुलै १९७२

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



" तरुण माणसा ! विधानसभागृहात हलकल्लोळ माजवून सभासदांच्या हक्कावर अतिक्रमण करीत आहेस याची कल्पना आहे तुला ?"